१०३ शतकोत्तर वाटचाल

R.N.I.No.1814/57

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

• मुंबई, बुधवार १३ ऑगस्ट, २०२५ • वर्ष-१०३, अंक-१६०, पाने-८, किंमत : ₹ ५ NAVAKAL

• Vol.- 103, Issue - 160, Marathi - Daily - Mumbai, 13 August, 2025 Page- 8 Price- Rs. 5/-

24x7 : www.navakal.in • संपादक- रोहित रमाकांत पांडे Email-navakal.1923@gmail.com

## रुपयाला सावरण्यासाठी आरबीआयने डॉलर विकले



**मुंबई -** मागील आठवड्यात डॉलरच्या तुलनेत विक्रमी नीचांकावर पोहोचलेल्या भारतीय रुपयाला सावरण्यासाठी रिझर्व्ह बँकेने आपल्या परकीय गंगाजळीतील ५ अब्ज अमेरिकन डॉलरची विक्री केली, अशी माहिती ब्लुमबर्गने दिली आहे. या व्यवहाराशी संबंधित एका अधिकाऱ्याने ही माहिती दिली आहे. मात्र रिझर्व्ह बँकेने याबाबत अधिकृतरित्या काहीही सांगितलेले नाही. मागील आठवड्यात डॉलरच्या तुलनेत रुपया नीचांकावर पोहोचल्यामुळे रुपयाला सावरण्यासाठी रिझर्व्ह बँकेने डॉलरची विक्री केली. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर पन्नास टक्के आयात शुल्क लावल्यापासून रुपयाचे अवमुल्यन होत आहे. त्यामुळे भारताची आयात महागली आहे.



जय महाराष्ट्र सेवा मंडळाच्या साई नगरच्या राजाचे आगमन झाले. राजाचे यावर्षी ६० वे हिरक महोत्सवी वर्षे असून राजाचे मूर्तिकार अनिल बाईग यांनी राजाची २१ फूट उंच, सुबक, सुंदर मूर्ती घडवली असून साई नगरच्या राजाचे आगमनास भक्तांचा जनसमुदाय लोटला होता.

# पुणे विद्यापीठात ‘व्हॉईस ऑफ देवेंद्र’ स्पर्धा

# विद्यार्थी संघटनेचा विरोध! विद्यापीठाची माघार!

**पुण्याच्या सावित्रीबाई फुले विद्यापीठात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त ‘व्हॉईस ऑफ देवेंद्र’ या राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. मात्र, काँग्रेसच्या नॅशनल स्टुडंट्स युनियन ऑफ इंडिया (एनएसयूआय) या विद्यार्थी संघटनेने इतर समविचारी विद्यार्थी संघटनांसह या स्पर्धेच्या विषयाला विरोध केला. ही स्पर्धा म्हणजे राजकीय अजेंडा असल्याचा आरोप करत या विद्यार्थ्यांनी आज विद्यापीठात आंदोलन केले. यानंतर विद्यापीठाने स्पर्धेचे परिपत्रक मागे घेतले. मात्र, आयोजक असलेल्या संस्थेने स्पर्धा रद्द केल्याचे जाहीर केलेले नाही. यावरून आता वाद सुरू झाला असून, महाविकास आघाडीच्या नेत्यांनी विद्यापीठावर सडकून टीका केली आहे.**



■ पुणे

**सावित्रीबाई** फुले विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. सदानंद भोसले यांच्यातर्फे ५ ऑगस्ट रोजी या वक्तृत्व स्पर्धेबाबत परिपत्रक प्रसिद्ध करण्यात आले होते. या स्पर्धेचे ‘व्हॉईस ऑफ देवेंद्र’ हे नाव वाचून अनेकांना धक्का बसला. या परिपत्रकात म्हटले आहे की, विकसित महाराष्ट्र या विषयाला आधारून राज्यभरातील युवकांमध्ये वक्तृत्वातून कृती आणि




कृतीतून नेतृत्व घडवण्याच्या दृष्टीने देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त ‘व्हॉईस ऑफ देवेंद्र’ ही राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. स्वारंभ फाऊंडेशन, नाशिक प्रतिष्ठान व आय-फेलोज फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा आयोजित केली आहे. महाराष्ट्रातील १४ ते २५ वर्षे वयोगटातील युवक-युवतींसाठी खुल्या असलेल्या या स्पर्धेसाठी २ ते ३ मिनिटांचे मराठी भाषण व्हिडिओ स्वरूपात दिलेल्या संकेतस्थळावर अपलोड करावे.

एनएसयूआय या विद्यार्थी संघटनेने या स्पर्धेच्या नावाला आक्षेप घेत ती राजकीय व्यक्तिपूजेचा प्रकार असल्याचा आणि विद्यापीठात राजकीय अजेंडा चालवला जात असल्याचा आरोप केला. या स्पर्धेविरोधात समविचारी विद्यार्थी संघटनांनी विद्यापीठात आंदोलन केले. विद्यापीठाने काढलेले परिपत्रक पूर्णपणे मागे घेण्याची मागणी केली. जोपर्यंत सुधारित परिपत्रक हातात मिळत नाही, तोपर्यंत आंदोलन मागे घेणार नाही, अशी भूमिका विद्यार्थ्यांनी घेतली. त्यानंतर सदानंद भोसले यांनी लेखी आश्वासन दिल्यानंतर हे आंदोलन मागे घेण्यात आले. मात्र या स्पर्धेचे आयोजक स्वारंभ फाऊंडेशन, नाशिक प्रतिष्ठान व आय-फेलोज फाऊंडेशन यांनी स्पर्धा रद्द केल्याचे जाहीर न केल्याने वाद सुरू राहिला.

महाविकास आघाडीच्या नेत्यांनीही त्यात उडी घेत विद्यापीठाला धारेवर धरले. शरद पवार गटाचे आमदार रोहित » पान ७ वर

## न्या. वर्माविरुद्ध महाभियोग प्रस्ताव लोकसभेत मंजूर

### ३ सदस्यीय समिती गठीत

■ नवी दिल्ली

**घरात** रोख रक्कम सापडलेले अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्या विरोधात सादर करण्यात आलेल्या महाभियोग प्रस्तावाला आज लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी मंजुरी दिली. या प्रकरणी ३ सदस्यीय समिती गठीत करण्याची घोषणाही त्यांनी केली. या प्रस्तावावर सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील एकूण १४६ खासदारांनी स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

लोकसभा अध्यक्षांनी न्यायाधीश चौकशी अधिनियम १९६८ अंतर्गत तीन सदस्यीय चौकशी समिती नियुक्त केली आहे. या समितीत सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अरविंद कुमार, मद्रास उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश मनिंद्र मोहन श्रीवास्तव आणि कर्नाटक उच्च न्यायालयाचे ज्येष्ठ विधिज्ञ बी. व्ही. आचार्य यांचा समावेश आहे. ही समिती लोकसभा अध्यक्षांना आपला चौकशी अहवाल सादर करेल. अहवाल येईपर्यंत महाभियोग प्रस्ताव प्रलंबित राहील. महाभियोग प्रक्रियेनुसार, समितीच्या अहवालात दोष सिद्ध झाल्यास प्रस्तावावर संसदेत चर्चा होईल. त्यानंतर दोन्ही सभागृहांत दोन-तृतियांश बहुमताने प्रस्ताव मंजूर झाल्यास न्यायमूर्ती वर्मा यांना पदावरून हटवले जाईल. यावर्षी १४ मार्च रोजी त्यांच्या दिल्लीतील सरकारी निवासस्थानी लागलेल्या आगीत अर्धवट जळालेल्या नोटा आढळल्या होत्या. या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने चौकशी समिती स्थापन केली होती.

## कुंभमेळ्यासाठी नाशिक मनपा ३०० कोटी रुपयांचे कर्ज घेणार

■ नाशिक

**नाशिक** आणि त्र्यंबकेश्वरमध्ये येत्या ऑक्टोबर महिन्यात होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी पायाभूत सोयी-सुविधांच्या निर्मितीसाठी आवश्यक निधी अद्याप उपलब्ध न झाल्याने नाशिक महानगरपालिकेने ३०० कोटी रुपयांचे कर्ज घेण्याची तयारी चालवली आहे. तर कंपन्यांच्या सामाजिक दायित्व निधीतून (सीएसआर फंड) उर्वरित खर्च भागवण्याचा विचार मनपा करत आहे.

सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी १० हजार कोटी रुपयांच्या खर्चाचे नियोजन करण्यात आले होते. यातील बहुतांश निधी राज्य आणि केंद्र सरकार देणार होते. मात्र आतापर्यंत मनपाला केवळ दहा टक्के रक्कम राज्य आणि केंद्र सरकारकडून प्राप्त झाली आहे. त्यामुळे एवढ्या मोठ्या रकमेची पायाभूत सुविधा निर्मितीची कामे करायची कशी असा प्रश्न मनपाला पडला आहे. निधीअभावी सर्वच विभागांमधील कामे रखडली आहेत. या परिस्थितीवर तोडगा काढण्यासाठी पालिकेने ३०० कोटी रुपये कर्ज घेण्याचा निर्णय घेतला आहे. उर्वरित साधारणतः पाच-सहाशे कोटी रुपये सीएसआर फंडातून मिळवण्याचा पालिकेचा प्रयत्न आहे. त्यासाठी बँका आणि कंपन्यांशी बोलणी सुरू आहेत.

## रायगडच्या पालकमंत्रिपदावरून महायुतीत गोंधळाचा नवा अंक सुरूच! गोगावले ठाम

■ मुंबई

**देवेंद्र** फडणवीसांच्या मुख्यमंत्रिपदाचे नऊ महिने सरून वर्षपूर्ती व्हायची वेळ आली, तरी महायुतीतला पालकमंत्रिपदाचा संघर्ष काही संपण्याची चिन्हे दिसत नाहीत. आगामी स्वातंत्र्यदिनी जिल्हा स्तरावर झेंडावंदन करण्यासाठी राज्य सरकारने मंत्र्यांची यादी जाहीर केली आहे. रायगड आणि नाशिकच्या पालकमंत्रिपदावरून संघर्ष सुरू असतानाच फडणवीस सरकारने प्रसिद्ध केलेल्या या यादीवरून



महायुतीतल्या नाराजीला नव्याने तोंड फोडून दिले आहे.

१५ ऑगस्ट रोजी रायगड जिल्ह्याच्या शासकीय झेंडावंदनासाठी महिला आणि बालविकास मंत्री अदिती तटकरे यांचे नाव जाहीर करण्यात आले आहे. ही राष्ट्रवादी काँग्रेसने शिवसेना आणि त्यांचे मंत्री भरत गोगावले यांच्यावर केलेली कुरघोडी असल्याचे म्हटले जात आहे. रायगडच्या राजकारणात ज्येष्ठ असलेले गोगावले हे पालकमंत्रिपदासाठी सुरुवातीपासूनच आग्रही आहेत. पण एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असतानाही त्यांना मंत्रिपदाची संधी मिळाली नाही. त्यामुळे जिल्ह्याच्या राजकारणात नवख्या असलेल्या अदिती तटकरेच सरस ठरल्या. या सर्व संघर्षाला राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष तथा खासदार सुनील तटकरे आणि गोगावले यांच्यातल्या » पान ७ वर

## दहीहंडी सरावात गोविंदाचा मृत्यू! पथकप्रमुखावर गुन्हा

■ मुंबई

**मुंबईत** दहीसरच्या केतकीपाडा परिसरात दहीहंडीच्या सरावादरम्यान ११ वर्षीय महेश रमेश जाधव या गोविंदाचा मृत्यू झाला. या घटनेनंतर पोलिसांनी नवतरुण मित्रमंडळ गोविंदा पथकाचा अध्यक्ष बाळू सुरनार याच्यावर गुन्हा दाखल केला. महेश सरावादरम्यान सहाव्या थरापर्यंत चढत असताना अचानक त्याचा तोल गेला आणि तो थेट जमिनीवर पडला. गंभीर जखमी अवस्थेत पथकातील सदस्यांनी त्याला रुग्णालयात नेले. मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

## थकीत देयकांसाठी कंत्राटदारांचे १९ ऑगस्टला राज्यभर आंदोलन

■ मुंबई

**सार्वजनिक** बांधकाम विभाग, ग्रामविकास विभाग, जलजीवन मिशन आणि जिल्हा परिषद पाणीपुरवठा विभागाकडील कंत्राटदारांची अंदाजे ८९ हजार कोटी रुपयांची देयके प्रलंबित आहेत. त्यामुळे गेले काही महिने कंत्राटदार सरकारचे दरवाजे ठोठावत आहेत. मात्र थकीत बिलांची रक्कम अजून मिळाली नसल्याने महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ, राज्य अभियंता संघटना आणि महाराष्ट्र राज्य पाणीपुरवठा कंत्राटदार संघटना यांच्या वतीने १९ ऑगस्ट रोजी राज्यातील सर्व ३५ जिल्ह्यांत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन होणार आहे.

गेल्या १० महिन्यांपासून या देयकांसह विविध मागण्यांसाठी संघटनांनी मोर्चे, उपोषणे, निवेदने अशा लोकशाही मार्गांनी प्रयत्न केले. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना वारंवार पत्रे देऊन बैठकीची मागणी केली, मात्र केवळ कोरडी आश्वासनेच मिळाल्याचा आरोप या संघटनांनी केला आहे. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर संघटनेचे अध्यक्ष मिलिंद भोसले, » पान ७ वर

## कांद्याच्या माळा घालून संसदेत मविआ खासदारांचे आंदोलन

■ नवी दिल्ली

**महाविकास** आघाडीच्या खासदारांनी आज संसद परिसरात कांद्याच्या प्रश्नावर आंदोलन केले. खासदारांनी हातात कांद्याच्या माळा घेऊन संसद भवनात प्रवेश करीत सरकारचे लक्ष वेधले. केंद्र सरकारचे कांदा निर्यातीबाबतचे धोरण हे कांद्याच्या सध्याच्या परिस्थितीला कारणीभूत असल्याचा आरोप आंदोलकांनी केला. कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी सरकारने योग्य पावले उचलावी अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली. कांद्याला हमीभाव मिळावा. नाफेडमध्ये भ्रष्टाचार सुरू आहे त्याची चौकशी करण्यात यावी. कांद्याच्या दराबाबत आणि निर्यातीबाबतच्या धोरणांवर तातडीने विचार करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. खासदार निलेश लंके म्हणाले की, राज्यात कांद्याचे उत्पादन सर्वात जास्त होते, पण कांद्याला भाव मिळत नाही. १२ रुपयाला कांदा विकावा लागत असेल तर शेतकरी काय करणार? यामुळे शेतकरी कर्जबाजारी होत आहे. कांद्याला ४५ रुपये भाव मिळावा अशी आमची मागणी आहे.

## राज्य मंत्रिमंडळ बैठकीला शिंदे, भुसे, गोगावले गैरहजर

■ मुंबई

**राज्य** मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह राज्याचे रोजगार हमी मंत्री भरत गोगावले, शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे हेही गैरहजर होते. यामुळे महायुतीमध्ये मतभेद असल्याच्या चर्चांना पुन्हा उधाण आले.

रायगड व नाशिक पालकमंत्रीपदावरून महायुतीत रस्सीखेच सुरू असतानाच मुख्यमंत्र्यांनी रायगड आणि नाशिक येथील ध्वजारोहणाचा मान अनुक्रमे अजित पवार गटाच्या आदिती तटकरे आणि भाजपाचे गिरीश महाजन यांना दिला. त्यामुळे नाराज असलेले मंत्री गोगावले थेट दिल्लीत गेल्याची चर्चा आहे. मात्र, आपण नाराज नसून कामानिमित्त दिल्लीत आल्याचे त्यांनी पत्रकारांना सांगितले. दिल्लीत ते भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी नड्डा यांना भेटणार असल्याची चर्चा होती. तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मंत्रिमंडळ बैठकीतील गैरहजेरीबाबत मंत्री शिरसाट म्हणाले की, शिंदे हे श्रीनगरमध्ये होते. ते आजच मुंबईत परतले. मंत्रिमंडळ बैठकीत पालकमंत्रीपदासंदर्भात कोणतीही चर्चा झाली नाही.

## बेस्ट बस अपघातात ७५ वर्षीय वृद्धेचा मृत्यू

■ मुंबई

**मुंबईतील** सह्याद्री राज्य अतिथीगृहासमोर आज सकाळी ९ वाजताच्या सुमारास भीषण अपघात होऊन नीता शहा (७५) या पादचारी महिलेचा मृत्यू झाला. ईव्ही ट्रान्सच्या वेटलीजवर चालणाऱ्या मुंबई सेंट्रल आगारातील इलेक्ट्रिक बसच्या धडकेत हा अपघात झाला. ही बस विजय वल्लभ चौक येथून कमला नेहरू पार्ककडे जात होती. त्यावेळी जोरात आवाज ऐकू आल्याने चालक बसबाहेर आला. त्याला रस्त्यावरून नीता शहा बसच्या डाव्या मागील चाकाखाली आल्याचे लक्षात आले. गंभीर जखमी अवस्थेतील नीता शहा यांना पोलिसांनी तत्काळ उपचारासाठी जे. जे. रुग्णालयात हलवले. मात्र डॉक्टरांनी मृत घोषित केले.

## हे सरकार पैसेवाल्यांचे मायबाप! विजयाबाई सूर्यवंशींची उद्विग्न टीका

■ मुंबई



**परभणी** हिंसाचारात पोलिसांच्या कोठडीत मृत्यू झालेल्या सोमनाथ सूर्यवंशी यांच्या आई विजयाबाई सूर्यवंशी यांनी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकार गरिबांचे नाही, तर पैसेवाले आणि गुन्हेगारांचे मायबाप सरकार आहे, अशी उद्विग्न टीका केली आहे. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी त्यांच्या या विधानाचा व्हिडिओ पोस्ट केला आहे.


या व्हिडिओत विजयाबाई सूर्यवंशी म्हणाल्या की, पूर्वी सरकार गरिबांचे मायबाप असल्याचे म्हणायचे. पण हे सरकार पैसेवाल्यांचे, गुन्हेगारांचे मायबाप आहे. माझ्यासारख्या गरिबांचे नाही. आठ महिने झाले, तरी मला न्याय मिळालेला नाही. मला न्याय मिळेल म्हणून मी वाट पाहत आहे. यावर रोहित पवार म्हणाले की, सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मातोश्रींचे शब्द काळीज चिरणारे आणि आजच्या सत्ताधाऱ्यांचे वस्त्रहरण करणारे आहेत. पोटच्या मुलाच्या मृत्यू प्रकरणी त्या मागील आठ महिन्यांपासून न्यायासाठी तडफडत आहेत. हायकोर्ट आणि सुप्रीम कोर्टाने दोषींविरुद्ध गुन्हा दाखल करण्याचा आदेश दिला, तरी सरकार अनोळखी व्यक्तीविरोधात गुन्हा नोंदवून दोषींना वाचवत आहे. मुख्यमंत्री महोदय, हत्या करणाऱ्यांना वाचवून न्यायाचा मुडदा पाडू नका.

## आधार नागरिकत्वाचा पुरावा नाही निवडणूक आयोगाची भूमिका योग्य

### सुप्रीम कोर्टाचा निर्वाळा

■ नवी दिल्ली

**आधार** कार्ड हा नागरिकत्वाचा ठोस पुरावा मानता येत नाही, असे नमूद करत सर्वोच्च न्यायालयाने आज निवडणूक आयोगाच्या भूमिकेवर शिक्कामोर्तब केले. आधार कार्ड हा नागरिकत्वाचा परिपूर्ण पुरावा नाही. आधार कार्डची स्वतंत्रपणे पडताळणी करणे आवश्यक आहे, असे न्यायालयाने सांगितले.



बिहारमध्ये सुरू असलेल्या मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षणाला (एसआयआर) आव्हान देणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली आहे. या याचिकेवर न्या. सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठासमोर आज सुनावणी झाली. त्याप्रसंगी न्या. सूर्यकांत यांनी हे महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवले.

याचिकाकर्त्यांच्या वतीने ज्येष्ठ विधिज्ञ कपिल सिब्बल यांनी युक्तिवाद केला. निवडणूक आयोगाने बिहारमध्ये सुरू केलेल्या एसआयआरमुळे मोठ्या प्रमाणावर मतदारांची नावे मतदार याद्यांमधून कमी केली जाण्याचा धोका आहे. विशेषतः ज्यांना आवश्यक कागदपत्रे सादर करणे शक्य नाही, अशा लोकांची नावे मतदार याद्यांमधून वगळली जात आहेत. २००३ च्या मतदार यादीत नाव असलेल्या आणि घरचा पत्ता तोच असलेल्या मतदारांकडेही नव्याने कागदपत्रे मागितली जात आहेत, असे सिब्बल यांनी न्यायालयात सांगितले.

## चंदा कोचर यांचे पती दीपक कोचर यांना हायकोर्टाचा दिलासा

■ मुंबई

**आयसीआयसीआय** बँकेच्या माजी व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी चंदा कोचर यांचे पती व्यावसायिक दीपक कोचर यांना न्यूपॉवर रिन्युएबल्स प्रायव्हेट लिमिटेड कंपनीतील गैरव्यवहार प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाने काही प्रमाणात दिलासा दिला. त्यांची प्रकृती व वयाचा विचार करून त्यांच्या चौकशीचे वेळापत्रक निश्चित करावे, असे निर्देश उच्च न्यायालयाने गंभीर गुन्हे तपास कार्यालयाला (एसएफआयओ) दिले आहेत.

न्यूपॉवर रिन्यूएबल्स ही कंपनी दीपक कोचर आणि अन्य काही कंपन्या मिळून चालवत होते. या कंपनीत मोठ्या प्रमाणात आर्थिक घोटाळा झाल्याचा आरोप आहे. एसएफआयओ या प्रकरणी चौकशी करत आहे. उद्या १३ ऑगस्ट रोजी एसएफआयओने कोचर यांना चौकशीसाठी चेन्नईला बोलावले होते. मात्र प्रकृती अस्वास्थ्यामुळे आपल्या चौकशीचा कालावधी मर्यादित असावा, अशी विनंती कोचर यांनी मुंबई उच्च न्यायालयात केली होती. या याचिकेवर न्या. रविंद्र घुगे आणि न्या .गौतम अनखड यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. त्याप्रसंगी न्यायालयाने एसएफआयओला सायंकाळी ५ पर्यंतच चौकशी करण्याचे बंधन घातले आहे. हे निर्देश देत कोचर यांना दिलासा दिला.

# छोट्या जाहिराती

**संपर्क करा**
**८४२२८१७४४५/८१०८११६४२३**

## पाहिजेत

घरकामासाठी महिला / मुली / मुले (भरपूर पगार) राहण्याची - खाण्याची सोय) **9820234040** (ठाणे) {NC251890}

मुंबईमध्ये पेशंटकेअरसाठी मुले, मुली, पुरुष, बायका पाहिजेत. पगार (22,000-75,000) **9820628009 / 9833470199** {NC251844}

SBI बँकेत ऑफिस कामासाठी लोकांची भर्ती 15,000/- ते 35,000/- **9702279241** {NC251804}

ई-मेल ट्विटर कॉम्प्युटर ऑपरेटर अनुभवी / पार्लरसाठी/ **9821570599** विलेपार्लेतील {NC251919}

मालाड वेस्टमध्ये इमीटेशन कामासाठी मुली पाहिजेत. आकर्षक पगार **9870041713.** {NC251836}

मोलकरीण, टिफिन सेवा, छोटा व्यवसाय वा नोकरी करणाऱ्यांसाठी घरबसल्या नोकरी. **7738447003** {NC251923}

इमिटेशन ज्वेलरीसाठी मुली पाहिजे. **7023506405** {NC251922}

दादर पश्चिमला दहावी, बारावी शिकलेली अनुभवी/बिनअनुभवी ऑफिस असिस्टंट हवी - **8879166871 / 9082148924** {NC251897}

बोरिवली पश्चिम येथे हायड्रॉलिक प्रेसच्या सर्विस आणि रिपेअरिंगसाठी हायड्रोलिक इंजिनिअर/वर्कर पाहिजेत. **9820477791** {NC251770}

बोरिवली पश्चिम येथे कारखान्यात डाय मेकर कारागीर आणि मदतनीस पाहिजेत. **9820477791** {NC251769}

तोरण - दिवा - ज्वेलरी कामासाठी हेल्पर मुले - मुली पाहिजे. **9820732719** (कांदिवली) {NC251862}

पाहिजे कॉम्प्युटर / ऑफिस स्टाफ, वेब/ग्राफिक्स डिझाईनर्स, हेल्पर, हाऊसकिपिंग **9699924546** {NC251863}

### जाहिरातदारांना सुचना

**शनिवार दि. १६ ऑगस्ट २०२५ रोजी गोपाळकालानिमित्त दै.'नवाकाळ'चा जाहिरात विभाग बंद असल्याने रविवार दि. १७ ऑगस्ट आणि सोमवार दि. १८ ऑगस्ट २०२५च्या जाहिराती शुक्रवार दि. १५ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत 'नवाकाळ' कार्यालयात स्वीकारल्या जातील. याची जाहिरातदारांनी नोंद घ्यावी.**
**advertise@navakal.in**
**- मॅनेजर 'नवाकाळ'**

## पाहिजेत

चेंबूरस्थित प्रख्यात इलेक्ट्रिकल सर्व्हिसेस कंपनीला अनुभवी हेल्पर्स त्वरित पाहिजेत. पगार 14000 + पर्क्स. WhatsApp biodata **9892653232** {NC251861}

मालाड (ईस्ट) मधील प्रिंटिंग प्रेससाठी हेल्पर कम डिलिव्हरी बॉईज पाहिजे. 12 तास काम पगार 16000/- **9892106609** {NC251876}

बारावी पास मुले पाहिजेत बाहेरील कामासाठी वय 19 ते 33 विरार ते भाईंदर राहणारे **9969725362 / 9833911797** {NC251912}

मुलुंड येथे बँकसाठी फिल्ड कलेक्शन - टेलिकॉलिंग स्टाफ हवा आहे, पगार 12,000/- ते 22,000/- (शिक्षण 10वी, 12वी) संपर्क - **7021506468** {NC251882}

पॉवरप्रेस ऑपरेटर आणि पॅकिंगसाठी मुले/मुली पाहिजे. जय गणेश, गाळा नंबर - 6, बबन मिश्रा कंपाऊंड सोनावाला क्रॉस रोड नंबर 2, गोरेगांव (पूर्व) - **9820382105 / 9137518551** {NC251687}

सलूनमध्ये कामासाठी कारागीर पाहिजेत. पगार 12000-17000/- राहण्याची सुविधा. मुंबई - **7021457297 / 8850463091** {NC251918}

## पाहिजेत

सोलना ऑफसेट मशीनसाठी बॉयलर पाहिजे. (भायखळा) **9820017588** {NC251896}

**लोअर परेल (वेस्ट) मध्ये प्रिंटिंग प्रेससाठी पेपर कटिंग मशीन ऑपरेटर (Seypa Machine) बायडिंगच्या अनुभवी पाहिजेत. आकर्षक पगार, पीएफ, ईएसआइसी सुविधा. प्रत्यक्ष भेटा - दुपारी 3 ते 7 पर्यंत. संपर्क - 9920471399, 9820064464** {NC251889}

Tempo Driver / हेल्पर/Peon पाहिजेत. (राहण्याची सोय) सांताक्रूज संपर्क - **7506808085** {NC251873}

मुंबई सेंट्रल - DRM ऑफिस साफसफाई करिता माणसे पगार 12000/- आधारकार्ड / लाईटबिल/ रेंट अग्रीमेंट / अॅड्रेसप्रुफ - सकाळी 7 - 4. - मोबाईल - **9869781781** {NC251875}

आश्रममध्ये 24 तासासाठी आया, वॉर्डबॉय आणि जेवणाच्या कामासाठी बाई हवी डोंबिवली **8379998437** {NC251866}

मालाड वेस्टमध्ये इमिटेशन ज्वेलरी कामासाठी मुलगी पाहिजे. संपर्क : **9819123920** {NC251858}

**भिवंडी पडघा येथे प्रिंटींग प्रेस मध्ये KBA Offset मशीनवर काम करण्यास प्रिंटर, फीडरमन व हेल्पर पाहीजेत. तसेच मॅन्युअल पंचींग मशीन, लॅमिनेशन मशीन व पोलार कटींग मशीनसाठी ऑपरेटर पाहीजेत. कल्याण स्टेशनवरून नेण्यासाठी व आणण्यासाठी कंपनीची गाडी असेल.**
**संपर्क 9224455770**

अंधेरी पूर्व इलेक्ट्रॉनिक इन्स्ट्रुमेंट कंपनीसाठी अनुभवी डिप्लोमा इंजिनियर, ITI टेक्निशिअन आणि पीसीबी सोल्डरिंगसाठी अनुभवी महिला/ मुली पाहिजेत. प्रीमीयर इलेक्ट्रॉनिक **9988117372** {NC251856}

वकिलाच्या ऑफिसमध्ये कामासाठी मुले पाहिजे. 32 च्या आत मध्ये भांडुप संपर्क करावा **9892769253** {NC251895}

**डीएचएलसाठी ऑफिसबॉय पाहिजेत. पगार 20000/-, 8 तास. संपर्क 7208551929, 9702126571** {NC251847}

मुलुंडमध्ये क्लाससाठी गाणी / इन्स्ट्रुमेंट्स / नृत्य शिकवण्यासाठी टीचर पाहिजेत. **9821575352 / 9699987575** {NC251818}

कोमोरी मशीनसाठी फिडरमन, बॉयलर आणि हेल्पर पाहिजेत. ठाणे - **9892636100/ 9819410350** {NC251823}

इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टरला (मुंबई व लोणावळा साईटकरिता) अनुभवी किंवा बिनअनुभव असलेले वायरमन व हेल्पर पाहिजेत आकर्षक पगार + गाडीभत्ता संपर्क - **9819178977.** {NC251871}

## पाहिजेत

मरीनलाईन्स स्टेशनजवळ ऑफिस असिस्टंट SSC मुली पाहिजे. (वय 18-25) पगार 15,000/- संपर्क - **9820338880** {NC251909}

कांदिवली वेस्टला म्युच्युअलफंड, विमा व्यवसायाच्या, बिझनेस डेव्हलोपमेंटसाठी अनुभवी सेल्समेन फिल्डवर्क कामासाठी पाहिजे. अभय - **9223481847** {NC251903}

**पाहिजेत**
**मोबाईल डिस्ट्रीब्युटर कंपनीसाठी ड्रायव्हर व डिलिव्हरी बॉईज पाहिजेत**
**ड्रायव्हर वेतन -** १७ हजार
**डिलिव्हरी बॉईज वेतन -** १४ हजार + प्रवास खर्च
**डिजीकॉम टेक्नॉलॉजीस**
अमरदिप बिल्डिंगच्या बाजुला हकोबा मिल कंपाऊंड समोर दत्ताराम लाड रोड, काळाचौकी, मुंबई - ४०००३३.
**9920563320**

कोमोरी लिथ्रोन 26 4 कलर मशीनसाठी प्रिंटर, बॉयलर, कटिंग मशीनसाठी बाईंडर, पॅकिंगसाठी मुली अकाऊंटसाठी मुलगा, मुलगी पाहिजेत. श्री साई ग्राफिक्स, युनिट नं. 2, कृष्णा कंपाऊंड, जय श्रीराम कॉम्प्लेक्स जवळ मानकोली नाका, दापोडे भिवंडी, मो. नं. **7208176822 / 33** {NC251904}

शिवडीमध्ये हेडलबर्ग SORMZ टूकलर प्रिंटिंग मशीनकरीता मेटपेट प्रिंटिंग, युवी वार्निश आणि ड्रीपोफचा अनुभव असलेले प्रिंटर, बॉयलर आणि फिडरमन पाहिजेत. त्वरीत संपर्क करा. **9082517355** {NC251931}

मालाड (वेस्ट) पेस्टकंट्रोल कंपनीला पाहिजेत. १) पेस्टकंट्रोल ऑपरेटर, २) सुपरवायझर, ३) कॉम्प्युटर ऑपरेटर (कॉम्प्युटर नॉलेज जरूरी) - **9223480661/ 9223242627** {NC251928}

ऑफिस कामासाठी HSC पास प्यून पुरुष पाहिजेत. (इनडोअर/ आऊटडोअर), मुलाखतीसाठी 13, 14 आणि 16 ऑगस्ट 2025 रोजी दुपारी 1.00 ते 3.00 दरम्यान संपर्क साधा : क्लिक एक्सपोर्ट्स 605, सहावा मजला, क्रिसेंट रॉयल, सिटी मॉलजवळ, ऑफ अंधेरी न्यू लिंक रोड, अंधेरी (पश्चिम), सिटी मॉल बस स्टॉप, लोवर ओशिवरा स्टेशन, मोबाईल - **9004990600** {NC251927}

कल्याण पश्चिम- 24 तास काम करणारी विश्वासू अनुभवी मोलकरीण हवी आहे. 1. कपडे मशीनमध्ये ठेवणे-वाळवणे. 2. भांडी. 3. स्वयंपाक करणे (3 प्रौढ - 1 मूल) 4. 5 वर्षांच्या मुलाची काळजी घेणे. 5. घर स्वच्छ ठेवणे. महाराष्ट्रीयन/ गुजराती असणे आवश्यक आहे. (निवास व्यवस्था), महिना 10-20 हजार पगार, संपर्क : **8169971643 / 9892862225** {NC251925}

## पाहिजेत

HDFC बँक जॉबसाठी मुले-मुलींची डायरेक्ट भर्ती पगार: 17500-35000 संपर्क : **7758908779** {NC251939}

प्रिंटिंग प्रेससाठी मार्केटिंगसाठी मुले/मुली डिलीव्हरीबॉय, ड्रायव्हर संपर्क-युनिक प्रिंटस F-151, HAWARE FANTASIA BUSINESS PARK, SECTOR 30A, VASHI, NAVI MUMBAI **9987067049** {NC251961}

Field Technician पाहिजेत ग्लोबल टेक कंपनीसाठी ठाणे ते अंधेरी पर्यंत क्लायंट व्हिजीट आणि बेसीक मेंटेनन्स कामासाठी ट्रेनिंग मिळेल. सॅलरी - 17000 ते 20000 + TA + DA - **6359033633** {NC251960}

पेस्ट कंट्रोल कंपनी मुंबई, ठाणे, डोंबिवली करिता टेक्निशियन, टेली कॉलर, सेल्समन आणि लायसन्स ऑफिसर, ऑपरेटर पाहिजेत : **9323682041** आकर्षक वेतन. {NC251959}

विरार/नालासोपारा येथे घरकामासाठी बाई पाहिजे संपर्क - **9822977919** {NC251958}

वडाळा येथील एका नामांकित सोसायटीकरिता साफसफाईसाठी पुरूष पाहिजेत 8 तास ड्युटी पगार 15000/- वयाची अट नाही संपर्क - **9920530142** {NC251953}

हेडलबर्ग सिलिंडर फॉईल स्टॅम्पिंग मशीनसाठी ऑपरेटर्स पाहिजेत.हेल्पर्स पाहिजेत आकृती क्रिएशन,पन्नालाल कंपाऊंड,भांडुप (प) **9619585411, 7021415320** {NC251952}

कांजुरमार्ग वेस्ट स्टेशन समोर दातांच्या दवाखान्यासाठी लेडीज पाहिजेत (पार्टटाईम) शिक्षणाची,वयाची अट नाही. whatsapp no **9969510760 / 9769259455** {NC251951}

4 कलर Komori Lithron (Auto) साठी फिडरमेन/प्रिंटर आणि कटिंग मशीन बायंडर पाहिजे (भायखळा) **9820080776 / 9819551478** {NC251949}

ड्रायव्हर पाहिजे संध्याकाळी 6 ते 8 संपर्क - **9892458244** {NC251948}

दादर पश्चिम 24 तास घरकामासाठी बाई 20 ते 40 वय पाहिजे **9892458244 / 9967236997** {NC251946}

ऐरोली ऑफिससाठी/ कॉम्प्युटर ज्ञान असलेली मुलगी पाहिजे.संपर्क- **9702074456** {NC251947}

फूड प्रॉडक्ट दुकानामध्ये अंधेरी ते बोरीवली एरियामध्ये ऑर्डर घेण्यासाठी अनुभवी सेल्समन/ सेल्सगर्ल पाहिजे संजयसर - **8108902284** {NC251944}

कल्याणमध्ये गव्हर्मेंट इलेक्ट्रीकल कंपनीकरिता सुपरवायझर, वायरमेन,हेल्पर व अकाऊंटट पाहिजेत **8080619999** {NC251945}

## पाहिजेत

सेंट्रल लाईनसाठी डिलिव्हरी आणि ऑफिस कामासाठी मुले पाहिजे. युनिव्हर्सल मार्केटिंग' **9323183731** {NC251942}

बीकॉम पास टॅलीत एक्सपर्ट मुलगा/मुलगी बोरिवली येथील सहकारी संस्थेला त्वरित पाहिजे. 12000 इतर भत्ते. डॉक्टर रामुगडे - **9022821999** (संपर्क वेळ 2-7) {NC251935}

बोरीवली (वेस्ट) गोराई-2, इमीटेशन कामासाठी मुली पाहिजेत. (पगार दिवसाचे 300/- - 350/-) **9892487991.** {NC251936}

दहिसर (ईस्ट) ऑफिसमध्ये कॉम्प्युटर जाणणारी फिमेल स्टाफ पाहिजेत. दहिसर राहणाऱ्यांना प्राधान्य. **9920138559.** {NC251938}

कुरीअरमध्ये संपूर्ण मुंबईमध्ये डिलिव्हरीसाठी पार्ट / फूलटाईम बाईकर्स / नॉन बाईकर्स दहावी पास मुले/मुली पाहिजेत. पगार 10,000/- ते 18,000/- किंवा दररोज 500/- रुपये. भायखळा (पूर्व), मोबाईल - **7715982560** {NC251937}

**पाहिजेत**
**पेण-खोपोली रोडवर असलेल्या फळबागायतीकरिता काम करण्यास अनुभवी माणसे पाहिजेत.**
- **जोडप्यांना प्राधान्य.**
- **राहण्याची सोय आहे.**

**संपर्क : 8108713032**

ताडदेव ऑफिससाठी कॉम्प्युटरचा अनुभव असलेले स्टाफ पाहिजेत. वय (20-35) वर्षे **9920053121** {NC251940}

**9869028742** घरी जेवणाकरिता बाई पाहिजे ग्रान्ट रोड ईस्ट मुंबई नं.8 {NC251932}

भांडूप इंडस्ट्रियल, मॅक्सिमा प्रिंट पॅकेजिंग एजन्सीला त्वरित स्टाफ पाहिजे. अनुभव 1/2 वर्ष. मार्केटिंग सेल्स पर्सन, प्रोडक्शन कोर्डिनेटर, DTP ग्राफिक डिझाइनर, डिजिटल मार्केटिंग, अकाउंट्स, बाईंडर कटर, स्कूटर येणारा पॅकिंग-डिलिव्हरी हेल्पर. व्हॉट्सअप **9152377195, 7715809224** {NC251956}

**पाहिजेत छपाई क्षेत्रात अनुभवी बाईंडर, हेल्पर, दुचाकी चालवणारे लायसेन्स धारक युवक. घाटकोपर आसपास राहणाऱ्यांना प्रथम पसंती. संपर्क: कलर कन्सेप्ट, श्रीजी शॉपिंग सेन्टर, नवरोजी लेन, घाटकोपर वेस्ट. मोबाइल: 9820322515.** {NC251955}

मिठाईच्या दुकानात हाऊसकिपिंगसाठी तरुण अनुभवी मुले पाहिजेत. 12 तास 17400/- घाटकोपर - **9699927271** {NC251954}

## पाहिजेत

मुलुंड येथे फॅक्टरीमध्ये कामासाठी महिला पाहिजेत. संपर्क सकाळी 11 नंतर **8451883734.**{NC251941}

महाराष्ट्रीयन शाकाहारी कुटुंबासाठी 4 वर्षाच्या मुलाला सांभाळण्याकरीता व जेवण बनवण्यासाठी मीरारोड (पूर्व) येथे 24 तासासाठी बाई हवी आहे. पगार 13000 ते 15000 - **9833959612** {NC251917}

## Situation Vacant

REQUIRED ACCOUNT - ASSISTANT B.COM, TALLY MUST 2-3 YEARS EXPERIENCE. "AVF ENTERPRISE" OFFICE - 7, PATEL COMPOUND, 3RD ROAD, OPPOSITE KHAR WEST, GURDWARA **9326528520** {NC251929}

Borivali (West) required Assistant Tally Accountant 2 years' experience. Resume : **9892797851.** {NC251924}

Required - Housekeepers, Multi-Skilled Technicians, Valet Parking drivers, Receptionist, Facility Management Supervisors, Housekeeping supervisors. Contact :- **8976290545** {NC251926}

Accounts Assistant Tally must with good english communication **9820026436 / 9619603169** {NC251934}

HORIZUN FINANCIAL SERVICES, Lokhandwala, Kandivali East, Require Office Assistant,12th pass, Typing Speed 20 wpm, Experience 06 - 12 months, Basic English, Word, Excel - Fulltime / Parttime. Mobile No. **9820504945 / 8898504945.** {NC251933}

REQUIRED MALE/ FEMALE OFFICE ASSISTANT (EXCEL & WORD) AT MIRAROAD FOR PVT. LTD. FIRM **8097641616.** {NC251963}

Required a Sales & Accounts Helper for Apple Gift at 122/124 Abdul Rehman st. Mumbai 03. Mob. **8879924269** {NC251963}

Required Part Time Office Assistant with Tally Dadar office. **9833224522** {NC251943}

REQ Female for our Godown at Rabale, Navi Mumbai. B.Sc. passed (with Chemistry) having Min Exp of 2yrs in the said Field. Residing from Badlapur to CSMT & Digha to Panvel pref. Walk-in: Matangi, Thane (W) - Mob. **7400181025**, Email: sales@matangioffice.com {NC251917}

## Situation Vacant

**URGENT HIRING FOR**
**BOMBAY HIGH OFFSHORE HVAC PROJECT**
**INTERVIEWS ONGOING**
**S.A.F. REFRIGERATION ENGINEERING**
Navi Mumbai.
**Contact**
VisheshSurve@safengg.com / Mehboob@safengg.com
**7977251217 / 9833809217**

**HVAC TECHNICIAN / SERVICE ENGINEER**
ITI / NCTVT / Degree / Diploma Certificate in Electrical / Mechanical / Refrigeration & Air-Conditioning.

**PLC ENGINEER**
Degree / Diploma in Electrical / Electronics / Instrumentation Engineering having experience on PLC based control.

**ELECTRICIAN**
Diploma / ITI Certificate in Electrical. Required Wireman License or competency certificate.

**Min. 5 years exp. in the relevant field / (Rotational Tickets & leave salaries provided) / Free food & accommodation.**
SCAN TO APPLY

## शैक्षणिक

हमखास पासाची गॅरंटी खर्डीकर क्लासेस. ७वी नापास? डायरेक्ट १०वी. ११वी नापास? डायरेक्ट १२वी. डोंबिवली: **9820627580 / 9820904646** {NC251851}

## नर्सिंग कोर्स

100% नोकरी देणारे गव्हर्मेंट कोर्सेस GNM/ Diploma NURSING, DMLT, PHYSIOTHERAPY, OPERATION THEATRE, INTENSIVE CARE UNIT, XRAY, DIALYSIS ओम इन्स्टिट्यूट, मालाड, मुंबई **8080502190 / 8850530054** {NC250612}

## व्यवसायविषयक

स्वतःचा लघुउद्योग सुरू करून दिवसा 3000/- कमवा. अनिरुद्धा- दादर- **8652643434 / 9967437950** {NC251713}

शाळांना लागणारी स्टेशनरी बनवणाऱ्या नामवंत मॅन्युफॅक्चरींग कंपनीला मुंबई/ पालघर जिल्ह्यात कमिशन वरती काम करणारे विश्वासू पुरुष/ महिला पाहिजेत. ज्या ठिकाणी राहता त्याच विभागात काम करून महिन्याला लाखो रुपये कमवण्याची सुवर्णसंधी अधिक माहितीसाठी प्रत्यक्ष भेटा: **8693009342/ 9082787983** {NC251443}

घरबसल्या द्रोण पेपरडिश बनवा. महिना 30 - 35 हजार कमवा दोन वर्षाचे अॅग्रीमेंट **- 9028160157** {NC251846}

''घरातुन बिजनेस'' Part Time Work - Full Time Income.. दीप्ती **9429991857** {NC251880}

पॅम्पलेट वाटण्यासाठी एक पार्टटाईम माणूस ठेवा आणि लाखो रुपये कमवा. डॉ. महादेव कोकाटे - **9588641225** {NC251964}

## जागा विषयक

कर्जत व वांगणी (पूर्व) येथे 732 व 536 sqft चे फ्लॅट विकणे आहे. संपर्क - **9767631358** {NC251930}

## वर पाहिजे

गरीब वधु 28, 12वी, लहान मुलांचे घरगुती क्लासेस चालवते. 10,000/- मुलीला वडील नाहीत. कष्टाळू निर्व्यसनी मुलगा हवाय. जातीची अट नाही. (त्वरीत विवाह) **8446389460** {NC251962}

# एसआरए योजनेतील विकासकांनी म्हाडाच्या घरांचे ५५ कोटी भाडे थकवले

■ मुंबई

**झोपडपट्टी** पुनर्वसन अर्थात एसआरए योजनेतील चार खासगी विकासकांनी म्हाडा मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या घरांचे ५५ कोटी रुपये भाडे थकवले आहे, अशी माहिती या मंडळातील एका अधिकाऱ्याने दिली.

मुंबईत झोपडपट्टी पुनर्विकास योजना राबविताना संबंधित झोपडीधारकांना पर्यायी घरांची व्यवस्था व्हावी. या अनुषंगाने चार खासगी विकासकांनी म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या मालकीच्या संक्रमण शिबिरातील घरे ३३(१०) नुसार भाडेतत्वावर घेतली होती. गेले अनेक वर्षाचे या विकासकांकडून म्हाडाला थकीत भाड्याची रक्कम येणे आहे. असे सांगून या मंडळातील अधिकारी पुढे म्हणाला की जे चार विकासक आहेत. त्यांचे इतरत्र ठिकाणी झोपू योजने अंतर्गत कामे सुरू आहेत. ही कामे थांबविण्याची नोटीस एसआरए कार्यालयाने बजावित. असे पत्र म्हाडाने या प्राधिकरणाच्या कार्यालयाला दिले आहे. आता प्राधिकरण म्हाडाच्या पत्राला कितपत प्रतिसाद देते, हे पहावे लागेल. मात्र खासगी वसूलीचे म्हाडासमोर आव्हान आहे.

# शरद पवार गटाच्या नवनियुक्त १५ प्रवक्त्यांची यादी जाहीर

**मुंबई- राष्ट्रवादी** शरद पवार गटाच्या नवनियुक्त १५ प्रवक्त्यांची यादी शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी एक्स पोस्टवर प्रसिद्ध केली. या यादीत विद्या चव्हाण, अंकुश काकडे, सुधाकर भालेराव, भीमराव हत्तीअंबिरे, महेश तपासे, विकास लावंडे, सक्षणा सलगर, मेहबूब शेख, फहाद अहमद, राजा राजपुरकर, मनाली भिलारे, नितीन देशमुख, क्लाइड क्रास्टो, राखी जाधव, रचना वैद्य यांचा समावेश आहे.

# आजचे राशी भविष्य

बुधवार दि. १३ ऑगस्ट २०२५
ज्योतिष पंडीत अर्चना तारू

| राशी | भविष्य |
|---|---|
| मेष | महत्त्वाच्या कामांमध्ये दिरंगाई होऊ शकते. प्रवास करताना खबरदारी घ्यावी. नोकरीसाठी अधिक प्रयत्न करावे लागतील. |
| वृषभ | आर्थिक उत्पन्नात वाढ होईल. जुनी येणी वसूल होण्याची शक्यता राहील. भावंडांचे सौख्य लाभेल. मिष्टान्न खाण्यात रुची घ्याल. |
| मिथुन | तुम्ही केलेल्या कार्याचा गौरव होईल. कौटुंबिक वातावरण आनंददायी राहील. आर्थिक आवक चांगली राहील. |
| कर्क | तुम्ही केलेल्या योजनांमध्ये थोडी दिरंगाई होऊ शकते. वरिष्ठांची मर्जी सांभाळावी लागेल. घरी मित्रमंडळींचे आगमन होईल. |
| सिंह | तुमच्या बोलण्याने जोडीदार नाराज होणार नाही याची काळजी घ्या. खर्चाचे प्रमाण वाढेल. आरोग्याची काळजी घेणे आवश्यक. |
| कन्या | विविध प्रकारच्या माध्यमातून आर्थिक लाभ होतील. सामाजिक कार्यात रस घ्याल. मुलांशी सुसंवाद साधला पाहिजे. |
| तूळ | कार्यक्षेत्रात तुमच्या युक्तीने अडथळ्यांवर विजय मिळवाल. जोडीदाराच्या मर्जीनुसार वागावे लागेल. स्पर्धा परीक्षा देणाऱ्यास अनुकूल काळ राहील. |
| वृश्चिक | व्यवसायामध्ये थोडा धीमेपणा जाणवेल.मानसिक ताण जाणवेल.प्रिय व्यक्तींशी वादविवाद टाळा. |
| धनु | व्यवसायामध्ये नवीन गुंतवणूक तूर्तास लांबणीवर पडण्याची शक्यता राहील. घरातील ज्येष्ठ मंडळींची आरोग्याची चिंता सतावेल. पचनाचे विकार उद्भवू शकतात. |
| मकर | कामानिमित्त छोटा प्रवास घडू शकतो. नोकरीमध्ये वरिष्ठांची मर्जी राहील. विवाहास उत्सुक मंडळींना अनुकूल दिवस. |
| कुंभ | आर्थिक गुंतवणूक करताना खबरदारी घेणे आवश्यक. स्वतःच्या बोलण्यावर संयम ठेवावा लागेल. जोडीदाराच्या आरोग्याच्या तक्रारी जाणवतील. |
| मीन | तुम्ही केलेल्या परिश्रमांचे चीज होईल. नोकरीमध्ये वरिष्ठांची मर्जी राहील.संतती बाबत शुभघटना घडतील. |

# निकाल — महाराष्ट्र गजलक्ष्मी मंगल विकली लॉटरी

महाराष्ट्र राज्य लॉटरी — सोडत संध्या. 4:45 वाजता
सोडत दर मंगळवार • सोडत क्रमांक 32 • तिकीट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 12/08/2025

पहिले बक्षिस रु. 10,000/- — **GL-04 : 8829**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 2263 | 2423 | 3449 | 3553 | 3986 | 5195 | 6891 | 8247 | 9088 | 9223 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 1371 | 1782 | 1904 | 3104 | 3381 | 4056 | 5526 | 6520 | 7633 | 9842 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 2470 | 3233 | 4500 | 6769 | 6952 | 7073 | 7609 | 9553 | 9648 | 9752 |

पाचवे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| पाचवे बक्षिस रु. | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 300/- | 0682 | 1680 | 2792 | 4040 | 5026 | 5844 | 6609 | 7545 | 8423 | 8987 |
| 0012 | 0730 | 1697 | 2876 | 4074 | 5140 | 5856 | 6618 | 7567 | 8460 | 9008 |
| 0015 | 0840 | 1708 | 2927 | 4100 | 5166 | 5901 | 6636 | 7617 | 8475 | 9038 |
| 0019 | 0845 | 1742 | 2984 | 4118 | 5171 | 5905 | 6655 | 7636 | 8489 | 9057 |
| 0025 | 0863 | 1911 | 3193 | 4240 | 5210 | 5913 | 6715 | 7655 | 8534 | 9097 |
| 0041 | 0975 | 2023 | 3268 | 4252 | 5264 | 5914 | 6734 | 7671 | 8546 | 9162 |
| 0050 | 1001 | 2152 | 3324 | 4267 | 5324 | 5951 | 6847 | 7676 | 8558 | 9241 |
| 0065 | 1017 | 2204 | 3331 | 4278 | 5341 | 5982 | 6863 | 7723 | 8589 | 9355 |
| 0141 | 1101 | 2208 | 3336 | 4358 | 5385 | 6016 | 6890 | 7746 | 8597 | 9359 |
| 0145 | 1109 | 2218 | 3375 | 4420 | 5389 | 6020 | 6936 | 7752 | 8622 | 9374 |
| 0167 | 1114 | 2249 | 3562 | 4440 | 5428 | 6114 | 6966 | 7817 | 8678 | 9400 |
| 0310 | 1221 | 2269 | 3577 | 4612 | 5432 | 6137 | 7039 | 7828 | 8734 | 9439 |
| 0319 | 1251 | 2271 | 3706 | 4726 | 5435 | 6167 | 7046 | 7854 | 8850 | 9444 |
| 0405 | 1296 | 2272 | 3735 | 4830 | 5515 | 6186 | 7171 | 7874 | 8851 | 9472 |
| 0464 | 1312 | 2283 | 3743 | 4838 | 5579 | 6235 | 7186 | 8073 | 8863 | 9518 |
| 0514 | 1330 | 2299 | 3755 | 4852 | 5642 | 6236 | 7247 | 8176 | 8867 | 9537 |
| 0518 | 1418 | 2360 | 3820 | 4883 | 5656 | 6269 | 7263 | 8248 | 8879 | 9539 |
| 0565 | 1421 | 2565 | 3873 | 4904 | 5668 | 6371 | 7295 | 8272 | 8926 | 9595 |
| 0590 | 1484 | 2653 | 3964 | 4949 | 5736 | 6460 | 7357 | 8377 | 8973 | 9900 |
| 0670 | 1519 | 2711 | 3973 | 4964 | 5770 | 6468 | 7377 | 8383 | 8978 | 9928 |
| 0680 | 1563 | 2767 | 3980 | 4979 | 5841 | 6548 | 7405 | 8388 | 8986 | 9999 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# शुभ राशी दि. १३/०८/२०२५

| | | |
|---|---|---|
| ९ | २ | ७ |
| ९१ | २४ | ७४ |
| ९६ | २९ | ७९ |
| १२८ | १३८ | १२४ |
| ३६० | ३४५ | ४५८- |

# लॉटरी

## महाराष्ट्र पद्मीनी विकली लॉटरी

महाराष्ट्र राज्य लॉटरी — सोडत दर मंगळवारी — तिकीट किंमत रु. 50/- — सोडत क्र. 32 — सोडत दिनांक 12/08/2025

पहिले सामाईक बक्षिस रु. 8 लाख — **PM-03 : 7651**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 5000/- — **3243** — महाराजा असोसिएट्स - इचलकरंजी

| बक्षिस | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 1098 | 1271 | 3451 | 5742 | 7040 | 7188 | 7529 |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 1714 | 1721 | 2455 | 3313 | 3578 | 4719 | 7727 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 1893 | 3438 | 4197 | 4586 | 4660 | 5576 | 5812 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 1801 | 3906 | 3957 | 4154 | 7314 | 7455 | 7729 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| सातवे बक्षीस रु.100/- (सर्व मालिकांसाठी) | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1635 | 2270 | 2745 | 3333 | 3932 | 4407 | 4841 | 5425 | 5845 | 6384 | 6766 | 7333 |
| | | 1642 | 2283 | 2754 | 3339 | 3935 | 4412 | 4848 | 5484 | 5875 | 6387 | 6786 | 7407 |
| | | 1643 | 2285 | 2783 | 3347 | 3937 | 4416 | 4849 | 5501 | 5907 | 6408 | 6799 | 7427 |
| 1001 | 1211 | 1711 | 2289 | 2802 | 3351 | 3939 | 4418 | 4860 | 5509 | 5913 | 6412 | 6826 | 7434 |
| 1011 | 1215 | 1731 | 2292 | 2810 | 3359 | 3955 | 4429 | 4875 | 5511 | 5922 | 6433 | 6827 | 7469 |
| 1015 | 1237 | 1748 | 2319 | 2824 | 3365 | 3990 | 4433 | 4878 | 5518 | 5923 | 6457 | 6845 | 7471 |
| 1021 | 1250 | 1767 | 2323 | 2825 | 3373 | 3994 | 4440 | 4886 | 5536 | 5935 | 6460 | 6859 | 7473 |
| 1035 | 1258 | 1775 | 2327 | 2832 | 3377 | 3999 | 4442 | 4904 | 5541 | 5942 | 6465 | 6865 | 7475 |
| 1044 | 1259 | 1787 | 2336 | 2898 | 3395 | 4008 | 4444 | 4909 | 5546 | 5944 | 6466 | 6879 | 7494 |
| 1060 | 1260 | 1804 | 2346 | 2923 | 3403 | 4011 | 4461 | 4913 | 5553 | 5957 | 6486 | 6884 | 7543 |
| 1065 | 1262 | 1805 | 2363 | 2946 | 3423 | 4012 | 4463 | 4948 | 5556 | 5970 | 6536 | 6886 | 7565 |
| 1077 | 1271 | 1812 | 2365 | 2952 | 3438 | 4040 | 4466 | 4986 | 5558 | 5980 | 6538 | 6896 | 7610 |
| 1091 | 1296 | 1889 | 2400 | 2955 | 3439 | 4042 | 4469 | 4990 | 5566 | 5996 | 6562 | 6900 | 7612 |
| 1098 | 1301 | 1894 | 2406 | 2963 | 3453 | 4048 | 4471 | 4991 | 5567 | 5997 | 6564 | 6906 | 7619 |
| 1100 | 1309 | 1910 | 2409 | 2968 | 3464 | 4066 | 4486 | 5056 | 5569 | 6006 | 6602 | 6916 | 7621 |
| 1110 | 1311 | 1919 | 2421 | 2979 | 3483 | 4084 | 4496 | 5090 | 5593 | 6022 | 6614 | 6960 | 7627 |
| 1116 | 1315 | 1920 | 2435 | 2992 | 3527 | 4119 | 4515 | 5110 | 5612 | 6036 | 6619 | 6972 | 7632 |
| 1118 | 1318 | 1982 | 2439 | 3003 | 3537 | 4120 | 4530 | 5124 | 5646 | 6045 | 6624 | 6988 | 7657 |
| 1121 | 1331 | 2009 | 2477 | 3021 | 3538 | 4125 | 4557 | 5145 | 5647 | 6048 | 6628 | 6995 | 7661 |
| 1123 | 1340 | 2019 | 2487 | 3031 | 3555 | 4127 | 4560 | 5158 | 5649 | 6076 | 6631 | 6999 | 7669 |
| 1124 | 1351 | 2020 | 2499 | 3085 | 3558 | 4144 | 4565 | 5174 | 5653 | 6082 | 6634 | 7010 | 7679 |
| 1125 | 1383 | 2053 | 2506 | 3093 | 3573 | 4146 | 4576 | 5175 | 5654 | 6096 | 6642 | 7071 | 7707 |
| 1134 | 1387 | 2072 | 2521 | 3108 | 3580 | 4154 | 4628 | 5177 | 5655 | 6100 | 6657 | 7075 | 7743 |
| 1137 | 1411 | 2112 | 2525 | 3121 | 3597 | 4240 | 4634 | 5193 | 5664 | 6120 | 6669 | 7077 | 7758 |
| 1144 | 1421 | 2123 | 2530 | 3130 | 3634 | 4262 | 4640 | 5200 | 5666 | 6131 | 6675 | 7087 | 7770 |
| 1148 | 1434 | 2128 | 2585 | 3141 | 3636 | 4283 | 4647 | 5204 | 5689 | 6150 | 6681 | 7089 | 7787 |
| 1149 | 1481 | 2132 | 2614 | 3169 | 3727 | 4300 | 4654 | 5218 | 5702 | 6166 | 6688 | 7090 | 7797 |
| 1157 | 1485 | 2137 | 2619 | 3190 | 3752 | 4313 | 4661 | 5223 | 5723 | 6181 | 6693 | 7095 | 7798 |
| 1161 | 1519 | 2151 | 2622 | 3235 | 3763 | 4317 | 4682 | 5231 | 5724 | 6186 | 6695 | 7103 | 7804 |
| 1166 | 1531 | 2168 | 2632 | 3249 | 3774 | 4319 | 4689 | 5246 | 5734 | 6203 | 6699 | 7112 | 7853 |
| 1172 | 1558 | 2172 | 2634 | 3263 | 3780 | 4328 | 4694 | 5250 | 5739 | 6212 | 6701 | 7140 | 7873 |
| 1175 | 1561 | 2209 | 2662 | 3268 | 3788 | 4332 | 4714 | 5251 | 5762 | 6216 | 6711 | 7148 | 7879 |
| 1180 | 1565 | 2224 | 2696 | 3283 | 3845 | 4334 | 4724 | 5255 | 5776 | 6230 | 6713 | 7176 | 7887 |
| 1182 | 1570 | 2245 | 2715 | 3297 | 3850 | 4344 | 4741 | 5269 | 5794 | 6235 | 6716 | 7197 | 7907 |
| 1185 | 1585 | 2247 | 2723 | 3304 | 3852 | 4349 | 4743 | 5300 | 5812 | 6269 | 6718 | 7223 | 7952 |
| 1194 | 1591 | 2248 | 2725 | 3307 | 3863 | 4359 | 4798 | 5347 | 5821 | 6309 | 6720 | 7246 | 7974 |
| 1198 | 1611 | 2249 | 2726 | 3313 | 3899 | 4364 | 4809 | 5353 | 5832 | 6326 | 6750 | 7247 | 7976 |
| 1200 | 1627 | 2250 | 2728 | 3320 | 3917 | 4384 | 4825 | 5375 | 5835 | 6340 | 6753 | 7316 | 7987 |
| 1207 | 1631 | 2262 | 2730 | 3322 | 3919 | 4400 | 4829 | 5394 | 5838 | 6348 | 6761 | 7329 | 7997 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

### वाचकांना सूचना

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी.- मॅनेजर, 'नवाकाळ'

# निकाल — महाराष्ट्र सह्याद्री

महाराष्ट्र राज्य लॉटरी — • महालक्ष्मी विकली लॉटरी • — सोडत सायं. 4:30 वाजता
सोडत दर मंगळवार • सोडत क्रमांक 32 • तिकीट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 12/08/2025

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- — **SM-04 : 3095**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 1000/- | 1142 | 1387 | 2045 | 2449 | 2587 | 3863 | 4495 | 5085 | 5433 | 5754 |
| तिसरे बक्षिस रु. 500/- | 1280 | 1835 | 1851 | 1927 | 2148 | 3822 | 3884 | 3923 | 5591 | 5773 |

चौथे बक्षीस रु. 400/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1126 | 2038 | 3163 | 3691 | 4782 |
| 1132 | 2114 | 3169 | 3738 | 5242 |
| 1165 | 2135 | 3206 | 3805 | 5243 |
| 1211 | 2164 | 3223 | 3873 | 5317 |
| 1327 | 2241 | 3311 | 4004 | 5438 |
| 1361 | 2262 | 3312 | 4043 | 5500 |
| 1376 | 2278 | 3326 | 4184 | 5587 |
| 1407 | 2300 | 3331 | 4190 | 5723 |
| 1584 | 2820 | 3337 | 4429 | 5769 |
| 1681 | 2863 | 3390 | 4524 | 5775 |
| 1707 | 3063 | 3422 | 4704 | 5899 |
| 1856 | 3136 | 3553 | 4752 | 5914 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# निकाल — गणेशलक्ष्मी शुभ विकली लॉटरी

महाराष्ट्र राज्य लॉटरी — सोडत सायं. 5:00 वाजता
सोडत दर मंगळवार • सोडत क्रमांक 32 • तिकीट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 12/08/2025

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- — **MG-04 : 7279**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 2000/- — **1229** (डायमंड कॉर्पोरेशन, बोरिवली), **1760** (किशोर लॉटरी सेंटर, सांगली), 6865, 8738, 9339

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0153 | 0715 | 1111 | 1460 | 1675 | 5750 | 6155 | 6428 | 7284 | 8057 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 1222 | 2851 | 3024 | 3320 | 3538 | 4051 | 4911 | 6057 | 6765 | 8613 |

पाचवे बक्षीस रु. 200/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 0030 | 0920 | 1641 | 2651 | 4049 | 4751 | 6024 | 7301 | 8391 | 9449 |
| 0066 | 1007 | 1642 | 2655 | 4248 | 4800 | 6067 | 7371 | 8468 | 9494 |
| 0089 | 1025 | 1818 | 2755 | 4295 | 4968 | 6158 | 7414 | 8494 | 9496 |
| 0092 | 1028 | 2192 | 2824 | 4345 | 5052 | 6262 | 7495 | 8810 | 9501 |
| 0243 | 1140 | 2260 | 2934 | 4363 | 5099 | 6498 | 7545 | 8885 | 9549 |
| 0295 | 1211 | 2281 | 3090 | 4387 | 5170 | 6623 | 7635 | 8968 | 9577 |
| 0298 | 1271 | 2329 | 3166 | 4418 | 5347 | 6647 | 7674 | 8972 | 9706 |
| 0306 | 1332 | 2416 | 3313 | 4426 | 5383 | 6669 | 7702 | 9024 | 9797 |
| 0381 | 1372 | 2462 | 3344 | 4552 | 5395 | 6726 | 7724 | 9049 | 9868 |
| 0400 | 1406 | 2482 | 3399 | 4563 | 5478 | 6765 | 7788 | 9190 | 9904 |
| 0727 | 1407 | 2499 | 3692 | 4614 | 5537 | 6815 | 7884 | 9193 | 9948 |
| 0822 | 1481 | 2586 | 3716 | 4658 | 5628 | 6850 | 8028 | 9318 | 9970 |
| 0892 | 1486 | 2620 | 3809 | 4674 | 5818 | 7122 | 8189 | 9324 | 9992 |
| 0905 | 1624 | 2622 | 3914 | 4744 | 5921 | 7160 | 8247 | 9388 | 9996 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# दहशतवादी पन्नूची १५ ऑगस्टला दिल्लीत ट्रेन उडवून देण्याची धमकी

■ अमृतसर

**खलिस्तानी** समर्थक संघटना शीख फॉर जस्टिसचा दहशतवादी गुरपतवंत सिंग पन्नू हा त्याचा साथीदार जश्नप्रीत सिंगच्या कथित एन्काउंटरमुळे संतापला आहे. त्याने १५ ऑगस्ट रोजी दिल्लीला जाणाऱ्या गाड्यांवर हल्ला करण्याची धमकी दिली आहे. त्याने लोकांना त्या दिवशी अशा रेल्वेने प्रवास करू नये, असा इशारा दिला.

पन्नूने जारी केलेल्या व्हिडिओत पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांच्यावर थेट आरोप करत, खलिस्तानी समर्थकांवर मान सरकारने पहिली गोळी चालवल्याचा दावा केला. त्याने आपला साथीदार जश्नप्रीत सिंगच्या कथित एन्काउंटरला बनावट आणि राज्य-पुरस्कृत दहशतवाद म्हटले व बदला घेण्याची घोषणा केली. मुख्यमंत्री मान यांच्या परदेश दौऱ्याची माहिती देणाऱ्यास बक्षीस देण्याची घोषणाही त्याने केली. पन्नूने लोकांना पंजाबमधील फरीदकोट येथे होणाऱ्या तिरंगा कार्यक्रमापासून दूर राहण्याचेही आवाहन केले असून, हा सूड देशभर व परदेशात घेतला जाईल, असा इशाराही दिला आहे. या धमकीमुळे सुरक्षा यंत्रणा सज्ज झाली असून, प्रवाशांनी सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

जश्नप्रीत सिंगने त्याच्या साथीदारांसह अमृतसर, शिवला मंदिर बाग भैया, कछेरी परिसर आणि खालसा कॉलेजमध्ये तीन ठिकाणी खलिस्तान समर्थक घोषणा दिल्या होत्या. अमृतसरमध्ये खलिस्तान समर्थक भित्तिचित्रे रंगवल्याचा आरोप असलेल्या जश्नप्रीत सिंगला शस्त्रास्त्र जप्तीसाठी नेले जात असताना पोलिसांशी झालेल्या चकमकीत तो जखमी झाला.

देश विदेश

# कोलंबियाचे राष्ट्राध्यक्षपदाचे उमेदवार उरीबे यांचे निधन

■ बोगोटा

**कोलंबियाचे** राष्ट्राध्यक्षपदाचे उमेदवार मिगुएल उरीबे यांचे निधन झाल्याने एकच हळहळ व्यक्त होत आहे. ७ जून रोजी निवडणूक प्रचारादरम्यान ३९ वर्षीय उरीबे यांच्यावर ३ गोळ्या झाडण्यात आल्या. त्यापैकी २ गोळ्या डोक्यात लागल्या. त्यांनी गेल्या वर्षी ऑक्टोबर महिन्यात २०२६ ची राष्ट्राध्यक्षपद निवडणूक लढवण्याची घोषणा केली होती.

मी देवाला प्रार्थना करते की, मला तुमच्याशिवाय जगण्याचा मार्ग दाखवावा, असे उरीबे यांची पत्नी मारिया क्लॉडिया टाराझोना यांनी एक्सवर पोस्ट केली. कोलंबियन पोलिसांनी जुलैमध्ये या प्रकरणात ५ संशयितांना अटक केली होती, ज्यात एका १५

# दक्षिण कोरियात सैनिकांची संख्या २० टक्क्यांनी घटली

■ सोल

**दक्षिण** कोरियाच्या लष्करात गेल्या ६ वर्षांत २० टक्क्यांची घट झाली. सैनिकांची संख्या ४,५०,००० वर आली असून अशीच परिस्थिती कायम राहिल्यास देशाला अनेक अडचणींचा सामना करावा लागणार असल्याचे संरक्षण मंत्रालयाने रिपोर्टमध्ये म्हटले. २००० च्या दशकाच्या सुरुवातीपासून दक्षिण कोरियाच्या लष्करात सातत्याने घट राहिली आहे. त्यावेळी दक्षिण कोरियाच्या सैन्यात ६ लाख ९० हजार सैनिक होते. २०१० च्या दशकाच्या उत्तरार्धात सैनिकांच्या संख्येत आणखी कमी झाली. २०१९ मध्ये दक्षिण कोरियाच्या लष्करात ५.६३,००० सैनिक होते. मात्र आता सैनिकांचा आकडा ४,५०, ००० वर पोहोचला. संरक्षण सज्जता राखण्यासाठी लष्कराकडे ५० हजार जवानांची कमतरता असल्याचे मंत्रालयाने म्हटले आहे.

# तुळजाभवानी गाभाऱ्यात उंदरांचा मुक्त संचार

■ धाराशिव

**महाराष्ट्राची** कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी मंदिरात उंदरांनी धुमाकूळ घातला आहे. तुळजाभवानी मातेच्या गाभाऱ्यातच उंदरांचा संचार असल्याचे दिसले आहे. गुजरातच्या भावनगर येथील हितेश भाई जानी या भाविकाला ऑनलाईन दर्शनादरम्यान हा प्रकार निदर्शनास आला. मंदिर रात्री बंद झाल्यानंतर गाभाऱ्यात उंदीर मुक्तपणे वावरत असल्याचे यात स्पष्ट दिसले.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांकडून किशोर कदमांच्या तक्रारीची दखल

■ मुंबई



**मराठी** अभिनेते व कवी किशोर कदम यांनी अंधेरीतील आपल्या राहत्या घराच्या धोक्याबाबत फेसबुक पोस्ट करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मदतीचे आवाहन केले होते. त्यांच्या या तक्रारीची दखल फडणवीस यांनी घेतली आहे.

किशोर कदम पोस्टमध्ये म्हणाले की, अंधेरी (पूर्व) चकाला परिसरातील हवा महल सोसायटीच्या पुनर्विकासात मोठ्या प्रमाणावर फसवणूक आणि भ्रष्टाचार सुरू आहे. त्यांच्यासह आणखी २३ सभासदांच्या घरांवरही टांगती तलवार आहे. कमिटी सभासदांची दिशाभूल केली आहे. कमिटीतील सदस्यांनी महत्त्वाची कागदपत्रे लपवून आणि अर्धवट माहिती देऊन या महत्त्वाच्या ठिकाणी असलेल्या इमारतीचा विकास झोपडपट्टी पुनर्वसनअंतर्गत करण्याचा निर्णय घेतल्याचे नुकतेच समोर आले आहे.

कदम यांच्या पोस्टला उत्तर देत फडणवीस म्हणाले की, किशोरजी, आपली ही तक्रार मी सहकार सचिव प्रवीण दराडे आणि एसआरएचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेंद्र कल्याणकर यांना सांगितली असून, त्यांना यात लक्ष घालण्यास सूचित केले आहे. ते आपल्याशी संपर्कात राहतील.

# सोलापूर-पुणे-मुंबई हवाई मार्गासाठी सरकार निधी देणार

■ मुंबई

**सोलापूर-पुणे-मुंबई** या मार्गावर हवाई सेवा सुरळीत सुरू राहण्यासाठी व्यवहार्य अंतर सहकार्य निधी देण्याचा निर्णय राज्य सरकारने आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेतला. या मार्गावरील हवाई सेवा आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य ठेवणे आणि प्रवाशांना सातत्याने सेवा उपलब्ध करून देणे, यासाठी हा निधी देण्यात आला आहे.

सोलापूर, पुणे आणि मुंबई या तीनही शहरांमध्ये व्यापारी, औद्योगिक आणि वैद्यकीय कारणांसाठी मोठ्या प्रमाणावर प्रवास होतो. सोलापूरमध्ये हवाई सेवा सुरळीत राहण्यासाठी सरकारी सहाय्याची आवश्यकता भासते. याच पार्श्वभूमीवर हा प्रस्ताव ठेवला आणि तो मंत्रिमंडळ बैठकीत मंजूर झाला.



**मीरा-भाईंदर कुस्तीगीर संघ रजिस्टर संचालित श्री गणेश आरवाडा यांच्यावतीने पैलवान संपतराव साळुंखे शिवछत्रपती पुरस्कार विजेते व मुंबई उपनगर जिल्हा तालीम संघाचे अध्यक्ष यांची महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेवर विभागीय सचिव निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. त्याचप्रमाणे विनायक गाढवे, सरचिटणीस मुंबई उपनगर जिल्हा तालीम संघ यांची महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेवर कार्यकारी सदस्य म्हणून निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला.**

# देवभूमी विकासाकडून विनाशाकडे

**उत्तरकाशीत धराली येथे मोठी ढगफुटी झाली. हाहाःकार उडाला. किती मृत्युमुखी पडले, किती अतिवृष्टी व पुरात वाहून गेले, किती ढिगाऱ्याखाली गाडले गेले याचा आकडा चार दिवसांनंतरही समजला नाही. ढगफुटीनंतर संपूर्ण डोंगरच खाली कोसळला नि अख्खे गावच धरणीच्या उदरात गडप झाले. ढगफुटीनंतर निसर्गाचा कोप होऊन डोंगरच कोसळून गावाला घेऊन गेल्याची ही काही पहिलीच घटना नव्हे. आता गावच शिल्लक नाही तर तिथे शोधणार तरी काय? सापडणार तरी काय? घरेदारे, इमारती, वस्त्या सारेच ढगफुटीत वाहून गेले.**



**डॉ. सुकृत खांडेकर**

उत्तराखंड ही देशात देवभूमी म्हणून ओळखली जाते. गेल्या काही वर्षांत निसर्गाचा वारंवार कोप झेलणारी संकट भूमी बनली आहे. अतिवृष्टी, जमीन खचणे, जमीन दुभंगणे, ढगफुटी, महापूर, नदीचा मार्ग बदलणे अशा संकटांनी देवभूमीला घेरले आहे. दरवर्षी पावसाळ्यात देवभूमीतील एक तरी गाव उजाड होत आहे. निसर्गाच्या कोपापुढे सरकार हतबल झाल्यासारखे दिसत आहे. जनता मात्र असहाय्य व अस्वस्थ आहे

सन २०१३ मधे उत्तराखंडवर असेच नैसर्गिक संकट कोसळले होते. पण त्यापासून सरकारने काहीच बोध घेतला नाही असे म्हणावे लागेल. उत्तर प्रदेशचे विभाजन करून ९ नोव्हेंबर २००० रोजी उत्तराखंड राज्याची निर्मिती करण्यात आली. राज्यात तेरा जिल्हे असून २०११ च्या जनगणनेनुसार १ कोटी ११ लाख लोकसंख्या आहे. भागिरथी, अलकनंदा, गंगा, यमुना असा मोठ्या व पवित्र नद्यांचे उगमस्थान असलेली देवभूमी हे देशातील कोट्यवधी भाविकांचे श्रध्दास्थान आहे. उत्तरखंड स्वतंत्र राज्य निर्माण होण्याअगोदर या प्रदेशात झाडे तोडायला मनाई होती. नद्यांच्या काठावर हॉटेल्स किंवा निवासी बांधकामाला मनाई होती. मात्र स्वंतत्र राज्य झाल्यापासून नद्यांच्या किनाऱ्यांवर हॉटेल्सच्या रांगा उभ्या राहिल्या आहेत. निवासी इमारतींची सर्वत्र गर्दीच गर्दी आहे. आजही पाच हजार गावात पोचायला रस्ते नाहीत, पण पर्यटन व धार्मिक स्थळांच्या परिसरात इमारती, रस्ते, हॉटेल्स, दुकाने, सर्व सेवा-सुविधांची गर्दीच गर्दी आहे.



ज्याला विकास म्हटले जाते, अशा अनेक योजना उत्तराखंडमधे राबवल्या जात आहेत. बांधकामे जोरात आहेत. उंच इमारती उभारल्या जात आहेत. सर्वत्र झाडांची बेसुमार कत्तल चालू आहे. इमारती व रस्ते उभारण्यासाठी सुरूंग लावून डोंगर खोदले जात आहेत. डोंगर फोडून मोठ मोठे बोगदे खणले जात आहेत. हे सर्व पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी व पर्यटन व्यवसायाला भरभराट यावी या हेतूने बांधकामे चालू आहेत. हिमालयाच्या कुशीत असलेल्या देवभूमीवर सिमेंट काँक्रीट व सुरूंगाचा अत्याचार चालू आहे. चौफेर इमारतींचे भार लादले जात आहेत.

देवभूमीत रोज हजारो मोटारी, बसेस आणि हजारोच्या संख्येने पर्यटक येत असतात. त्यांच्या सोयी-सुविधांसाठी रस्ते, इमारती, हॉटेल्स, मोटेल्सची सर्वत्र बांधकामे चालू आहेत. ही मालिका गेली दोन दशकांहून अधिक काळ चालूच आहे. कितीही इमारती, रस्ते, हॉटेल्स उभारली तरी कुणाचेच समाधान होत नाही. देवभूमीला जसे पर्वतांनी घेरले आहे तसेच पर्यटकांच्या गर्दीमुळे प्लास्टिकचे ढीग जिकडे तिकडे बघायला मिळत आहेत. वाहनांची गर्दी, मोटारींच्या रांगांनी देवभूमीच्या पर्यावरणावर घाला घातला आहे. सर्वत्र वाहतुकीची कोंडी आहे. उन्हाळ्यातही उत्तराखंडमधील जनतेला कधी घरात, कार्यालयात वा दुकानात पंखा लावण्याची गरज भासत नव्हती. आता सर्वत्र दिवस-रात्र एअर कंडिशन्ड चालू असतात. एअर कंडिशन्डशिवाय एक दिवसच काय, पण एक तासही राहू शकत नाही, अशा पर्यटकांनी देवभूमीत गर्दी केली आहे.

देवभूमीत बाहेरच्या धनाढ्य लोकांनी जमिनी खरेदी करण्याचा सपाटा लावला आहे. जमिनीच्या खरेदी-विक्रीवर कोणतेही ठोस निर्बंध नाहीत. जमिनी खरेदी करायच्या व बंगले किंवा घरे बांधायची ही तर फॅशनच बनली आहे. गेल्या काही वर्षांत देशातील अन्य शहरांप्रमाणे येथेही हौसिंग कॉलनीज उभ्या राहू लागल्या आहेत. अन्य राज्यातील लोक देवभूमीत फ्लॅट खरेदी करीत आहेत. हे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. परप्रांतीयांच्या अतिक्रमणामुळे स्थानिक संस्कृती आणि भाषा यावर गंडातर आल्याची चर्चा सुरू झाली आहे. एकेकाळी उत्तराखंड हा प्रदेश साधू-संतांची भूमी म्हणून ओळखला जात होता आणि उत्तराखंडला रिअल इस्टेट माफियांनी वेढले आहे. येथील सामान्य जनतेच्या मालकीच्या जमिनी कवडीमोल भावाने खरेदी केल्या जात आहेत. गरीब जनतेची लूट केली जात असतानाही सरकार मौनीबाबाच्या भूमिकेत आहे, याचेच मोठे आश्चर्य वाटते.

दिल्ली ते उत्तराखंड एक्स्प्रेस वे उभारण्यात येणार आहे. याचा दुसरा अर्थ उत्तराखंडचे प्रवेशव्दार केवळ भाविकांनाच किंवा पर्यटकांना नव्हे तर धनाढ्य लोकांना खुले केले जाणार आहे. एक्स्प्रेस वे म्हणजे विकासाचा मार्ग अशा वल्गना केल्या जात आहेत, पण देवभूमीला तो विनाशाकडे नेणारा ठरेल असे पर्यावरण रक्षकांना वाटते आहे. आजच रोज हजारो मोटारी देवभूमीत येऊन धडकत आहेत. दिल्ली-उत्तराखंड एक्स्प्रेस वे झाल्यानंतर दर शनिवार-रविवारी आणि सुट्टीच्या दिवशी लाखो मोटारी देवभूमीच्या पर्वतांवर धावत येतील. त्यातून पर्यावरण उद्ध्वस्त होईल आणि देवभूमीचे व्यापारीकरण झालेले बघायला मिळेल. यात स्थानिक माणूस, स्थानिक भाषा, स्थानिक परंपरा, शांतता, सुव्यवस्था, पर्यावरण, निसर्ग सौंदर्य सर्वकाही विनाशाकडे जाईल.

उत्तराखंड या पर्वतीय राज्याची क्षमता किती आहे, लोकांची गर्दी आणि वाहनांची संख्या किती असावी यावर कुठे नियंत्रण नको का? देवभूमीतील काँक्रीटची बांधकामे थांबवावीत अशा मागणीने जोर धरला आहे. विकास योजनांचा भार देवभूमी किती सहन करू शकणार, याचीही मर्यादा ओळखून त्याचे उल्लंघन होणार नाही यासाठी कठोर लक्ष्मणरेषा आखणे जरूरीचे आहे. जमिनीच्या खरेदी-विक्रीवर कडक निर्बंध लादणे आवश्यक आहे. स्थानिक लोकांच्या भागीदारीशिवाय कोणताही निर्णय घेता येणार नाही हे तत्व पाळले तर परप्रांतीयांचे अतिक्रमण व स्थानिकांची गळचेपी थोपवता येईल अशी देवभूमी बचाव म्हणणाऱ्यांची भावना आहे.

जलवायू संकट आणि पर्यावरण जागृकता याचे शिक्षण शाळेपासूनच मुलांना देण्याची वेळ आली आहे. झाडे केवळ प्राणवायू देत नाहीत तर पर्वतांचा भक्कम आधार असतात आणि नदी केवळ पाणी देत नाही तर त्या जीवन देतात अशी शिकवणूक बालपणापासून देणे गरजेचे आहे. पर्वतांच्या रांगा म्हणजे दगडांचे डोंगर नसतात तर ती इतिहास, भूगोल आणि संस्कृतीची प्रतिके असतात ही शिकवणूक मुलांच्या मनावर बिंबवली पाहिजे.

ढगफुटीमधे धराली गाव जमीनदोस्त झाले तेव्हा गावाबाहेर असलेले व वाचलेले लोक आपल्या कुटुंबियांना चिखलातून, दलदलीतून आणि दगड धोंड्यांच्या ढिगातून शोधण्यासाठी जीवाचे रान करीत होते. धरालीवर आलेले संकट ही काही शेवटची घटना नव्हे, विकासाच्या नावाखाली देवभूमीवर यापुढेही अतिक्रमण व अत्याचार राहणार असतील तर हल्द्वानी, देहराडून किंवा मसुरी, कोणतेच गाव किंवा शहर सुरक्षित राहणार नाही.

# पायल तडवी प्रकरणी विशेष सरकारी वकिलांची पुन्हा नियुक्ती होईल का?

■ मुंबई

**हायकोर्टाचा सवाल**

**नायर** रुग्णालयातील डॉ. पायल तडवी आत्महत्येशी संबंधित खटल्यातून प्रसिद्ध वकील प्रदीप घरत यांना हटवल्याबाबत उच्च न्यायालयाने काल सोमवारी नाराजी व्यक्त केली. घरत यांची या खटल्यात पुन्हा विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती करता येईल का, असा सवाल उच्च न्यायालयाने सरकारला केला आहे. याबाबत उद्या बुधवारपर्यंत भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले.

डॉ. पायल यांना आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याप्रकरणी डॉ. भक्ती मेहरे, डॉ. अंकिता खंडेलवाल आणि डॉ. हेमा अहुजा यांच्यावर विशेष न्यायालयात खटला दाखल आहे. या प्रकरणामध्ये सुरुवातीपासून घरत हे विशेष सरकारी वकील म्हणून काम पाहत होते. परंतु, काही महिन्यांपूर्वी राज्य सरकारने त्यांना खटल्यातून हटवले. सरकारच्या या निर्णयामुळे वाद निर्माण झाला होता. डॉ. तडवी यांच्या आई आबेदा यांनी वकील लारा जेसानी यांच्यातर्फे उच्च न्यायालयात धाव घेऊन सरकारच्या निर्णयाला आव्हान दिले आहे. सरकारचा निर्णय मनमानी आणि बेकायदेशीर असून, त्यामुळे खटल्याला विलंब होऊ शकतो आणि महत्त्वाचे पुरावे गमावण्याचा धोका निर्माण होऊ शकतो.

# रास्त दर दुकान चालकांना दिलासा! नफा मर्यादेत वाढ

■ मुंबई

**मुंबई- राज्यातील** रास्त दर दुकान चालकांना दिलासा देणारा निर्णय सरकारने आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेतला. सार्वजनिक वितरण प्रणालीअंतर्गत अन्नधान्य वाटप करताना दुकानदारांना मिळणाऱ्या नफ्यात वाढ केली जाणार आहे. यामुळे दुकान चालकांचे आर्थिक स्थैर्य वाढण्यास मदत होऊन शिधापत्रिकाधारकांना अन्नधान्याचे वितरण अधिक प्रभावी व नियमितपणे होईल. राज्यातील शिधापत्रिका धारकांना तांदूळ, गहू, साखर आदी अत्यावश्यक अन्नधान्याचे वितरण दरमहा सार्वजनिक वितरण प्रणालीद्वारे केले जाते.



संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर
संपादकीय
नवा काळ
।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# पाकिस्तानने स्वत:चा गळा सांभाळावा

ऑपरेशन सिंदूरनंतर प्रचंड दुखावला गेलेला पाकिस्तान या ना त्या मार्गाने नैराश्यातून बाहेर पडण्याचा प्रयत्न करतो आहे. जगातला कोणताही देश त्याला जवळ करण्याच्या मनस्थितीत नाही. कारण पूर्णपणे दहशतवाद जोपासणाऱ्या या देशाला जवळ करणे म्हणजे पुन्हा दहशतवादाच्या चक्रव्यूहात अडकणे हे जगातल्या सगळ्या प्रमुख राष्ट्रांच्या लक्षात आलेले आहे. आणि म्हणूनच कोणताही देश पाकिस्तानशी खूप सख्य किंवा मैत्री करायला तयार नाही. अगदी चीन जरी त्यांचा सख्खा दोस्त असला तरी तो फार जपून आणि मोजून मापूनच पाकिस्तानला मदत करत असतो. सध्या अमेरिकेकडून आपल्याला घसघशीत मदत मिळावी यासाठी पाकिस्तान वारंवार अमेरिकेला जाऊन आपला भिकेचा कटोरा फिरवतो आहे. परंतु अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे सुद्धा कोणत्या वेळी कशा प्रकारची कोलांटउडी मारतील याचादेखील भरोसा नाही. परंतु तूर्तास भारतावर लादलेल्या टेरिफ प्रकरणाच्या संदर्भात आणि भारताने ऑपरेशन सिंदूरला कोणताही मध्यस्थ नव्हता असे जाहीर केल्यानंतर दुखावलेले ट्रम्प भारताच्या बाजूने बोलताना दिसत नाहीत. त्यांना भारताचा शत्रू पाकिस्तान थोडा जवळचा वाटतो आहे आणि म्हणून वारंवार अमेरिकेची वारी करणारे पाकचे लष्करप्रमुख जनरल मुनीर यांनी अमेरिकेच्या भूमीवरून भारताला धमकावण्याचा नवा प्रकार सुरू केलेला आहे. जणू काही अमेरिकेचे आपल्याला फार मोठे पाठबळ आहे आणि आपण ज्या धमक्या देत आहोत त्या अमेरिकेच्या सल्ल्यानुसार देत आहोत किंवा या धमक्यांना अमेरिकेचा पाठिंबा आहे असे वातावरण निर्माण करण्याचा त्यांचा प्रयत्न दिसतो. अलीकडेच त्यांनी आपल्या अमेरिका भेटीत असा काही चित्र-विचित्र इशारा दिला की, ते ऐकून जगातल्या अनेक राष्ट्रांनी मुनीर यांचे ताळतंत्र सुटले असल्याचाच निष्कर्ष काढलेला आहे. अमेरिकेच्या दौऱ्यावर असताना मुनीर म्हणाले की, आम्ही जर बुडणारच असू तर अर्धे जग बरोबर घेऊन आम्ही बुडू! आमच्याकडे अण्वस्त्र क्षमता आहे आणि आम्ही भारताच्या प्रमुख केंद्रांवर हे अण्वस्त्र टाकण्याचा निर्णय करू शकतो. अलीकडे तर त्यांनी गुजरातच्या जामनगर येथील सर्वात मोठ्या रिफायनरीवरही हल्ला करण्याचा वाचाळपणा करून पाहिला. परंतु यापूर्वीच भारताने पाकिस्तानच्या या अण्वस्त्र धमक्यांच्या ब्लॅकमेलला भीक घातली जाणार नाही आणि भारत त्याला घाबरणार नाही, अशा प्रकारचे प्रत्युत्तर दिलेले आहे. आता पुन्हा तीच खेळी करून आपले महत्त्व वाढवण्याचा मुनीर प्रयत्न करत आहेत.

### मुनीर यांचे हसीन सपने

एक तर ऑपरेशन सिंदूरच्या दरम्यान जनरल मुनीर यांची पूर्णपणे नाचक्की झालेली आहे. कोणत्याही परिस्थितीत आपल्याला ही गेलेली प्रतिष्ठा कशी मिळेल यासाठी त्यांचा खटाटोप सुरू आहे. त्यांच्या वारंवार होणाऱ्या अमेरिकेच्या फेऱ्या हा देखील त्याच खटाटोपीचा एक भाग ठरतो आणि म्हणूनच त्यांनी आता पुन्हा भारताला धमक्या देऊन आपण काहीतरी फार मोठा निर्णय घेऊ शकतो अशी वातावरण निर्मिती करण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु त्याला जगातला कोणता देश थारा देत नाही आणि भारताने तर अजिबातच त्याचा विचार केलेला नाही आणि भविष्यकाळामध्ये जर पाकिस्तानने अशा प्रकारचा काही उपद्व्याप करण्याचा प्रयत्न केला तर त्याची याच्यापेक्षाही मोठी किंमत मोजावी लागू शकते. म्हणूनच मुनीर यांनी जी काही बडबड केली आहे ती मुंगेरीलालच्या हसीन स्वप्नांप्रमाणेच म्हणावी लागेल. मुनीर यांचे हे हसिन सपने त्यांच्या देखत धुळीला मिळवण्याची पूर्ण क्षमता भारताकडे आहे. खरंतर ऑपरेशन सिंदूरनंतर त्यांनी शांत बसणे आणि शक्यतो भारताबरोबर संबंध सुधारण्याचा प्रयत्न करणे हा एकमेव मार्ग त्यांच्याकडे शिल्लक राहतो. परंतु आपण भारतापुढे वाकणार नाही असे वातावरण त्यांनी निर्माण करण्याचा प्रयत्न चालवलेला आहे. विशेष म्हणजे पाकिस्तानमधून सुद्धा मुनीर यांच्याविषयी आता फारसा विश्वास राहिलेला नाही. यासाठीच त्यांच्या या प्रयत्नांना फारसा पाठिंबा मिळण्याची शक्यता नाही आणि भविष्यकाळामध्ये येणाऱ्या धोक्याची पूर्ण शक्यता लक्षात घेऊन भारताने तयारी कायम ठेवलेली आहे. आता सुद्धा संरक्षणाच्या अनेक आघाड्यांवर भारताने अधिकाधिक सक्षमतेचा निर्धार व्यक्त केलेला आहे. आज जगातील तिसरी मोठी सैन्यशक्ती भारताकडे आहे आणि अशा सैन्य शक्तीकडे पाकिस्तानसारखा टीचभर देश जर वल्गना करत असेल तर त्याला त्याची क्षमता अजूनही लक्षात आलेली दिसत नाही.

### तोंडचे पाणी पळाले

भारताने सातत्याने शांततेची आणि संयमाची भूमिका स्वीकारलेली आहे. आता सुद्धा ऑपरेशन सिंदूर काळामध्ये पाकिस्तानातील दहशतवादी ठिकाणे नाहीशी करणे एवढेच उद्दिष्ट ठेवले होते आणि ते काही मिनिटांमध्ये यशस्वी करून दाखवले. पाकिस्तानातल्या कुठल्याही नागरी स्थळांना किंवा आर्थिक ठिकाणांना टार्गेट केले गेले नाही. आतासुद्धा भारताने पाकिस्तानचे पाणी थांबवण्याचा एवढ्यासाठीच निर्णय घेतला की, पाकिस्तान तिथला दहशतवाद रोखण्यासाठी कोणताही पुढाकार घेताना दिसत नाही आणि म्हणूनच भारताने टेरर आणि वॉटर हे एकाच वेळी चालू शकणार नाहीत असा स्पष्ट इशारा दिला. जर पाकिस्तानने टेरर थांबवला तरच त्यांना वॉटर सुरू केले जाईल अशा प्रकारची स्पष्ट भूमिका घेतलेली आहे. यामुळे पाकिस्तानच्या तोंडचे पाणी पळाल्यानेच आता त्यांना इकडे तिकडे तहान भागवण्यासाठी धावाधाव घ्यावी लागते आहे. जर का जागतिक परिस्थितीचा विचार केला तर भारताबरोबर संबंध चांगले ठेवणे आणि आपल्या देशाची दहशतवादी प्रतिमा नाहीशी करणे हा त्यांच्यावर उपाय ठरतो. इतका मोठा तडाखा बसल्यानंतरही मुनीर यांनी काश्मीर ही पाकिस्तानच्या गळ्याची नस आहे असे उद्गार काढून काश्मीर विषयीचा संघर्ष आम्ही कायम ठेवू असा एक ऊटपटांगपणा करण्याचा प्रयत्न केलेला आहे. जर काश्मीर पाकिस्तानच्या गळ्याची नस असेल तर पाकिस्तानने स्वतःचा गळा सांभाळण्याचा प्रयत्न करावा. काश्मीरला पूर्णपणे भारताने सांभाळलेले आहे, काश्मीरची चिंता पाकिस्तानने करण्याची गरज नाही. पाकिस्तानलाच आता आपल्या भवितव्याची चिंता करण्याची आवश्यकता आहे.

## सुविचार

विलास कोळेकर
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

**मिळवणं आणि गमावणं याहीपेक्षा कठीण आहे,**
**ते जपणं आणि तेही शेवटपर्यंत.**

## पंचांग

**बुधवार, १३ ऑगस्ट २०२५**
**शक १९४७ विश्वावसुनामसंवत्सर**
**श्रावण कृष्ण चतुर्थी/पंचमी**
नक्षत्र : उत्तरा भाद्रपदा

रवी उदय- ०६-२०
रवी अस्त- १९-०६



-: जन्मराशी :-
००-०१ ते २४-०० मीन

**बुधपूजन; श्री टेंब्ये स्वामी महाराज जयंती;**
**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुण्यतिथी**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता १) दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८. २) एलिगंट ऑफसेट प्रिंटर्स प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं.एफ ७-१ आणि एफ ७-२/२, एमआयडीसी, शिरोली इंडस्ट्रीयल एरीया, शिरोली गाव, ता.हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर - ४१६१२२ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः navakal.1923@gmail.com
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at 1) Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. . 2) Elegant Offset Pvt. Ltd., Address : Plot No.F7-1 & F7-2/2, M.I.D.C., Shiroli Industrial Area, Village Shiroli, Tal. Hatkanagle, Dist Kolhapur-416122. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती

### शिंगाडा पिठाचे लाडू



★ **साहित्य :-**
१/४ कप घट्ट तूप (पातळ असेल तर १/४ कपपेक्षा जास्त आणि १/२ कपपेक्षा थोडे कमी)
१/२ कप शिंगाडा पीठ, १/२ कप पिठीसाखर
१/२ टिस्पून वेलचीपूड
१ टिस्पून खारीक पूड (ऐच्छिक)
१ टिस्पून सुकं भाजलेले खोबरे (ऐच्छिक)

★ **कृती :-**
१) कढईत तूप गरम करून त्यात शिंगाडा पीठ खमंग भाजून घ्यावे. शेवटी सुके खोबरे आणि खारीक पूड घालून एखाद मिनिट परतावे.
२) भाजलेले पीठ गरम असतानाच त्यात साखर, वेलची पूड घालून लाडू वळावेत.

# आशियाई मुष्टीयुद्ध स्पर्धेत भारताला २७ पदके

**बँकॉक इथे झालेल्या आशियाई मुष्टीयुद्ध स्पर्धेत भारताच्या रितीकाने १९ वर्षांखालील व २२ वर्षांखालील स्पर्धेत ८० किलोहून अधिक वजनी गटात सुवर्णपदक पटकावले. या स्पर्धेत भारताने विविध श्रेणीत एकूण २७ पदके पटकावली आहे. भारतीय संघ आघाडीवर राहिला.**



■ बँकॉक

भारताने १९ वर्षांखाली गटात ३ सुवर्ण, ७ रौप्य व ४ कांस्य पदकांसह एकूण १४ पदके पटकावली. तर २२ वर्षांखालील गटात १ सुवर्ण, ४ रौप्य व ८ कांस्य पदकासह १३ पदके जिंकली. महिलांच्या ५७ किलो वजनी गटात यात्री पटेलने, ६० किलो वजनी गटात प्रिया, पुरुषांच्या ७५ किलो वजनी गटात नीरज व ९० किलो वजनी गटात इशान कटारिया ने सुवर्णपदक पटकावले. या स्पर्धेत १९ वर्षांखाली गटात भारतीय संघ दुसऱ्या स्थानावर राहिला. त्याचप्रमाणे २२ वर्षांखालील श्रेणीत चौथा क्रमांक पटकावला. १० दिवस चाललेल्या या स्पर्धेत भारतातील ४० मुष्टीयौद्ध्यांनी २० हून अधिक श्रेणींमधील सामन्यात भाग घेतला. या वर्षाच्या सुरुवातीला झालेल्या १५ वर्षांखालील व १७ वर्षांखालील आशियाई चॅम्पियन स्पर्धेत भारताने ४३ पदके जिंकली होती.

## स्वातंत्र्यदिनी होणार शिवनेरी रोड रेस

■ मुंबई

येत्या स्वातंत्र्यदिनी दादर (पूर्व) येथील शिवनेरी सेवा मंडळातर्फे आयोजित शिवनेरी रोड रेसमध्ये ५००हून अधिक धावपटूंनी त्यांचा सहभाग निश्चित केला आहे. मुंबई शहर जिल्हा हौशी थलेटिक्स असोसिएशनच्या मान्यतेने होणाऱ्या रेसला सकाळी ६ वाजता शिंदेवाडी भवानीमाता मैदान, दादर (पूर्व) येथून सुरुवात होईल. १०, १२, १४, १६ वर्षांखालील मुला-मुलींच्या विविध वयोगटात होणाऱ्या रोड रेसमध्ये मुंबई शहरासह उपनगरांतील धावपटूंना प्रवेश देण्यात आला आहे.

## दिल्ली वेगवान बुद्धिबळ स्पर्धा दिव्या देशमुख उपांत्य फेरीत

■ नवी दिल्ली

नवी दिल्ली इथे सुरू असलेल्या जागतिक महिला वेगवान बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेत भारताची ग्रँडमास्टर दिव्या देशमुखने चीनच्या लेई टिंगजीला १०-३ असे हरवून उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. उपांत्य फेरीत आता तिचा मुकाबला चीनची ग्रँडमास्टर हाउ यीफान हिच्याशी होणार आहे. दिव्या देशमुखने नुकतीच जॉर्जिया इथे झालेली फिडे विश्वचषक स्पर्धा जिंकून इतिहास घडवला होता. हाउ यीफान बरोबरच्या सामन्यातही तिने सुरुवातीपासून आपला दबदबा कायम ठेवला. या स्पर्धेतून भारतीय खेळाडू आर वैशाली या आधीच बाहेर पडली आहे. या महिला वेगवान



बुद्धिबळ स्पर्धेत एकूण १६ खेळाडू भाग घेतात. त्यातील ८ पात्र व ८ निमंत्रित खेळाडू असतात. या स्पर्धेसाठी एकूण ७५ हजार अमेरिकन डॉलरची बक्षिसे असून, विजेत्या खेळाडूला ७ हजार अमेरिकन डॉलर मिळणार आहेत.

## फ्रेंडशिप क्रिकेट क्लब ज्येष्ठ सदस्यांचा सत्कार

■ ठाणे

ठाणे येथील फ्रेंडशिप क्रिकेट क्लबचे जेष्ठ सदस्य हरेश्वर मोरेकर यांचा क्लबच्या वतीने नुकताच सत्कार करण्यात आला. या क्लबची स्थापना १९६० साली चेंदणी कोळीवाड्यातील कुंभारवाडा मेदानावर झाली होती. तेव्हापासून क्लबशी संबंधित असलेल्या ४० जणांचा सत्कार करण्यात आला. ठाण्याच्या या क्लबने अनेक खेळाडू घडवले असून त्यांनी ठाणे शहराच्या नावलौकिकात भर घातल्याची भावना यावेळी आयोजकांनी व्यक्त केली.

## ग्रो गोविंदा २०२५ ची विक्रमाची नोंद

■ मुंबई



मुंबईतील वडाळा येथे झालेल्या दहीहंडी स्पर्धेत जय जवान गोविंदा पथकाने यशस्वीरित्या ९ थर रचल्याबद्दल त्यांची नोंद वर्ल्ड रेकॉर्ड्स बुक ऑफ इंडियामध्ये करण्यात आली. या दहीहंडी स्पर्धेत १७० गोविंदा पथकांनी भाग घेतला. नायगावमधील भारतीय क्रीडा मंदिर येथे ग्रो गोविंदा २०२५ या स्पर्धेचे आयोजन आराध्य लोकसेवा प्रतिष्ठान व विजय पंढरीनाथ तांडेल यांच्यातर्फे करण्यात आले होते. याची नोंद घेण्यासाठी वर्ल्ड रेकॉर्ड्स बुक ऑफ इंडियाच्या मुख्य संपादक सुषमा नार्वेकर उपस्थित होत्या. या विक्रम पुस्तकाच्या नियमाप्रमाणे १५३ मंडळांनी सलग साडेपाच तास एकाच दिवशी एकाच ठिकाणी यशस्वी मनोरे लावत विश्वविक्रम केला.
या स्पर्धेची सुरुवात मुंबईतील दहीहंडी चे सर्वात जुने बंड्या मारुती मंडळ यांच्याकडून झाली. ग्रो गोविंदा २०२५ ही मानाची दहीहंडी फोडण्याचा मान चुनाभट्टी प्रेम नगर मंडळाला मिळाला. तसेच जय जवान गोविंदा पथकाने यशस्वीपणे नऊ थर लावले.

## वैभव सूर्यवंशी विशेष सराव शिबिरात दाखल

■ बंगळुरु



आयपीएल स्पर्धेत अवघ्या ३५ षटकांत शतक झळकावलेल्या वैभव सूर्यवंशीच्या भारतीय एकदिवसीय व टी-२० संघात सामील होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. बीसीसीआयने त्याला बंगळुरु येथील विशेष सराव शिबिरासाठी बोलावले असून. तो १० ऑगस्टला बंगळुरु येथे दाखल झाला आहे. भारतीय संघ येत्या २१ सप्टेंबरपासून ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यावर जात असून, या दौऱ्यासाठी त्याला सेंटर ऑफ एक्सलन्स येथील विशेष सरावासाठी बोलावण्यात आले. रोहित शर्मा व विराट कोहली हे वन डे क्रिकेटमधून निवृत्त होण्याच्या शक्यतेमुळे भविष्यातील तजवीज म्हणून त्याला बोलावण्यात आले आहे. बीसीसीआय सध्या जुन्या खेळाडूंची जागा भरून काढणाऱ्या नव्या खेळाडूंच्या तयारीत गुंतलेले असून, त्यासाठी हे विशेष सराव शिबीर आयोजित करण्यात आले आहे. वैभवने भारतीय कसोटी संघाबरोबर इंग्लंडचा दौरा केला होता. त्यात तो विशेष चमक दाखवू शकलेला नसला तरी मर्यादित षटकांच्या सामन्यांमध्ये त्याची आकडेवारी प्रभावी आहे. त्यामुळे येत्या काळात तो भारताचा एक आघाडीचा फलंदाज होऊ शकतो असा बीसीसीआयला विश्वास आहे.

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**जाहीर सुचना**

२२/२२ के.व्ही. पायोनिअर (मेट्रो) स्विचींग स्टेशन मधून निघणाऱ्या खालील वाहिन्या देखभाल व दुरूस्तीचे कामाकरिता दि.१४.०८.२०२५ रोजी खाली दिलेल्या वेळेत बंद राहणार असुन या काळात कल्याण (पूर्व) विभागामधील खालील परिसरातील विद्युत पुरवठा पुर्णपणे बंद राहील याची ग्राहकांनी नोंद घ्यावी व म.रा.वि.वि.कंपनीस सहकार्य करावे ही विनंती.

| वाहिनीचे नाव | वेळ | प्रभावित क्षेत्र |
|---|---|---|
| २२ के.व्ही. चक्की नाका वाहिनी क्रं. ३०५ | १०.०० ते १६.३० | चक्की नाका, गावदेवी रोड, जनता फाऊंड्री, राय रेसिडन्सी, रचना पार्क |

कार्यकारी अभियंता, कल्याण (पूर्व) विभाग

**अनुसूची II**
**फॉर्म बी**
**जाहीर उद्घोषणा**
*(भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ (परिसमापन प्रक्रिया) विनियमन, २०१६ चे विनियमन १२)*

**विन ट्रेंड्झ एक्झिम प्रायव्हेट लिमिटेडच्या भागधारकांचे लक्ष वेधण्याकरिता**

| अ.क्र. | तपशील | वर्णन |
|---|---|---|
| १. | **कॉर्पोरेट ऋणकोचे नाव** | विन ट्रेंड्झ एक्झिम प्रायव्हेट लिमिटेड |
| २. | कॉर्पोरेट ऋणकोच्या स्थापनेचा दिनांक | २५.०७.२००५ |
| ३. | प्राधिकरण ज्या अंतर्गत कॉर्पोरेट ऋणकोची स्थापना/नोंदणीकरण झाले | कंपनी निबंधक, मुंबई |
| ४. | कॉर्पोरेट ऋणकोचा कॉर्पोरेट ओळख क्रमांक/ मर्यादित दायित्व ओळख क्रमांक | U72100MH2005PTC155043 |
| ५. | कॉर्पोरेट ऋणकोच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा (जर असल्यास) पत्ता | खार लोटिया पॅलेस, १ला मजला, लिंकिंग रोड, खार पश्चिम, मुंबई, महाराष्ट्र, भारत, ४०००५२. |
| ६. | दिवाळखोरी ठराव प्रक्रिया परिसमाप्तीचा दिनांक | ११ ऑगस्ट, २०२५ |
| ७. | कॉर्पोरेट ऋणकोचे परिसमापन सुरु होण्याचा दिनांक | ११ ऑगस्ट, २०२५, म्हणजेच एनसीएलटी रजिस्ट्रीमधून कॉर्पोरेट ऋणकोच्या परिसमापनाकरिता दिनांक ८ ऑगस्ट, २०२५ रोजीच्या आदेशाची प्रत प्राप्त झाल्याचा दिनांक. |
| ८ | परिसमापक म्हणून काम पाहणाऱ्या दिवाळखोरी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणीकरण पत्ता | श्री. अनिल सीताराम वैद्य नोंदणी क्र.: IBBI/IPA-002/IP-N00067/2016-2017/10145 |
| ९ | मंडळाकडे नोंदणीकृत असलेला परिसमापकाचा पत्ता आणि ई-मेल | पत्ताः प्लॉट क्र. १०७, सर्व्हे क्र. ६२/६५, महात्मा सोसायटी, भुसारी कॉलनी, कोथरूड, पुणे - ४११०३८. ईमेलः anilvaidya38@gmail.com |
| १० | परिसमापकासह पत्रव्यवहाराकरिता वापरावयाचा पत्ता आणि ई-मेल | पत्ताः प्लॉट क्र. १०७, सर्व्हे क्र. ६२/६५, महात्मा सोसायटी, भुसारी कॉलनी, कोथरूड, पुणे - ४११०३८. ईमेलः anil.wtepl25@gmail.com |
| ११ | दावा सादर करण्याचा अंतिम दिनांक | १० सप्टेंबर, २०२५ |

याद्वारे सूचना देण्यात येते की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ यांनी विन ट्रेंड्झ एक्झिम प्रायव्हेट लिमिटेडचे परिसमापन सुरू करण्याचे आदेश दि. ११ ऑगस्ट, २०२५ रोजी, म्हणजेच एनसीएलटी रजिस्ट्रीमधून कॉर्पोरेट ऋणकोच्या परिसमापनाकरिता दिनांक ८ ऑगस्ट, २०२५ रोजीच्या आदेशाची प्रत प्राप्त झाल्याचा दिनांकास दिले आहेत.
विन ट्रेंड्झ एक्झिम प्रायव्हेट लिमिटेडच्या भागधारकांना याद्वारे त्यांचे दावे दि. १० सप्टेंबर, २०२५ रोजी किंवा त्यापूर्वी परिसमापकाकडे बाब क्र. १० समोर नमूद पत्यावर सादर करण्यास सांगण्यात येत आहे.
वित्तीय धनको यांनी दाव्याबाबतचे त्यांचे पुरावे फक्त इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करावे. इतर सर्व भागधारकांनी त्यांचे दाव्याबाबतचे पुरावे व्यक्तिशः, टपालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करावे.
दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.
**(अनिल सीताराम वैद्य)**
**परिसमापक**
**दिनांकः १३.०८.२०२५, ठिकाणः पुणे**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E –TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification.**

| Sr. No. | Tender / Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1 | **Tender No:-** EE/EHV (O&M) /DIVN/MHD/Tech/ E-Tender-17/2025-26 Dtd: 13.08.2028 RFx No. 7000037133 | **Sub.:-** Invitation SRM E-tender for Servicing & alignment of 245kV, 145kV and 36kV Isolators at 220kV Kandalgaon Substation, 220kV Mahad Substation & 100kV Roha Substation under EHV (O&M) Division Mahad. | Rs. up to 15,00,000/- (Including GST+ 1% Labour CESS) |
| | **Tender No:-** EE/EHV (O &M ) /DIVN/MHD/Tech/ E-Tender-18/2025-26 Dtd.13.08.2025 RFx No. 7000037257 | **Sub.:-** Invitation SRM E-tender for the work of cutting & chopping tree in hilly and dense forest area at various 220kV/100kV D/C on D/C,S/c on D/C & S/C on S/C EHV lines under EHV (O&M) Division Mahad for FY 2025-26. | Rs. up to 24,98,641/- (Including GST+ 1% Labour CESS) |

EMD will be the 1% of the estimated cost or 5000/- whichever is the highest & tender fee will be the 500/- + GST
**Bid submission is from 13.08.2025 @ 00:00 hrs to 27.08.2025 @23:59Hrs for above tender**
For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The Addl.Executive Engineer, (O) : Phone No.8793505100
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL
-Sd-
**Executive Engineer (I/c), EHV(O&M) Dn. Mahad**

## गणपतीपुळे मंदिरात पारंपरिक पोशाखातच दर्शनाचे आवाहन

■ रत्नागिरी

**कोकणातील** प्रसिद्ध तीर्थक्षेत्र गणपतीपुळे येथील स्वयंभू गणपती मंदिरात भाविक व पर्यटकांनी भारतीय हिंदू संस्कृतीला साजेसा पारंपरिक पोशाख परिधान करूनच देवदर्शन करावे, असे आवाहन मंदिर प्रशासनाने केले आहे. मंदिराबाहेर याबाबत सूचना फलक लावले आहेत. हा नियम सक्तीचा नसून पावित्र्य राखण्यासाठीची विनंती असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. भाविकांनी सभ्य, अंगभर वस्त्र व भारतीय संस्कृतीला साजेसा पोशाख घालूनच दर्शनाला यावे, असे प्रशासनाने सांगितले आहे.

## कबुतरांना खाद्य देणाऱ्यांवर गुन्हे दाखल करा

■ नवी दिल्ली

### सुप्रीम कोर्टाचे आदेश

**आदेशाचे** उल्लंघन करत कबुतरांना सार्वजनिक ठिकाणी दाणे घालणाऱ्यांविरोधात गुन्हे दाखल करा, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने काल दिले.

न्या. जे. के. माहेश्वरी आणि न्या. विजय बिश्नोई यांच्या खंडपीठाने हा आदेश दिला. मुंबई उच्च न्यायालयाचे आदेश डावलून दादरच्या कबुतरखान्याच्या ठिकाणी आंदोलन करून पालिकेने घातलेले ताडपत्रीचे आच्छादन जमावाने फाडून कबुतरांना दाणे टाकल्याबद्दल न्यायालयाने तीव्र संताप व्यक्त केला. अशा प्रकारे न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांबाबत कोणतीही सहानुभूती दाखवण्याची गरज नाही. त्यांच्याविरूध्द गुन्हे दाखल करावेत, असे न्यायालयाने ठणकावून सांगितले. मुंबईतील कबुतरखाने बंद करण्याच्या मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयाला आव्हान देणारी याचिका काही पक्षीप्रेमींनी केली होती. या याचिकेवर सुनावणीप्रसंगी न्यायालयाने उच्च न्यायालयाच्या निर्णयामध्ये हस्तक्षेप करण्यास नकार दिला. उच्च न्यायालयाच्या आदेशात सुधारणा करण्याची मागणी उच्च न्यायालयातच करा, असे निर्देश न्यायालयाने दिले. सर्वोच्च न्यायालयाच्या या आदेशानंतर आता मुंबई महानगरपालिकाही आक्रमक झाली आहे. पालिकेने दादरच्या कबुतरखान्यावर पुन्हा ताडपत्री टाकली असून, यावेळी ताडपत्री फाडणाऱ्यांच्या विरोधात पालिका थेट पोलिसांत तक्रार दाखल करणार आहे. तसेच सार्वजनिक ठिकाणी कबुतरांना दाणे देणाऱ्यांवरही पालिकेच्या वतीने कारवाई करण्यात येणार आहे.

## दिल्लीतील जुन्या वाहनांवर कारवाई नको सर्वोच्च न्यायालयाचे सरकारला आदेश

■ नवी दिल्ली

**दिल्ली** राजधानी परिसरात (एनसीआर) जुन्या वाहनांवर तूर्त कोणतीही कायदेशीर कारवाई करू नये, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने आज दिल्ली सरकारच्या याचिकेवरील सुनावणीदरम्यान दिले. १० वर्षांवरील डिझेल वाहनांवर आणि १५ वर्षांवरील पेट्रोल वाहनांवर दिल्ली राजधानी परिसरात बंदी घालण्यात आली आहे.

राष्ट्रीय हरित लवादाने २०१५ रोजी राजधानीतील हवा प्रदूषण कमी करण्याच्या दृष्टीने हा आदेश दिला असून, दिल्ली सरकारने या आदेशाला आव्हान दिले आहे. दिल्ली सरकारच्या या आव्हान याचिकेवर सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या अध्यक्षतेखालील त्रिसदस्यीय खंडपीठासमोर सुनावणी झाली. त्याप्रसंगी जुन्या वाहन मालकांवर तूर्त कोणतीही कठोर कारवाई करू नये, असे निर्देश न्यायालयाने दिले.

## मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलसाठी १४ ऑगस्टला आमरण उपोषण

■ सावंतवाडी



### सावंतवाडीत ग्रामस्थांचे आ.केसरकरांना निवेदन

**तालुक्यातील** कारिवडे येथील एका ३२ वर्षीय तरुणाच्या अपघाती मृत्यूनंतर या गावचे ग्रामस्थ संतप्त झाले आहेत.सावंतवाडीत मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल उभारण्यात यावे, अशी आग्रही मागणी करत या ग्रामस्थांनी येत्या १४ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरू करण्याचा जाहीर इशारा दिला आहे.

यासंदर्भातील एक निवेदन कारिवडे गावातील १०९३ ग्रामस्थांनी आमदार दीपक केसरकर यांना दिले. या निवेदनात ग्रामस्थांनी म्हटले आहे की, कारिवडे येथील ३२ वर्षीय तरुण के. परशुराम प्रकाश पोखरे यांचा अलीकडे अपघातात मृत्यू झाला. या अपघातानंतर त्यांना सावंतवाडी उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले असता, वेळेवर डॉक्टरच उपलब्ध नव्हते. प्रथमोपचार उशिरा मिळाले. त्यानंतर नेहमीप्रमाणे 'गोवा, बांबोळीला न्या' अशीच सूचना डॉक्टरांनी केली. सुविधायुक्त रुग्णवाहिका वेळेत मिळाली नाही. अखेर रुग्णाला गोव्याला नेत असतानाच त्याने वाटेतच प्राण सोडला. त्यामुळे ग्रामस्थांचा संताप अनावर झाला आहे. तरी शासनाने मंजूर केलेले मल्टीस्पेशालिस्ट हॉस्पिटल सावंतवाडीत तातडीने सुरू झाले असते तर आज एका तरुणाचा प्राण वाचला असता. त्यामुळे आता या हॉस्पिटलच्या मागणीसाठी आम्ही १०९३ ग्रामस्थ गुरुवार १४ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू करणार आहे. या निवेदनाच्या प्रति पालकमंत्री नितेश राणे आणि जिल्हा पोलीस अधीक्षक, तहसीलदार, जिल्हा वैद्यकीय अधिकारी यांना देण्यात आल्या आहेत.

## जितेंद्र आव्हाडांची गाडी भाजपा कार्यकर्त्यांनी अडवली

■ धाराशीव

**राष्ट्रवादी** काँग्रेसचे प्रवक्ते जितेंद्र आव्हाड आज तुळजापूर येथील मंदिरात आले असता भाजपाच्या कार्यकर्त्यांनी त्यांची गाडी तब्बल वीस मिनिटे अडवून धरली. यावेळी पोलिसांनी हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी पोलिसांबरोबरही धक्काबुकी केली.



शेवटी राष्ट्रवादीचे कार्यकर्ते आल्यावर आव्हाडांची गाडी पुढे निघाली. तुळजापूर मंदिराच्या जीर्णोद्धारासंदर्भात मंदिराची पाहणी करण्यासाठी आज आव्हाड तुळजापूरला आले होते. यावेळी त्यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले की, मंदिराच्या आतील श्रद्धास्थानांना व मूळ इमारतीत कोणतेही काम करण्यात येऊ नये. या मंदिराच्या भिंती साडेचार फूट रुंदीच्या असून त्यावर कळस असल्याने तो मजबूत आहे. शासनाने मूळ मंदिर सोडून इतर कुठेही कोणत्याही प्रकारचा विकास करायला आमची काही हरकत नाही. मात्र बहुजनांच्या श्रद्धांना हात लावू नये. हे मंदिर प्राचीन असून ते मजबूत आहे. इथल्या प्रत्येक दगडाला शिवस्पर्श झालेला आहे.

## भाजपा-काँग्रेस पदाधिकारी उबाठात

■ मुंबई

**विदर्भ** आणि नवी मुंबईतील भाजपा, काँग्रेस तसेच इतर पक्षांचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आज उबाठामध्ये प्रवेश केला. मातोश्रीवर पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत या सर्वांनी शिवबंधन बांधले. महापालिका निवडणुकीपूर्वी नवी मुंबईत हा भाजपासाठी मोठा धक्का मानला जात आहे.नेरुळ आणि बेलापूरमधील भाजप, काँग्रेस आणि इतर पक्षांतील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी खासदार राजन विचारे यांच्या नेतृत्वाखाली पक्षप्रवेश केला.

## हायकोर्टातील खटल्यांची कागदपत्रे बंदोबस्तात कोल्हापुरात दाखल

**कोल्हापूर - मुंबई** उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंचच्या न्यायालयीन कामकाजाला सोमवार, १८ ऑगस्टपासून प्रारंभ होणार आहे. त्यासाठी कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांतील उच्च न्यायालयातील सर्वच खटल्यांचे कागदोपत्रांचे रेकॉर्ड काल सकाळपासून कोल्हापुरात आणण्यास प्रारंभ झाला आहे. मुंबई पोलिसांच्या बंदोबस्तात दोन ट्रकमधून सुमारे अडीच हजारांवर फायलींचे गठ्ठे सुरक्षितपणे आणण्यात आले.

**माननीय राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण**
**अहमदाबाद खंडपीठ, न्यायालय क्र. II यांच्या समक्ष**

कंपनी याचिका (आयबी) क्र. २३२ (एएचएम) २०२४
(नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ च्या कलम १० अन्वये)

**च्या बाबतीत:-**

सूर्या बेकरी ॲण्ड कॉन्फेक्शनरी प्रायव्हेट लिमिटेड ... कॉर्पोरेट ऋणको/याचिकाकर्ता

नोंद घ्यावी की, शीर्षकबद्ध विषय माननीय राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, अहमदाबाद खंडपीठ न्यायालय II यांच्या समक्ष दि. १८.०७.२०२५ रोजी सुनावणीकरिता आला होता. माननीय एनसीएलटी, अहमदाबाद खंडपीठ II यांनी सदर प्रकरण दि. २९ सप्टेंबर, २०२५ रोजी ठेवले आहे. माननीय न्यायाधिकरणाच्या निर्देशांनुसार, प्रतिवादींना व्यक्तिशः किंवा त्यांच्या प्राधिकृत प्रतिनिधींद्वारे उपस्थित राहण्यास सूचित करण्याकरिता सदर अधिसूचना वृत्तपत्रामधून पारित करण्यात येत आहे, याची कृपया नोंद घ्यावी.

युनायटेड एन्टरप्राईजेस, त्यांचा उपलब्ध पत्ता - बीएमसी महानगर पालिका वाहनतळ, ६ए, २रा मजला, जेके सावंत मार्ग, दादर, मुंबई ४०० ०२८ यांना जारी न करता आल्यामुळे सदर सूचना पारित करण्यात येत आहे.

शुभेच्छा,
मनोज कुमार मिश्रा
याचिकाकर्त्यांकरिता ॲडव्होकेट
एमएएच/७४६२/२०१७

**नाशिक महानगरपालिका, नाशिक**
**घनकचरा व्यवस्थापन (यांत्रिकी) विभाग**
**जाहिर ई- निविदा सुचना क्र. १ (सन २०२५-२६) चे शुध्दीपत्रक**

नाशिक महानगरपालिका, नाशिक घनकचरा व्यवस्थापन (यांत्रिकी) विभागाच्या विविध कामांकरीता डीईएच्या पॅनेलमधील नोंदणीकृत सल्लागाराची नेमणूक करणे कामी ई- निविदा मागविणे कामी ई- निविदा सुचना क्रमांक १ (सन २०२५-२६) दिनांक ०१/०८/२०२५ पासून दिनांक १२/०८/२०२५ रोजी दुपारी ४.०० वाजेपावेतो मा. शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्तळावर दिसेल. निविदा स्विकृतीची अंतिम दिनांक १२/०८/२०२५ असा होता. तो खालील प्रमाणे वाचण्यात यावा.

दिनांक १३/०८/२०२५ पासून दिनांक १८/०८/२०२५ रोजी दुपारी ४.०० वाजेपावेतो मा. शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्तळावर दिसेल. निविदा स्विकृतीची अंतिम दिनांक १८/०८/२०२५ दुपारी ४.०० वाजेपर्यंत.

टीप – यापुढील सर्व आवश्यक सुचना / शुध्दीपत्रक हे Online website वर प्रसिध्द करणेत येईल.

सही/-
अधिक्षक अभियंता (यां.)
नाशिक महानगरपालिका, नाशिक.

सही/-
आयुक्त तथा प्रशासक,
नाशिक महानगरपालिका, नाशिक

"पर्यावरण बचे, तो प्राण बचे ।" जनसंपर्क/जा.क्र./२१०/२०२५ दि. १२/०८/२०२५

## भाकड जनावरांच्या प्रश्नावरून संगमनेरमध्ये शेतकरी संतप्त

■ अहिल्यानगर

**राज्यातील** भाकड जनावरांच्या प्रश्नावरून शेतकऱ्यांमध्ये संताप उसळला असून, आज संगमनेरमध्ये आज शिवआर्मी शेतकरी संघटनेच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी भाकड जनावरांसह थेट प्रांत कार्यालयात घुसून आंदोलन केले. गोवंश हत्या बंदी कायद्यात सुधारणा करण्याची आणि भाकड जनावरे खरेदी योजना राबवण्याची मागणी त्यांनी केली.

शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, शेतीसाठी पाळलेली जनावरे जेव्हा भाकड होतात, तेव्हा त्यांचा कोणताही उपयोग राहत नाही. सध्याच्या कायद्यामुळे अशा जनावरांची खरेदी-विक्री बंद असल्याने त्यांचा सांभाळ करणे हा मोठा आर्थिक बोजा बनतो. विशेषतः जर्सी गाईंचे गोरे शेतीचे काम करू शकत नाहीत आणि वृद्ध जनावरे, तसेच दूध न देणारी जनावरांचे पालन शेतकऱ्यांना परवडत नाही.

## कुलाब्यातील २ शाळा बंद! ऑनलाईन शिक्षणाची सक्ती

■ मुंबई

**कुलाबा** येथील महापालिकेच्या दोन शाळांच्या इमारती धोकादायक घोषित करत त्या रिकाम्या केल्या आहेत. आता या दोन्ही शाळांमधील १५०० विद्यार्थ्यांना पालिकेने ऑनलाईन शिक्षण घेण्याची सक्ती केली आहे. परंतु यामध्ये काही अपरिहार्य कारणांमुळे ऑनलाईन शिक्षण घेऊ न शकणाऱ्या विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे. त्यामुळे या शाळांसाठी लवकर पर्यायी जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी माजी नगरसेवक मकरंद नार्वेकर यांनी पालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्याकडे एका पत्राद्वारे केली आहे.

कुलाबा येथील ए. एम. सावंत मार्ग येथील मुंबई पब्लिक स्कूलच्या संकुलातील दोन्ही इमारती धोकादायक घोषित करून रिकाम्या करण्यात आल्या आहेत. या दोन इमारतींमध्ये आठ माध्यमांच्या शाळा भरत होत्या. या शाळा बंद करताना विद्यार्थ्यांना पर्यायी जागा उपलब्ध करून दिली पाहिजे होती. मात्र, तसे न करता या विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षण देण्याचा निर्णय घेतला. या निर्णयामुळे अनेक विद्यार्थ्यांना अडचणी येत आहेत. ऑनलाईन शिक्षणाबाबत समस्या असलेल्या पालकांनी सांगितले की, जर एकाच शाळेत दोन मुले असतील तर आमच्याकडे त्यांच्यासाठी दोन फोन पाहिजेत. परंतु, ते आम्हाला शक्य नाही. वर्ग सुरू होण्यापूर्वी मुलांना १ तास आधी ऑनलाईन वर्ग सुरू होणार असल्याचे सांगितले जाते. मुले अभ्यासासाठी दिलेल्या फोनचा गैरवापर करू शकतात. त्यामुळे आम्हाला दिवसभर बसून त्यांची काळजी घ्यावी लागते.

**अलेम्बिक लिमिटेड**
सीआयएन : L26100GJ1907PLC000033
अलेम्बिक रोड, वडोदरा, गुजरात, ३९०००३
**भाग प्रमाणपत्र हरवल्याची सूचना**

येथे सूचना देण्यात येत आहे की, कंपनीने जारी केलेले खालील भाग प्रमाणपत्रे हरवले/गहाळ झाली आहेत किंवा चोरीला गेल्याचे सांगण्यात आले आहे आणि त्यांच्या नोंदणीकृत धारकांनी दुय्यम भाग प्रमाणपत्रे जारी करण्यासाठी कंपनीकडे अर्ज केला आहे.

| फोलिओ क्र. | प्रमाणपत्र क्र. | विशिष्ट क्र. | शेअर्सची संख्या | भागधारकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| ००८३३२३ | २५७३८ | १४१०४८०७० - १४१०५०८१९ | २७५० | बानू सोराब आलमशॉ |
| ००८३३२२ | २५७३७ | १४१०४७०२० - १४१०४८०६९ | १०५० | बानू सोराब आलमशॉ |
| ०००४२७८ | २५७८८ | १४११२३९६० - १४११२६०५९ | २१०० | सोराब आरदेशीर आलमशॉ आणि बानू सोराब आलमशॉ |

जनतेला याद्वारे इशारा देण्यात येत आहे की, वरील भाग प्रमाणपत्र खरेदी करण्यापासून किंवा कोणत्याही प्रकारे व्यवहार करण्यापासून रोखण्यासाठी. कोणा व्यक्तिस सदर भाग प्रमाणपत्राबाबत कोणताही दावा असल्यास ही सूचना प्रकाशित झाल्यापासून १५ दिवसांच्या आत कंपनीच्या वरील पत्त्यावर असलेल्या नोंदणीकृत कार्यालयात असा दावा दाखल करावा, त्यानंतर असा कोणताही दावा विचारात घेतला जाणार नाही आणि कंपनी दुय्यम भाग प्रमाणपत्र जारी करण्यास पुढे जाईल.

दिनांक: १३.०८.२०२५

**ओरिएंटल रेल इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड**
(पूर्वीची ओरिएंटल वेनीर प्रोडक्ट्स लिमिटेड)
सीआयएन: L35100MH1991PLC060686
नोंदणीकृत कार्यालय: सर्व्हे क्र. ४१, गाव अघई, कल्याण रेल्वे स्थानक मार्ग, ठाणे - ४२१ ३०१, महाराष्ट्र, भारत.
कॉर्पो. कार्यालय: १६, मस्करेन्हास रोड, माझगाव, मुंबई-४०० ०१०, महाराष्ट्र, भारत
दूरध्वनी क्र.: ०२२-६१३८९४०० फॅक्स क्र.: ०२२-६१३८९४०१
वेबसाईट: www.orientalrail.com ईमेल: compliance@orientalrail.co.in

**भागधारकांना ३४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना आणि ई-मतदानाची माहिती**

याद्वारे **सूचना** देण्यात येते की, दि. ३१ मार्च, २०२५ रोजी संपलेल्या वित्तीय वर्षाच्या वार्षिक अहवालाचा भाग असलेल्या एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केलेल्या व्यवसायाचे कामकाज करण्याकरिता ओरिएंटल रेल इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड (पूर्वीची ओरिएंटल वेनीर प्रोडक्ट्स लिमिटेड) ('कंपनी') च्या सदस्यांची ३४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा ('एजीएम') **गुरुवार, दि. ०४ सप्टेंबर, २०२५ रोजी दु. ०१.०० भारतीय प्रमाण वेळ ('भा.प्र.वे.') वाजता व्हिडियो कॉन्फरन्सिंग ('व्हीसी') / इतर दृक्-श्राव्य माध्यमे ('ओएव्हीएम') द्वारे** घेण्यात येणार आहे.

कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाद्वारे दिनांक ०८ एप्रिल, २०२०, १३ एप्रिल २०२०, ०५ मे, २०२०, १३ जानेवारी, २०२१, १४ डिसेंबर, २०२१, ५ मे, २०२२, २८ डिसेंबर, २०२२ रोजी पारित सर्वसाधारण परिपत्रक(के) क्र. १४/२०२०, १७/२०२०, २०/२०२०, ०२/२०२१, २१/२०२१, ०२/२०२२ आणि १०/२०२२ आणि त्यानंतर या संदर्भात पारित करण्यात आलेली परिपत्रके, अगदी अलीकडचे अनुक्रमे दि. २५ सप्टेंबर, २०२३ रोजीचे ०९/२०२३ (एकत्रितरित्या "एमसीए परिपत्रके" म्हणून उल्लेखित) आणि भारतीय प्रतिभूती आणि विनियमन मंडळाद्वारे पारित अनुक्रमे दिनांक १२ मे, २०२०, दि. १५ जानेवारी, २०२१, दि. १३ मे, २०२२, दि. ०५ जानेवारी, २०२३ आणि ७ ऑक्टोबर, २०२३ रोजीच्या परिपत्रक क्र. सेबी/एचओ/सीएफडी/सीएमडी१/सीआयआर/पी/२०२०/७९, सेबी/एचओ/सीएफडी/सीएमडी२/सीआयआर/पी/२०२१/११, सेबी/एचओ/सीएफडी/सीएमडी२/सीआयआरपी/पी/२०२२/६२, सेबी/एचओ/सीएफडी/पीओडी-२/पी/सीआयआर/२०२३/४ आणि सेबी/एचओ/सीएफडी/ सीएफडी-पीओडी-२/पी/सीआयआर/२०२३/१६७ (एकत्रितरित्या 'सेबी परिपत्रके' असे उल्लेखित) नुसार, वार्षिक अहवालासह एजीएमची सूचना, ज्या सदस्यांचे ई-मेल पत्ते कंपनी / आरटीए / डिपॉझिटरी पार्टिसिपन्ट्सकडे नोंदणीकृत आहेत त्यांना दि. १२ ऑगस्ट, २०२५ रोजी इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठविण्यात आली आहे.

कृपया नोंद घ्यावी की, ही कागदपत्रे कंपनीची वेबसाईट www.orientalrail.com, नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड ('एनएसडीएल')ची वेबसाईट www.evoting.nsdl.com आणि बीएसई लिमिटेडची ('बीएसई') वेबसाईट www.bseindia.com येथे अपलोड करण्यात आली आहेत.

कंपनी कायदा, २०१३ च्या कलम ९१ आणि सेबी (सूचिबद्धता दायित्वे आणि प्रकटीकरण आवश्यकता) विनियमन, २०१५ अन्वये, सदस्यांची नोंदवही आणि कंपनीचे भाग हस्तांतरण पुस्तक शुक्रवार, दि. २९ ऑगस्ट, २०२५ ते गुरूवार, दि. ०४ सप्टेंबर, २०२५ (दोन्ही दिवस समाविष्ट) पर्यंत कंपनीच्या एजीएमच्या कारणास्तव बंद राहतील.

कंपन्यांचे (व्यवस्थापन आणि प्रशासन) विनियमन, २०१४ चा नियम २०, सर्वसाधारण सभांवरील लिस्टींग रेग्युलेशन्स ॲण्ड सेक्रेटरीयल स्टॅण्डर्ड चे विनियमन ४४, प्रत्येकी सुधारणा केल्यानुसार, सह वाचावयाच्या कायद्याच्या कलम १०८ अन्वये कंपनी तिच्या सदस्यांना एजीएममध्ये कामकाज करावयाच्या व्यवसायासंबंधी दूरस्थ ई-मतदानाची सुविधा प्रदान करीत आहे. त्याव्यतिरिक्त, कंपनी एजीएमदरम्यान ई-मतदान प्रणालीद्वारे मतदानाची ("ई-मतदान") सुविधा प्रदान करीत आहे. सदस्याद्वारे दूरस्थ ई-मतदानाचा वापर करून तसेच एजीएमच्या दिनांकास मतदानाची सुविधा एनएसडीएलद्वारे प्रदान करण्यात येईल.

१. दूरस्थ ई-मतदान सोमवार, दि. ०१ सप्टेंबर, २०२५ रोजी (स. ०९.०० वा. भा.प्र.वे.) सुरू होईल आणि बुधवार, दि. ०३ सप्टेंबर, २०२५ रोजी (सायं. ०५.०० वा. भा.प्र.वे.) बंद होईल. दूरस्थ ई-मतदान यंत्रणा त्यानंतर ई-मतदानाकरिता एनएसडीएलद्वारे बंद करण्यात येईल. सदस्याद्वारे एकदा ठरावावर मत दिल्यानंतर, त्याला/तिला त्यानंतर ते बदलता येणार नाही.
२. ज्या सदस्यांचे नाव सदस्यांच्या नोंदवहीमध्ये किंवा डिपॉझिटरीजद्वारे राखण्यात येणाऱ्या लाभार्थी मालकांच्या नोंदवहीमध्ये कट-ऑफ दिनांकास म्हणजेच गुरूवार, दि. २८ ऑगस्ट, २०२५ रोजी नोंदविलेले असेल, ते दूरस्थ ई-मतदान तसेच एजीएममध्ये ई-मतदानाची सुविधा प्राप्त करण्यास पात्र असतील.
३. कोणताही व्यक्ती, ज्याने वार्षिक अहवाल पाठविल्यानंतर कंपनीचे भाग संपादन केले असतील आणि कंपनीचा सदस्य बनला असेल आणि कट-ऑफ दिनांकास भाग धारणा करीत असेल त्याने सूचनेमध्ये उल्लेखित प्रक्रियेचे पालन करून किंवा evoting@nsdl.co.in येथे ईमेल द्वारे विनंती पाठवून कंपनीस कळवावे.
४. भौतिक स्वरुपात भागधारणा करणारे किंवा ज्यांनी त्यांचे ईमेल पत्ते नोंदविलेले नाहीत असे सदस्य आणि ज्या सदस्यांनी एजीएमची सूचना पाठविल्यानंतर भाग संपादित केले आहेत आणि कट ऑफ दिनांकास म्हणजेच गुरूवार, दि. २८ ऑगस्ट, २०२५ रोजी भाग धारण करीत आहेत त्यांना विनंती आहे की, त्यांनी दूरस्थ ई-मतदानाद्वारे मत देण्याकरिता युजर आयडी आणि पासवर्ड प्राप्त करण्याकरिता वापरावयाच्या प्रक्रियेकरिता एजीएमची सूचना पहावी. तथापि, जर सदस्य याआधीच एनएसडीएलकडे दूरस्थ ई-मतदानाकरिता नोंदणीकृत असल्यास, सदस्य त्यांचा विद्यमान युजर आयडी आणि पासवर्ड वापरू शकतात.
५. **लाभांशासंबंधी माहिती:-**
संचालक मंडळाने, त्यांच्या मंगळवार, दि. २७ मे, २०२५ रोजी घेण्यात आलेल्या सभेमध्ये दि. ३१ मार्च, २०२५ रोजी संपलेल्या वित्तीय वर्षाकरिता दर्शनी मूल्य ₹ १/- प्रत्येकीच्या प्रत्येक इक्विटी समभागाकरिता ₹ ०.१०/- अंतिम लाभांशाची शिफारस केली आहे. इक्विटी समभागांवर लाभांश, एजीएममध्ये कंपनीच्या भागधारकांद्वारे जर मंजूर झाल्यास, प्राप्त करण्यास पात्र सदस्यांची पात्रता निश्चित करण्याकरिता रेकॉर्ड दिनांक गुरूवार, २८ ऑगस्ट, २०२५ आहे. ज्या भागधारकांचे नाव गुरूवार, २८ ऑगस्ट, २०२५ रोजी कामकाजाची वेळ समाप्त झाल्यावर कंपनीच्या सदस्य नोंदपट/डिपॉझिटरीजद्वारे सांभाळण्यात येणाऱ्या लाभार्थी स्थितीचे विवरणपत्रामध्ये आलेली आहेत त्यांना लाभांश प्रदान करण्यात येईल.
६. भौतिक स्वरुपात भागधारणा करणारे किंवा ज्यांनी अद्याप त्यांचे ईमेल पत्ते, मोबाईल क्रमांक आणि पत्त्यातील बदल अद्ययावत आणि बँक खात्याचा मॅण्डेटची नोंदणी केलेली नाही, अशा सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी त्यांचे पॅन, केवायसी तपशील व त्यासह बँक तपशील आणि नामनिर्देशन तपशील कंपनीच्या वेबसाईट https://www.orientalrail.com/downloads.php आणि आमच्या आरटीएची वेबसाईट https://www.adroitcorporate.com/RandTServices.aspx येथे उपलब्ध असलेले आयएसआर-१ फॉर्म आणि इतर संबंधित फॉर्म्स योग्यरित्या भरून ॲड्रॉईट कॉर्पोरेट सर्व्हिसेस प्रा. लि., कंपनीचे निबंधक आणि भाग हस्तांतरण एजन्ट (आरटीए) यांना पाठवून त्यांचा ई-मेल पत्ता अद्ययावत करावा.
७. ज्या सदस्यांनी दूरस्थ ई-मतदानाद्वारे त्यांचे मत याआधी दिलेले नसेल ते एजीएमदरम्यान ई-मतदानाची सुविधा ("ई-मतदान") वापरू शकतील.
८. सदस्य फक्त मतदानाची एकच पद्धत वापरू शकतो, म्हणजेच एकतर दूरस्थ ई-मतदानाद्वारे किंवा एजीएमदरम्यान ई-मतदान यंत्रणेद्वारे ("ई-मतदान").
९. जर मतदाराने दोन्ही पद्धतीने मत दिल्यास, ई-मतदानाद्वारे केलेले मतदान पात्र मानले जाईल.
१०. दूरस्थ ई-मतदान / एजीएममधील ई-मतदानाची प्रक्रिया ३४ व्या एजीएमच्या सूचनेमध्ये देण्यात आलेली आहे.

ई-मतदान योग्य आणि पारदर्शी पद्धतीने आयोजित करण्याकरिता श्री. शिव हरी जालान, प्रॅक्टीसिंग कंपनी सेक्रेटरी यांना स्क्रुटिनायझर म्हणून नियुक्त केले आहे.

निकाल एजीएम पार पडल्यापासून ४८ तासांमध्ये जाहीर केला जाईल. घोषित केलेला निर्णय घोषित केल्यानंतर लगेचच स्क्रुटिनायझरच्या अहवालासह कंपनीच्या वेबसाईट www.orientalrail.com आणि एनएसडीएलची वेबसाईट www.evoting.nsdl.com येथे प्रसिद्ध करण्यात येईल. त्याचवेळी कंपनी तो निकाल बीएसई लिमिटेड, जेथे कंपनीचे प्रतिभूती सूचिबद्ध आहेत, तेथे पाठवेल.

वर उल्लेखिलेल्या एमसीए परिपत्रकांच्या दृष्टीने, सदस्यांची भौतिक उपस्थिती नामंजूर करण्यात आलेली असल्यामुळे, ३४ व्या एजीएममध्ये सदस्यांद्वारे प्रॉक्झीच्या नेमणुकीची सुविधा उपलब्ध नसेल.

ज्या भागधारकांना त्यांची मते मांडावयाची असतील/ज्यांना काही शंका असतील, त्यांनी त्यांचे प्रश्न त्यांचे नाव, डिमॅट खाते क्रमांक / फोलियो क्रमांक, ईमेल आयडी, मोबाईल क्रमांक नमूद करून compliance@orientalrail.co.in येथे दि. २८ ऑगस्ट, २०२५ रोजीपर्यंत आगावू पाठवावे. त्याची कंपनीद्वारे योग्य उत्तरे दिली जातील.

ई-मतदानाबाबत कोणत्याही तक्रारी असल्यास, त्या नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड, ट्रेड वर्ल्ड, 'ए' विंग, ४ था मजला, कमला मिल्स कंपाऊंड, सेनापती बापट मार्ग, लोअर परेल, मुंबई ४०० ०१३, ईमेल: evoting@nsdl.co.in, येथे पाठवाव्या किंवा टोल फ्री क्र. १८०० १०२० ९९० आणि १८०० २२ ४४ ३० येथे संपर्क करावा.

ओरिएंटल रेल इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड करिता
सही/-
हेमाली रच्छ
कंपनी सचिव

ठिकाण: मुंबई
दिनांक: १२ ऑगस्ट, २०२५

## अजित पवार जनाची नाही तर मनाची तरी ठेवा!

■ धाराशिव

### विखे-पाटलांचे वादग्रस्त वक्तव्य

**जलसंपदा** मंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते राधाकृष्ण विखे-पाटील यांनी महायुतीतीलच घटक पक्ष राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)चे अध्यक्ष व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर जोरदार टीका केली. अजित पवार जनाची नाही, तर मनाची तरी लाज ठेवा, अशा शब्दांत विखे पाटलांनी हल्लाबोल केला.

धाराशिव जिल्हा दौऱ्यावर असताना शेतकऱ्यांना संबोधित करताना विखे पाटील यांनी साखर उद्योग व इथेनॉल धोरणाचा उल्लेख केला. ते म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांनी इथेनॉल धोरण राबवून साखर कारखान्यांना जीवदान दिले. या नेत्यांचे फोटो तरी कारखान्याच्या बॅनरवर लावा, किंवा सभेत अभिनंदनाचा ठराव घ्या. जीवदान देणाऱ्यांचे फोटो लावले जात नाहीत, त्यांचे अभिनंदनही होत नाही. अजित पवार, जनाची नाही, तर मनाची तरी ठेवावी.

## वैजनाथ बँकेच्या निवडणुकीत पंकजा मुंडेंचे वर्चस्व कायम

■ बीड

**बीडच्या** परळी वैजनाथ बँकेच्या निवडणुकीत मंत्री पंकजा मुंडे यांनी आपले वर्चस्व कायम राखत १७ पैकी १६ जागा जिंकल्या. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाच्या तिन्ही उमेदवारांचा दारुण पराभव झाला. वैजनाथ बँकेच्या संचालक मंडळासाठी परळीपासून मुंबईपर्यंतच्या ३६ मतदान केंद्रांवर शनिवारी मतदान पार पडले होते.

या निवडणुकीत एकूण ४३ हजार ९६२ मतदारसंख्येपैकी १६ हजार २८७ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. एकूण १७ जागांपैकी चार जागा पंकजा मुंडे व आमदार धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखालील लोकनेते गोपीनाथराव मुंडे जनसेवा पॅनलने आधीच बिनविरोध जिंकल्या होत्या. उर्वरित १३ जागांसाठी मतदान पार पडले.

**अलेम्बिक फार्मास्युटिकल्स लिमिटेड**
सीआयएन: L24230GJ2010PLC061123
अलेम्बिक रोड, वडोदरा, गुजरात, ३९०००३
**भाग प्रमाणपत्र हरवल्याची सूचना**

येथे सूचना देण्यात येत आहे की, कंपनीने जारी केलेले खालील भाग प्रमाणपत्रे हरवले/गहाळ झाली आहेत किंवा चोरीला गेल्याचे सांगण्यात आले आहे आणि त्यांच्या नोंदणीकृत धारकांनी दुय्यम भाग प्रमाणपत्रे जारी करण्यासाठी कंपनीकडे अर्ज केला आहे.

| फोलिओ क्र. | प्रमाणपत्र क्र. | विशिष्ट क्र. | शेअर्सची संख्या | भागधारकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| ००८३३२३ | ७३९० | ५७७९७६८२ - ५७८००४३१ | २७५० | बानू सोराब आलमशॉ |

जनतेला याद्वारे इशारा देण्यात येत आहे की, वरील भाग प्रमाणपत्र खरेदी करण्यापासून किंवा कोणत्याही प्रकारे व्यवहार करण्यापासून रोखण्यासाठी. कोणा व्यक्तिस सदर भाग प्रमाणपत्राबाबत कोणताही दावा असल्यास ही सूचना प्रकाशित झाल्यापासून १५ दिवसांच्या आत कंपनीच्या वरील पत्त्यावर असलेल्या नोंदणीकृत कार्यालयात असा दावा दाखल करावा, त्यानंतर असा कोणताही दावा विचारात घेतला जाणार नाही आणि कंपनी दुय्यम भाग प्रमाणपत्र जारी करण्यास पुढे जाईल.

दिनांक: १३.०८.२०२५

**फॉर्म जीचे दुसरे शुद्धीपत्रक**
**मुंबई, महाराष्ट्र आणि अहमदाबाद, गुजरात येथे मालमत्ता भाडेपट्टीवर देणे यामध्ये कार्यरत**
**ओजस ट्रेडलीज ॲण्ड मॉल मॅनेजमेन्ट प्रायव्हेट लिमिटेडकरिता स्वारस्य अभिव्यक्तीचे सुधारित आमंत्रण**
(भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ (कॉर्पोरेट व्यक्तींकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ३६ए च्या उप-विनियमन (१) अन्वये)

| अक्र | संबंधित तपशील | |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट ऋणकोचे नाव, पॅन आणि सीआयएन क्र. | ओजस ट्रेडलीज ॲण्ड मॉल मॅनेजमेन्ट प्रायव्हेट लिमिटेड सीआयएन: U70102MH2006PTC161887 |
| २. | नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता | दुकान क्र. ४५, तळमजला, एफ विंग, कृष्णा आर्केड, इमारत क्र. ११, यशवंत सृष्टी, खैरा, पालघर, महाराष्ट्र, भारत - ४०१५०१. |
| ३. | वेबसाईटचे यूआरएल | - |
| ४. | बहुसंख्य अचल संपत्ती असलेल्या जागेचा तपशील | कंपनी स्थावर मालमत्ता भाड्याने देण्याच्या व्यवसायामध्ये कार्यरत होती. अधिक तपशिलाकरिता, irp.ojas@aegisipe.com येथे ईमेल लिहावा. |
| ५. | मुख्य उत्पादने/सेवांची स्थापित क्षमता | कंपनीकडे ॲक्रोपोलिस मॉल, अहमदाबाद मध्ये ३ किरकोळ दुकाने, मोजमाप १.३३ लाख चौ.फू. आहेत. |
| ६. | गत वित्तीय वर्षामध्ये विक्री झालेल्या मुख्य उत्पादने/सेवांचे परिमाण आणि मूल्य | शुन्य |
| ७. | कर्मचारी/कामगारांची संख्या | शुन्य |
| ८. | गत उपलब्ध दोन वर्षांची वित्तीय विवरणपत्रे (वेळापत्रकासह), धनकोंची यादी समाविष्ट असलेले तपशील उपलब्ध असणारे यूआरएल: | अधिक तपशिलाकरिता, irp.ojas@aegisipe.com येथे ईमेल लिहावा. |
| ९. | संकेताच्या कलम २५(२)(एच) अन्वये ठराव अर्जदाराची पात्रता उपलब्ध असणारे यूआरएल: | अधिक तपशिलवार ईओआय आणि पात्रता निकषाकरिता, कृपया irp.ojas@aegisipe.com येथे ईमेल लिहावा. |
| १०. | स्वारस्य अभिव्यक्ती स्वीकारण्याकरिता अंतिम दिनांक: | २१ ऑगस्ट, २०२५ (आधीचा दिनांक १२ ऑगस्ट, २०२५) |
| ११. | संभाव्य ठराव अर्जदारांची तात्पुरती यादी पारित करण्याचा दिनांक | २३ ऑगस्ट, २०२५ (आधीचा दिनांक १४ ऑगस्ट, २०२५) |
| १२. | तात्पुरत्या यादीवर आक्षेप सादर करण्याचा अंतिम दिनांक | २८ ऑगस्ट, २०२५ (आधीचा दिनांक १९ ऑगस्ट, २०२५) |
| १३ | संभाव्य ठराव अर्जदारांची अंतिम यादी पारित करण्याचा दिनांक | २९ ऑगस्ट, २०२५ (आधीचा दिनांक २० ऑगस्ट, २०२५) |
| १४ | संभाव्य ठराव अर्जदारांना माहिती निवेदनपत्रिका, मुल्यांकन नमुना, ठराव योजनेकरिता विनंती पारित करण्याचा दिनांक | २९ ऑगस्ट, २०२५ (आधीचा दिनांक २० ऑगस्ट, २०२५) |
| १५ | ठराव योजना सादरीकरणाचा अंतिम दिनांक | २८ सप्टेंबर, २०२५ (आधीचा दिनांक १९ सप्टेंबर, २०२५) #माननीय एनसीएलटी, मुंबई खंडपीठाद्वारे सीआयआरपी वेळापत्रकास विस्ताराच्या अधीन |
| १६. | ईओआयकडे सादर करण्यासाठी प्रक्रिया ईमेल आयडी | irp.ojas@aegisipe.com |

दिनांक: १३ ऑगस्ट, २०२५
ठिकाण: मुंबई

सही/-
अविल मेनेझेस
एजिस रिझॉल्यूशन सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेडचे प्राधिकृत स्वाक्षरीकार
ठराव व्यावसायिक
नोंदणी क्र.: IBBI/IPE-0118/IPA-1/2022-23/50041
अभिहस्तांकनाकरिता प्राधिकृतता दि. ३० जून, २०२६ पर्यंत वैध

**निरलॉन लिमिटेड**
(सीआयएन L17120MH1958PLC011045)
नोंदणीकृत कार्यालयः पहाडी गाव, ऑफ वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, गोरेगाव (पूर्व), मुंबई ४०० ०६३.
दूर. क्र.: + ९१ (०२२) ४०२८ १९१९ / २६८५ २२५७ / ५८ / ५९ फॅक्स क्र.: + ९१ (०२२) ४०२८ १९४०
ईमेलः info@nirlonltd.com, वेबसाइटः www.nirlonltd.com

**दि. ३० जून, २०२५ रोजी संपलेल्या त्रैमासिकाकरिता अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्ष**

(₹ लाखात)

| अ. क्र. | तपशील | संपलेले त्रैमासिक 30 जून, २०२५ अलेखापरिक्षित | संपलेले त्रैमासिक ३१ मार्च, २०२५ लेखापरिक्षित (टीप ३ पहा) | संपलेले त्रैमासिक ३० जून, २०२४ अलेखापरिक्षित | संपलेले वर्ष ३१ मार्च, २०२५ लेखापरिक्षित |
|---|---|---|---|---|---|
| १ | **उत्पन्न:** | | | | |
| | अ) कार्यातून महसूल | १६,२९९.६० | १५,८०२.४६ | १५,६५०.६५ | ६३,६०७.४८ |
| | ब) इतर उत्पन्न | ४०५.१३ | २६२.५८ | १३८.६५ | ८८९.३९ |
| | **एकूण उत्पन्न** | **१६,७०४.७३** | **१६,०६५.०४** | **१५,७८९.३०** | **६४,४९६.८७** |
| २ | **खर्च:** | | | | |
| | अ) कर्मचारी लाभ खर्च | १६२.८७ | १६४.२९ | १३९.९९ | ६००.७३ |
| | ब) अर्थसहाय्य खर्च | २,७९०.९८ | २,८२७.२१ | २,९६६.९८ | ११,७०२.५५ |
| | क) घसारा आणि परिशोधन खर्च | १,३७७.५१ | १,३४५.८२ | १,४०९.९२ | ५,६३३.१६ |
| | ड) मालमत्ता व्यवस्थापन खर्च | १,३८३.९३ | १,६७९.५१ | १,३०४.४९ | ५,८६३.४७ |
| | ई) इतर खर्च | १,९७४.१२ | १,६५७.१३ | २,१७७.७२ | ६,८५५.९६ |
| | **एकूण खर्च** | **७,६८९.४१** | **७,६७३.९६** | **७,९९९.१०** | **३०,६५५.८७** |
| ३ | **करपूर्व नफा (१-२)** | **९,०१५.३२** | **८,३९१.०८** | **७,७९०.२०** | **३३,८४१.००** |
| ४ | **कर खर्च** | | | | |
| | (अ) विद्यमान कर | २,४६५.६१ | २,३५७.७५ | १,३६१.०० | ६,८०४.४५ |
| | (ब) आधीच्या कालावधीशी संबंधित करांसाठी समायोजन | (३२.७२) | - | - | - |
| | (क) स्थगित कर | ७४१.६८ | ६७९.०७ | १,४४६.०० | ५,२१७.७० |
| | **एकूण कर खर्च** | **३,१७४.५७** | **३,०३६.८२** | **२,८०७.००** | **१२,०२२.१५** |
| ५ | **कर पश्चात नफा (३-४)** | **५,८४०.७५** | **५,३५४.२६** | **४,९८३.२०** | **२१,८१८.८५** |
| ६ | **इतर सर्वसमावेशक उत्पन्न** | | | | |
| | बाबी, ज्या नफा आणि तोटामध्ये पुन्हा वर्गीकृत होणार नाहीत (कर निव्वळ) | - | (०.४७) | - | (०.४७) |
| ७ | **एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (५+६)** | **५,८४०.७५** | **५,३५३.७९** | **४,९८३.२०** | **२१,८१८.३८** |
| ८ | भरणा केलेले सम भाग भांडवल (दर्शनी मूल्य प्रति भाग ₹१०/-) | ९,०११.८० | ९,०११.८० | ९,०११.८० | ९,०११.८० |
| ९ | इतर इक्विटी | | | | २६,६८०.९२ |
| १० | **प्रति भाग उत्पन्न (ईपीएस) प्रत्येकी ₹१०/- (वार्षिकीकरण नाही)** | | | | |
| | अ) मूळ (₹) | **६.४८** | **५.९४** | **५.५३** | **२४.२१** |
| | ब) सौम्यीकृत (₹) | **६.४८** | **५.९४** | **५.५३** | **२४.२१** |
| | **वित्तीय निष्कर्षांसोबतच्या टिपा पहा** | | | | |

**टिपा:**
१. दि. ३० जून, २०२५ रोजी संपलेल्या त्रैमासिकाचे निष्कर्ष लेखा समितीद्वारे पुनरावलोकित करण्यात आले आहेत आणि कंपनीच्या संचालक मंडळाद्वारे त्यांच्या दि. ११ ऑगस्ट, २०२५ रोजी घेण्यात आलेल्या सभेमध्ये मंजूर करण्यात आले आहेत.
२. मुख्य कार्यकारी निर्णय घेणाऱ्यांनी संसाधनांचे वाटप करण्यासाठी व कामगिरीचे मूल्यांकन करण्यासाठी मूल्यमापन केल्यानुसार कंपनीने "गुंतवणूक मालमत्तांचे परवाना देणे" यास अहवालयोग्य विभाग म्हणून निश्चित केले आहे. आयएनडी एएस १०८- ऑपरेटिंग सेगमेंटनुसार दुसरा कोणताही अहवालयोग्य विभाग नाही. त्यानुसार कोणत्याही विभागाची माहिती देण्यात आलेली नाही.
३. दि. ३१ मार्च, २०२५ रोजी संपलेल्या त्रैमासिकाचे आकडे हे संपूर्ण वित्तीय वर्षाकरिता लेखापरिक्षित आकडे आणि दि. ३१ डिसेंबर, २०२४ पर्यंतचे अलेखापरिक्षित प्रसिद्ध अद्ययावत आकड्यांच्या दरम्यानचे तुलनात्मक आकडे आहेत, जे मर्यादित पुनरावलोकनाच्या अधीन आहेत.
४. कर कायदा (सुधारणा) कायदा, २०१९ दि. १ एप्रिल २०१९ पासून लागू करण्यात आला, ज्यामध्ये देशांतर्गत कंपन्यांना काही अटींच्या अधीन राहून २२% दराने आयकर अधिक लागू अधिभार आणि उपकर ("नवीन कर व्यवस्था") भरण्याचा पर्याय आहे. कंपनी अजूनही 'नवीन कर व्यवस्था'कडे वळण्यासाठी मूल्यांकन करत आहे. हा निर्णय होईपर्यंत, चालू आणि स्थगित कर दायित्वे जुन्या कर प्रणाली अंतर्गत लागू कर दराने मोजली जात आहेत.

संचालक मंडळाकरिता आणि त्यांच्या वतीने
**निरलॉन लिमिटेड**
सही/-
**राहुल सागर**
कार्यकारी संचालक आणि सीईओ
डीआयएन: ३८८९८०

ठिकाण: मुंबई
दिनांक: ११ ऑगस्ट, २०२५


रामेश्वर मीडिया

## नाटक सुरु असताना घडलेले मजेदार किस्से

# रंगभूमीवर कबुतरांचे प्रेमरंग




सध्या महाराष्ट्रातलं वातावरण शांती व प्रेमाचं प्रतीक मानले जाणाऱ्या कबुतरांनी चांगलंच अशांत केलं आहे. राजकीय मैदानात काहीजण कबुतर जा जा जा म्हणून त्यांना हाकलण्याचा प्रयत्न करत आहेत, तर काहीजण कबुतर आ आ आ म्हणून त्यांना बोलावण्याचा प्रयत्न करत आहेत. आता या रस्सीखेचीत कबुतरासारखा अचूक दिशेचं ज्ञान असलेला पक्षीही गोंधळून भरकटण्याची चिन्हे दिसत आहेत. परंतु या कबुतरांनी एकदा चक्क नाटकाच्या प्रयोगातच आपले प्रेमरंग उधळले होते आणि रंगमंचावर भलताच प्रसंग सादर केला होता.



हा प्रकार घडला होता विनोदवीर दामुअण्णा मालवणकर यांच्या नाटकाच्या प्रयोगामध्ये. विनोदी भूमिकांसाठी प्रसिद्ध असलेल्या दामुअण्णांनी ब्रँडीची बाटली, ठकीचं लग्न, ब्रह्मचारी, मोरूची मावशी, सरकारी पाहुणे अशा अनेक चित्रपटांमधून आपला ठसा उमठवला होता. मात्र दामुअण्णा मुळातले नाट्य कलाकार आहेत. लोकमान्य नाटक मंडळी, बलवंत नाटक मंडळी अशा संस्थांमध्ये कामे केल्यानंतर त्यांनी स्वतःची 'प्रभाकर नाटक मंडळी' ही कंपनी सुरू केली होती. आपल्या कंपनीच्या अंतर्गत गडकरी, खाडिलकर यांची जुनी लोकप्रिय नाटके सादर करत असतानाच त्यांनी नवीन नाटककारांची नाटके सुद्धा सादर केली. अशाच एका सामाजिक नाटकातील नायकाला, म्हणजेच दामुअण्णांना, कबुतरे पाळायचा शौक असल्याचे नाटककाराने दाखवले होते. त्यामुळे नाटकाच्या नेपथ्यात एक कबुतरांचे मोठे खुराडे देखील आणले होते आणि त्यात आठ-दहा कबुतरे ठेवलेली होती.



नाटकाचा एक प्रयोग सुरू असताना दामुअण्णा आणि त्यांची नाटकातली नायिका यांचा प्रेमप्रसंग सुरू झाला. नायक-नायिका सोफ्यावर शेजारी, हातात हात घेऊन बसले आहेत आणि प्रेमालाप करत आहेत असा प्रसंग होता. इतक्यात अचानक प्रेक्षकांमधून हास्याचे स्फोट होऊ लागले. त्यामुळे दामुअण्णा जरा बावरले. त्यांना वाटलं की, आपला विग सरकला तर नाही ना? म्हणून लोक हसत आहेत का? त्यांनी हळूच डोक्यावर हात फिरवत खात्री केली. पण विग तर जागेवरच होता. नंतर त्यांना वाटलं की, आपल्या धोतराचा काहीतरी गोंधळ झालाय का? म्हणून त्यांनी धोतर चाचपून पाहिलं तर तेही जागेवर होतं.

त्यांनी आपल्या नायिकेला डोळ्यांनीच खुणावलं की, बाई ग, तुझ्या वेशभूषेत, केशरचनेत काही गडबड झाली आहे का ते बघ. तिने सुध्दा अभिनयाचाच एक भाग असल्याचं दाखवत केशरचना आणि वेशभूषा चाचपून पाहिली, पण सर्व जागच्या जागी होतं. असं असलं तरी प्रेक्षकांमधला हशा वाढतच जात होता. या विचित्र प्रकारामुळे दामुअण्णांचं संवाद म्हणण्यात लक्ष लागेना. ते अस्वस्थ होऊ लागले. अखेर प्रेक्षकांमधून एकाने जोरात ओरडून सांगितले की, काळजी करू नका, तुमचं सगळं ठीकठाक आहे, पण मागे बघा.

दामुअण्णा मागे वळून बघतात, तो काय; मागच्या खुराड्यातील एक कबुतरांची जोडी भलतीच रंगात आली होती आणि त्यांनी आपले प्रेमरंग उधळायला सुरुवात केली होती. कबुतरांच्या त्या प्रेमलिलेला पाहून दामुअण्णांनी आपला नाटकातला प्रेमप्रसंग आवरता घेतला आणि पुढच्या प्रयोगापासून कबुतरांचे खुराडे रंगमंचावरून हद्दपार केले.

# खंजीराला पार्श्वसंगीत मिळते तेव्हा...

नाटकाची रंगत वाढवण्यासाठी पार्श्वसंगीत फार महत्वाचं असतं. रंगमंचावर घडणाऱ्या प्रसंगामधील भाव-भावना अधिक प्रभावीपणे प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्यासाठी पार्श्वसंगीत उपयुक्त ठरते. त्यात नाटक जर रहस्यमय, भयकारक किंवा रोमांचक कथानकाचं असेल तर पार्श्वसंगीतामधून जी वातावरण निर्मिती होते, त्यामुळेच नाटकाचा प्रयोग प्रेक्षकांच्या मनावर ठसतो. पण हे पार्श्वसंगीत टेपरेकॉर्डरवर वाजवले जात असते. आता त्या यंत्रात आयत्यावेळी काही बिघाड झाला तर... तर? काय गंमत होते, त्याचाच हा किस्सा.

एका राज्य नाट्य स्पर्धेत घडलेला. पूर्वी राज्य नाट्य स्पर्धा फार महत्वाची होती. या स्पर्धेत मोठी चुरस असे. डॉ. जब्बार पटेल, दामू केंकरे, अरविंद देशपांडे असे मात्तबर दिग्दर्शक, विजय तेंडुलकर, रत्नाकर मतकरी, शं.ना. नवरे यांच्यासारखे सिद्धहस्त नाटककार या स्पर्धेमधूनच पुढे आले. तर त्या काळातल्या स्पर्धेतल्या एका नाटकात घडलेली ही गंमत. ते एक नाटक रहस्यमय होतं. त्यामुळे संपूर्ण नाटकात पार्श्वसंगीताला अर्थातच महत्व होतं. त्या काळात नाटकाचे पार्श्वसंगीत हे 'स्पूल'वर वाजवले जात असतं. नाटकाच्या पहिल्या अंकात या स्पूलवर पार्श्वसंगीत अगदी उत्तम वाजलं. दुसऱ्या अंकातही काही गडबड झाली नाही.

नाटकाचा शेवट आला. त्या प्रसंगात रहस्य भेद होतो आणि नायक खलनायकाला बंदूक झाडून ठार करतो. आता नाटकात बंदूक वापरतात तर खरी थोडीच असते? खोटीच बंदूक वापरतात. फक्त गोळीबाराचा आवाज पार्श्वसंगीतात येतो. त्याप्रमाणे या नाटकातील त्या प्रसंगात नायकाने खलनायकावर बंदूक रोखत संवाद म्हणायला सुरुवात केली, नीचा भोग आपल्या पापांची फळं आणि हो, मरणाला तयार, आणि ठरल्याप्रमाणे त्याने बंदुकीचा चाप ओढला.


इकडे खलनायक बंदुकीच्या गोळीचा आवाज वाजण्याची वाट पाहू लागला. गोळीचा आवाज घुमला की त्याला आरोळी ठोकून मरून पडायचे होते. परंतु काही क्षण गेले तरी बंदूकीतून गोळी सुटल्याचा आवाज काही झाला नाही. नायकाने गोंधळून पार्श्वसंगीत वाजवणाऱ्याकडे बघितलं, तर त्याने खुणेने सांगितले की, स्पूल अचानक अडकल्याने गोळीचा आवाज वाजत नाही.

आता करायचं काय? खलनायक मेल्याशिवाय नाटक कसं संपणार? बरं, प्रयोग स्पर्धेतला होता. मग तल्लख डोक्याच्या नायकाने प्रसंगावधान दाखवून बाजूच्या टेबलवरचा खंजीर उचलला आणि खलनायकाकडे बघत तो म्हणाला, दुष्टा, तुझ्यासारख्या पापी माणसासाठी बंदुकीची गोळी तरी कशाला वाया घालवू? थांब, या खंजीरानेच तुला संपवतो, आणि आवेशाने खलनायकाच्या जवळ जाऊन त्याने तो खंजीर त्याच्या पोटाला टेकवला

आणि ... आणि ... 'ढिशकँव' असा गोळीचा आवाज प्रेक्षागृहात घुमला... कारण अडकलेला स्पूल नेमका त्याचवेळी सुटला होता आणि खंजीराला बंदुकीच्या गोळीचं पार्श्वसंगीत मिळालं होतं.




# शोलेच्या ५० वर्ष पूर्णतेचा सन्मान टोरांटोमध्ये





येत्या १५ ऑगस्टला लोकप्रिय चित्रपट शोलेच्या प्रदर्शनाला ५० वर्ष पूर्ण होत आहेत. हा सिनेमा बॉक्स ऑफिसवर ब्लॉकबस्टर झाला असून त्याने लोकप्रियतेचे व कमाईचे अनेक रेकॉर्ड्स बनवले. आजही सिनेरसिकांच्या मनावर शोलेचे गारुड कायम आहे. आता बातमी आहे की, या चित्रपटाला पन्नास वर्ष पूर्ण झाल्याबद्दल पुढील महिन्यात टोरांटो आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवामध्ये शोलेला सन्मानित केले जाणार आहे. शोलेचे लेखक सलीम-जावेद पैकी जावेद अख्तर यांनी या बातमीला दुजोरा दिला आहे. ४ ते १४ सप्टेंबर या कालावधीत हा महोत्सव संपन्न होणार असून ६ सप्टेंबर रोजी या महोत्सवामध्ये शोले दाखवला जाणार आहे.

# एआयच्या मदतीने कुलीचे संगीत?

उद्या १४ ऑगस्ट रोजी भारतीय सुपरस्टार आणि सर्वाधिक लोकप्रिय अभिनेता रजनीकांत यांचा कुली हा चित्रपट प्रदर्शित होत आहे. या सिनेमाच्या ट्रेलरला प्रेक्षकांची मोठी पावती मिळाली आहे. या चित्रपटाचे संगीत व पार्श्वसंगीत अनिरुद्ध रविचंदर यांनी दिले असून त्यांच्या संगीतानेही सर्वांचे लक्ष आकर्षित केले आहे. या अनिरुद्धनी नुकतीच कुलीच्या पार्श्वगाण्यासंबंधी एक गोष्ट लोकांपर्यंत शेअर केली आहे. वादक असलेल्या अनिरुद्ध रविचंदरनी एका मुलाखती दरम्यान सांगितले की, कसे त्यांनी आर्टिफिशियल इंटेलिजन्स म्हणजेच एआयच्या साह्याने 'कुली'चे संगीत तयार केले आहे. ते म्हणाले की सृजनशील अडचणी दूर करण्यासाठी मी एआयचा वापर केला आहे. गाणे तयार करायच्या दोन दिवस आधी मला काही रचनात्मक गोष्टींना सामोरे जावे लागले, तेव्हा मी चॅट जीपीटी उघडली आणि त्यामध्ये माझ्या गाण्याची माहिती शेअर करत मी एआयला विचारले की, हे माझे गाणे आहे आणि शेवटच्या दोन ओळी लिहिताना मी मध्येच थांबलो आहे. मी आता काय करू? त्यावेळी एआयने मला दहा ओळी शेअर केल्या. त्यातूनच मी एक ओळ लिहिली आणि मला पुढच्या ओळी सुचल्या. सर्व सृजनशील व्यक्तींना अशा पद्धतीच्या समस्यांना सामोरे जावे लागते. परंतु आता यावर उपाय सापडला आहे आणि त्यामुळे काम करणे सोपे झाले आहे. 'कुली'मध्ये एकूण आठ गाणी आहेत. लोकेश कनगराज यांनी दिग्दर्शित केलेल्या या सिनेमामध्ये नागार्जुन अक्किनेनी, सौबिन शाहीर, श्रुती हासन, उपेंद्र आणि सत्यराज यांसारखे कलाकार असून सुपरस्टार आमिर खान आणि पूजा हेगडे यांनी कॅमिओ केला आहे.

# येणार का गदर ३?




ढाई किलोचा हात असलेला स्टार अभिनेता सनी देओल आणि अभिनेत्री अमीषा पटेल अभिनित गदर २ ने भरपूर यश व लोकप्रियता मिळवली होती. त्यानंतर गदर ३ बनणार का आणि तो कधी येणार याची चर्चा सुरु झाली होती. सध्या सिक्वेलची प्रथा जोरात सुरु आहे. त्या पार्श्वभूमीवर आता गदर ३ बाबत एक बातमी समोर आली आहे, जी या चित्रपटाचे दिग्दर्शक अनिल शर्मा यांनी दिली आहे. सोबतच चित्रपटाची कथा व त्याचे प्रदर्शन याबाबतही त्यांनी माहिती दिली आहे. अनिल शर्मा यांनी सांगितले की, गदर ३ साठी कथा पुढे सरकवायला काहीच समस्या आली नाही. कारण गदर मधील व्यक्तीरेखा ओघाने आलेल्या आहेत. मला फक्त कथा पुढे घेऊन जायची आहे. आम्हाला या गोष्टीचा विचार करावा लागेल की १०-२० वर्षांनंतर त्यांच्या आयुष्यात काय होते. भारत व पाकिस्तान यांच्यामधील ऐतिहासिक प्रसंग तर आधीच त्यात समाविष्ट केले आहेत. गदर ३ वर आमचे काम सुरु आहे. माझी इच्छा आहे की, गदर ३ चे शूटिंग पुढील २-एक वर्षांमध्ये सुरु होईल. नव्या पिढीने देखील हा सिनेमा बघावा असे वाटत असल्याने किमान कथा-पटकथा पूर्ण करण्यासाठी वेळ लागेलच.

# सैयारा कधी ओटीटीवर?





दिग्दर्शक मोहित सुरीचा सैयारा हा सिनेमा १८ जुलै रोजी प्रदर्शित झाला होता. या सिनेमाने बॉक्स ऑफिसवर रेकॉर्ड बनवणारी कमाई केली आहे, असे म्हटले जात आहे. अजूनही चित्रपटाला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे बोलले जात आहे. २०२५ मध्ये आत्तापर्यंत सर्वाधिक कमाई केलेला हा दुसरा सिनेमा आहे, तर छावा हा सिनेमा पहिल्या क्रमांकावर आहे. या आठवड्यात वॉर २ आणि कुली सारखे मोठे स्टार्सचे चित्रपट प्रदर्शित होत आहेत. त्यामुळे त्यांच्यासमोर सैयारा किती टिकतो हे पहायचे आहे. मात्र ही बातमी त्याच्या ओटीटीबद्दलची आहे. कास्टिंग डायरेक्टर शानू शर्माने आपल्या इंस्टाग्राम अकाऊंटवर एक पोस्ट शेअर केली असून त्यात लिहिले आहे की, सैयारा १२ सप्टेंबर रोजी नेटफ्लिक्सवर प्रदर्शित होत आहे. या सिनेमाद्वारे अभिनेत्री अनन्या पांडेचा चुलत भाऊ अहान पांडे आणि अनित पड्डा यांनी आपल्या अभिनय कारकिर्दीची सुरुवात केली आहे.

# कलाकारांचे महागडे पोषाख

बॉलीवूडमधील अधिकतर चित्रपट भव्य दिव्य रीतीने निर्माण केले जातात. मोठमोठ्या हवेल्या, बंगले असलेले सेट्स, रस्ते वगैरे यामध्ये मेकअप आणि वेशभूषा देखील सामील असते. मात्र असे कितीतरी चित्रपट आहेत ज्यामध्ये केवळ कलाकारांच्या वेशभूषेवर लाखो रुपये खर्च करण्यात आले आहेत. २००२ मध्ये प्रदर्शित झालेल्या दिग्दर्शक संजय लीला भंसाळीच्या 'देवदास' मधील अनेक वेशभूषांची चर्चा झाली होती. परंतु सर्वात लोकप्रिय झाला होता 'काहे छोड़ मोहे' या गाण्यामध्ये अभिनेत्री माधुरी दीक्षितने घातलेला पोषाख. त्याची किंमत होती जवळपास १५ लाख रुपये. 'सिंग इज ब्लिंग' या सिनेमात खिलाडी अक्षय कुमारने जी पगडी परिधान केली होती, त्याची किंमत होती ६५ लाख रुपये. कारण ती पगडी खऱ्या हिऱ्यांनी सजवली होती. संजय लीला भंसाळी आपल्या दिव्य भव्य सेट्ससाठी ओळखला जातो. त्याच्या 'पद्मावत' या चित्रपटामध्ये दीपिका पदुकोणने घूमर या गाण्यामध्ये जो लेहेंगा परिधान केला आहे, त्याची किंमत होती ३० लाख आणि त्याचे वजनही ३० किलो होते. याच यादीमध्ये शाहरुख खानच्या 'रा.वन' हा चित्रपट देखील सामील आहे. यामध्ये शाहरुख 'जी.वन' नावाच्या सुपरहिरोची व्यक्तिरेखा साकार केली होती. त्यासाठी बनवलेल्या खास पोशाखाची किंमत होती साडेचार कोटी रुपये. असे २० सूट्स शाहरुखसाठी बनवण्यात आले होते. 'जोधा अकबर' या चित्रपटामध्ये अभिनेत्री ऐश्वर्या रायने राणीची भूमिका साकार केली होती. या सिनेमातील लग्नाच्या दृश्यामध्ये ऐश्वर्याने घातलेल्या लाल रंगाच्या लेहेंग्यासाठी तब्बल दोन लाख रुपये खर्च झाले होते. हा लहंगा नीता लुल्लाने डिझाइन केला होता.




# कधी येणार सूरज-सलमान जोडीचा चित्रपट?



**हिंदी चित्रपटांच्या यशस्वी दिग्दर्शक व अभिनेत्याच्या जोडीचा विषय निघाला की, दिग्दर्शक सूरज बडजात्या आणि सुपरस्टार सलमान खान यांचे नाव घेतले जाते. या जोडीने प्रेक्षकांना एकापेक्षा एक यशस्वी व मनोरंजक चित्रपट दिले आहेत. गेल्या अनेक काळापासून सलमान आणि सूरज बडजात्यांच्या आगामी चित्रपटाची चर्चा सुरू आहे. सूरज बडजात्यांनी सलमानला मैंने प्यार किया हा त्याचा पहिला हिट सिनेमा दिला होता. ९० च्या दशकात प्रदर्शित झालेल्या या सिनेमाने खूप लोकप्रियता मिळवली होती. त्यानंतर हम आपके हैं कौन, हम साथ साथ हैं, प्रेम रतन धन पायो हे सूरज बडजात्या- सलमान खान जोडीचे चित्रपट देखील लोकप्रिय आणि यशस्वी झाले. त्यामुळे साहजिकच लोकांच्या मनामध्ये हा प्रश्न आहे की, या जोडीचा आगामी चित्रपट कोणता आहे? आणि तो कधी येणार आहे? आता खुद्द सूरज बडजात्या यांनी याविषयी मौन तोडले आहे आणि भाईजानसह आपल्या पुढील चित्रपटाचे अपडेट्स सांगितले आहेत. कधी येणार सूरज-सलमान जोडीचा चित्रपट? सूरज बडजात्या यांनी नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीमध्ये सांगितले की, आम्ही एका पटकथेवर काम करत असून ही कथा सलमानला डोळ्यासमोर ठेवून तयार करण्यात आली आहे. आता सलमानच्या वयाप्रमाणे कथा व त्याची व्यक्तिरेखा तयार करावी लागेल. कारण काळानुरूप एका परिपक्व प्रेमकथा सादर करावी लागेल आणि ही गोष्ट थोडी आव्हानात्मक आहे. परंतु आम्हा दोघांमध्ये, माझ्यात आणि सलमानमध्ये सर्व योग्य पद्धतीने काम झाले तर प्रेक्षकांना, सलमानच्या चाहत्यांना पुन्हा एकदा सलमान प्रेमाच्या रूपात दिसेल. १० वर्षांपूर्वी सूरज बडजात्या यांनी सलमानसह प्रेम रतन धन पायो हा सिनेमा बनवला होता.सध्या सूरज बडजात्या अभिनेता आयुष्मान खुरानासह आपल्या आगामी चित्रपटाची तयारी करत आहेत.**

# नवाकाळ शब्दकोडे-१३४१



**आडवे शब्द –**

१. वचक, दरारा ३. शेवट, मावळणे ४. स्वयपाक करण्याची कला ७. अमान्य ११. सारभूत अर्थ, सारांश १२. पसरलेला सुगंध, घमघमाट १३. स्वयपाकाचे भांडे १४. इंद्राचे शस्त्र १५. रावणाची बहीण १६. चप्पल १७. कणीक आणि आमटीचा लोकप्रिय पदार्थ, डाळ-ढोकळीचे मराठी नाव २०. मंजूर २१. प्रतिबंध, विरोध २२. सरपण विक्रीचे दुकान २५. उंच, भव्य २६. भात व नाचणीची पेज २८. पेठ, मोहल्ला २९. प्रतिकूल काळ ३०. दया ३२. अगदी बिकट अवस्था ३४. टिंगलखोर ३७. संपत्ती, संपदा ४०. गेरू, तांबडी माती ४१. सहस्रावधी ४२. गुडघा ४३. समृध्दी, उत्कर्ष, चलती ४५. उतारवय ४७. भरतीची वेळ ४८. योग्य, उचित ४९. कबूल, तयार ५०. मासेमारीचा हूक ५१. एडका, मेंढा ५२. बिछाना, गादी, शय्या ५३. पूर्वी असलेला, गत, भूतपूर्व ५४. आवेश, अवसान ५६. स्तुती, कौतुक ५७. तोंड, चेहरा ५९. सांड, प्रजोत्पादनासाठी पोसलेला बैल ६०. लग्नातली नवरी ६२. बड्याबोळ ६४. खोचक, उपरोधिक ६७. स्नेह, मैत्री ६८. उन्हाळ्यात फुलणारी पिवळी सुगंधी फुले, जास्मीन ७१. दुष्ट व्यक्ती ७२. चेला, अनुयायी ७४. लक्षावधी ७६. पलांडू, कांदा ७७. आसपास, कडे करुन ७८. बिशाद, शामत ८०. झाड, वृक्ष ८२. स्वतःचा रंग बदलणारा प्राणी ८४. पलीकडे ८५. कोणाला न घाबरता ८६. कवन, गीत ८६अ. मासेमारीचा हूक ८७. दिवाळीआधीचा मोठा उत्सव ८९. तळपायाचा मांसल भाग ९०. कमनीय बांधा असलेली ९२. बंद पडलेले कामकाज ९३. अहंकार, गर्व ९५. संघर्ष ९७. ऊस, बांबू, हाताचे बोट - यांचे विभाग ९८. समुद्रसपाटीवरचे हवामान १०२. पिठले १०३. कुस्तीगीर, पहिलवान १०४. त्वरित, ताबडतोब १०५. क्रीडा; दैवी चमत्कार; मुलींचे एक नाव १०६. नुकताच आलेला

**उभे शब्द –**

१. सदन, घर २. कल्हईसाठी उपयुक्त असा मऊ आणि न गंजणारा धातू ३. निरर्थक ४. वंचित, मुकलेला ५. आलिंगन, मिठी ६. आस्था ७. संबंध ८. मढे, मृतदेह ९. नमक, रामरस १०. प्रवाळ, समुद्रात मिळणारे लाल रत्न १२. मजबूत १३. गावात पाणी भरण्याची सार्वजनिक जागा १८. भिंतीतले कपाट १९. पाण्यात जन्मलेले, कमळ २०. नशा आणणारे, अमली २१. घर, गृह २३. मिठाची चव २४. परस्पर संपर्क, संवाद २६. जुन्या रुपयातील सोळावा भाग २७. तोंड, मुख २८. उमर २९. पलायन, पोबारा ३१. कोरडा, शुष्क ३३. धुके ३५. किराणा दुकानदार ३६. कापूस भरलेली बिछाईत, जाजम, बैठकीची गादी ३७. ज्योतिषातील नववी रास ३८. न्याहारी, फलाहार ३९. गाढव ४०. चुलता ४१. प्रसन्न चेहऱ्याचा ४२. अधिक, पुष्कळ ४३. बेसनाचा तळलेला लोकप्रिय पदार्थ ४४. देवीचे एक रूप ४५. ज्योतिषातील दुसरी रास ४६. बदल, पालट ४८. राजाची किंवा सत्ताधाऱ्याची कारकीर्द ४९. कमळ; मुलांचे एक नाव ५५. वाटोळे, नुकसान ५८. घशाला सुटलेली खाज ६१. अस्पष्ट ६३. सोळा शेर/सोळा पायली धान्य ६५. अनुकूल काळ ६६. धाकटी बहीण ६८. माज ६९. उग्र वास ७०. अफवा ७२. मृत्यूला जिंकलेला ७३. दोलायमानता ७५. चिमणीचे घरटे ७६. कापरे ७७. जेवण ७९. उक्ती, बोलणे ८१. एजंट ८३. भरडलेले द्विदल धान्य ८४. लायकी ८६. अत्युच्च ८८. संस्कार ९०. अंगरखा ९१. नवरा ९४. दृढ ९६. तलवारीपासून रक्षण करणारी ९७. अडचण ९९. हजार किलो १००. ऐकलेले •

**नवाकाळ कोडे क्रमांक १३४०चे उत्तर**

**आडवे शब्द :** ३. लागण ६. पुरेसा ८. कोंबडा ११. बेमुर्वतखोर १२. शतपुष्प १४. बुगडी १६. किवी १८. त्रस्त १९. जमाव २१. अंदाज २२. सुनीत २४. भावंड २५. अंकित २६. डौर २७. रडतराऊत २९. मदत ३२. सजग ३४. कवाड ३५. पदर ३६. अविवाहित ३८. दमट ३९. कीस ४०. तडफ ४३. लाल ४५. नेकी ४६. कसबा ४७. पारखी ४८. काटकोन ५०. वात्रट ५१. दिन ५२. तरवणी ५५. कालव ५६. गोंद ५७. काजवा ६०. यथोचित ६३. धनको ६५. रत ६६. आडाखा ६७. रसगुल्ला ६९. उपद्रवी ७१. वैद्य ७२. क्षीर ७३. सासव ७४. दृश्य ७५. दार ७६. जुनेर ७८. महाल ८०. रुष्ट ८१. पादप ८२. बाड ८३. जमदाड ८६. क्षमा ८७. द्युत ८८. रण ८९. लगाम ९१. धार ९२. पारिजात ९३. निम्न ९५. गहाळ ९८. जरब १००. धबधबा १०२. डग्गा १०३. मंदवासर १०४. रडारड

**उभे शब्द :** १. भंबेरी २. सर्वत्र ३. लाखो ४. गरजवंत ५. शांत ६. पुष्प ७. साबुदाणा ८. कोंडी ९. डाकिनी ११. तस्त १२. शव १३. पुलकित १५. गज १७. वीतराग २०. माड २२. सुरस २३. गोडवा २४. भाऊबंदकी २५. अंदर की बात २७. रकमाला २८. तडस २९. मद ३०. अविस्मरणीय ३१. निहित ३३. जटा ३५. पटकन ३७. तडका ४१. फटका ४२. मानव ४४. लवाद ४५. नेटका ४७. पाव ४९. कोलदांडा ५१. दिवा ५३. रज्जू ५४. संचित ५६. गोंजारणे ५८. जया ५९. विनयशील ६१. थोरवी ६२. निगुतीने ६४. तापस ६६. आद्य ६७. खापरपणजोबा ६८. दारमदार ६९. उसासा ७०. द्रव ७१. वैश्य ७४. दृष्टद्युम्न ७५. दादर ७६. जुडगा ७७. रज ७९. हाड ८२. बालकांड ८४. मधाळ ८५. हरिदास ८६. क्षतज ९०. मग ९३. निब ९४. खबर ९६. हार्द ९७. नाद ९९. रग १००. धडा १०१. धड

# कोल्हापूर निवडणूक आयोगाच्या विरोधात 'जबाब दो' आंदोलन




■ कोल्हापूर

**बिहारमधील** मतदारयादीच्या सखोल पुनर्निरीक्षणासह मत चोरीच्या आरोपावरून इंडिया आघाडीने दिल्लीत निवडणूक आयोगाच्या विरोधात काढलेल्या मोर्चा वेळी विरोधी पक्ष नेते राहुल गांधी तसेच इंडिया आघाडीच्या प्रमुख नेत्यांना अटक करण्यात आली. या अटकेच्या विरोधात आज सकाळी इंडिया आघाडी वतीने छत्रपती शाहू समाधी स्थळ येथे आत्मक्लेश आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनामध्ये आमदार जयंत आसगावकर, शिवसेना उपनेते संजय पवार, काँग्रेस शहराध्यक्ष सचिन चव्हाण, राष्ट्रवादी शहराध्यक्ष आर के पवार यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

# रायगडच्या पालकमंत्रिपदावरून महायुतीत गोंधळाचा नवा अंक सुरूच! गोगावले ठाम

पान १ वरून

पारंपरिक वादाची किनार आहे. यात आतापर्यंत तटकरे यांनीच बाजी मारल्याचे चित्र दिसत आहे. गेल्या २६ जानेवारीलाही प्रजासत्ताक दिनाच्या झेंडावंदनाचा मान मंत्री तटकरेंनाच मिळाला होता. त्यामुळे जिल्ह्यातून भाजपाइतकेच तीन आमदार विधानसभेवर असूनही एक आमदार असलेली राष्ट्रवादी काँग्रेस ही शिवसेनेवर वरचढ ठरत आहे. या सगळ्यांना महायुतीतल्या अंतर्गत संघर्षाची किनार असल्याचे म्हटले जात आहे.

दुसरीकडे, मंत्री गोगावले मात्र पालकमंत्रिपदावर ठाम आहेत. सध्या दिल्लीत असलेले गोगावले म्हणाले, मी आजही पालकमंत्रिपदावर १०० टक्के ठाम आहे. रायगडचा पालकमंत्री व्हावे ही माझी इच्छा आहे. झेंडावंदन करणे आणि पालकमंत्रिपद यामध्ये फरक आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रायगडसोबतच शिवसेनेने पालकमंत्रिपदासाठी दावा केलेल्या नाशिक येथील झेंडावंदनासाठीही भाजपाचे मंत्री गिरीश महाजन यांना मान दिला आहे. नाशिकमध्ये शिवसेनेचे शिक्षणमंत्री दादा भुसे हेही पालकमंत्रिपदासाठी इच्छूक आहेत. त्यामुळे रायगड आणि नाशिकचे पालकमंत्री जाहीर केल्यानंतरही फडणवीस सरकारने दोन्ही नावांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या नाराजीनंतर स्थगिती दिली होती. आता मात्र जिल्ह्यांशी संबंधित महत्त्वाचे निर्णय हे तटकरे आणि महाजन यांच्याच उपस्थितीत होत असल्याने शिंदे गटाचा दावा कमकुवत होत आहे.

सध्या दिल्लीत असलेले गोगावले म्हणाले, 'मी आजही पालकमंत्रिपदावर १०० टक्के ठाम आहे. रायगडचा पालकमंत्री व्हावे ही माझी इच्छा आहे. झेंडावंदन करणे आणि पालकमंत्रिपद यामध्ये फरक आहे. सध्या दिल्लीत असलेले गोगावले म्हणाले, मी आजही पालकमंत्रिपदावर १०० टक्के ठाम आहे. रायगडचा पालकमंत्री व्हावे ही माझी इच्छा आहे. झेंडावंदन करणे आणि पालकमंत्रिपद यामध्ये फरक आहे. त्यामुळे यावर वरिष्ठ निर्णय घेतील, तो मला मान्य आहे.' गोगावलेंनी पालकमंत्रिपदाची इच्छा उघडपणे बोलून दाखवली असली, तरी भुसेंनी मात्र झेंडावंदनाचा मान महाजनांना मिळाल्यामुळे आपण नाराज नसल्याचे पत्रकारांना सांगितले. नाशिकच्या पालकमंत्रिपदासाठी भुसे इच्छूक असतानाच राष्ट्रवादी काँग्रेसकडून मंत्रिमंडळ विस्तारात छगन भुजबळांना संधी मिळाल्याने दावेदारांमध्ये वाढ झाली आहे.

# भारतावरच्या टॅरिफमुळे रशियाला फटका पुतिन भेटीआधी ट्रम्प यांचा नवा दावा

पान ८ वरून

लादल्यामुळे जागतिक दबाव निर्माण झाला असून त्याचे परिणाम रशियाच्या अर्थव्यवस्थेवर होत आहेत.

काही दिवसांपूर्वीच ट्रम्प यांनी भारत आणि रशियाच्या अर्थव्यवस्थेचा उल्लेख 'मृत अर्थव्यवस्था' असा केला होता. दरम्यान, युक्रेनविरोधातील युद्ध तात्काळ थांबवावे, यासाठी ट्रम्प यांनी रशियाला अनेकवेळा इशारा दिला. त्यानंतरही दोन्ही देशांतला संघर्ष सुरूच आहे. आता ट्रम्प यांनी थेट रशियावरच आर्थिक निर्बंध लादण्याची धमकी दिली आहे. त्या पार्श्वभूमीवर अमेरिकेतील अलास्का शिखर परिषदेत ट्रम्प-पुतिन भेटीला महत्त्व प्राप्त झाले आहे. या भेटीतून युद्ध समाप्त झाल्यास त्याचा सध्या ताणणेल्या भारत-अमेरिका संबंधांवरही सकारात्मक परिणाम होईल, असे जाणकारांचे म्हणणे आहे. भारत-पाकिस्तान यांच्यातील संघर्ष आपणच थांबवल्याचा दावा ट्रम्प यांनी जवळपास ४० वेळा केला आहे. आर्थिक नाकेबंदी करून आपण जगभरात शांतता प्रस्थापित करत असल्याचे ट्रम्प यांचे म्हणणे आहे. त्यामुळेच आपण शांततेच्या नोबेल पुरस्काराचेही प्रबळ दावेदार असल्याचे ट्रम्प बोलून दाखवतात. पण त्यांच्या या दाव्यावरून ते जगाच्या राजकारणात एक विनोदी पात्र ठरले आहेत. मात्र, रशिया-युक्रेन युद्धावर पडदा पडल्यास ही एक मोठी उपलब्धी म्हणून बघितले जाईल.

# लालबागमध्ये १५ ऑगस्टला वधू-वर नोंदणी कार्यक्रम

■ मुंबई

**सुमंगल** वधु-वर सुचक सेवा समाजकार्य संस्थेच्या वतीने १५ ऑगस्ट रोजी प्रथम घटस्फोटीत, विधूर आणि अपंग वर-वधूंसाठी नोंदणीचा कार्यक्रम आयोजन करण्यात आला आहे. हा कार्यक्रम पेरू चाळ नंबर ११/१२, बंड्या हनुमान मंदिराच्या बाजूला, उत्कर्ष मंडळ, लालबाग येथे होणार असून सकाळी ११ ते दुपारी १ आणि संध्याकाळी ५ ते रात्री ८ या वेळेत इच्छुकांना मोफत वर-वधू नोंदणी करण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी ७५०६३७१९६४ या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा. या कार्यक्रमाचा इच्छुकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेचे संचालक जे. व्ही. परब यांनी केले.

# यशवंत चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात प्रवेश प्रक्रिया सुरू

■ नाशिक

**यशवंतराव** चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे शैक्षणीक वर्ष २०२५-२६ साठी आपल्या ११ विद्याशाखांमधील १२५ पदवी, पदव्युत्तर, पदविका आणि प्रमाणपत्र अभ्यासक्रमांसाठी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरू केली आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नव्या नियमानुसार विद्यार्थ्यांना नियमित पदवीसोबत दूरशिक्षणाद्वारे आणखी एक पदवी घेण्याची, तसेच मुक्त विद्यापीठातील दोन पदव्यांमध्ये एकाचवेळी प्रवेश घेण्याची संधी मिळणार आहे. प्रवेशाची अंतिम तारीख ३१ ऑगस्ट २०२५ निश्चित करण्यात आली आहे. यंदा पारंपरिक अभ्यासक्रमांसोबतच संगणकशास्त्र, विज्ञान व माहिती तंत्रज्ञान, कृषी, डेटा ॲनलिटिक्स, आयबीएम सर्टिफिकेट, डिजिटल फोटोग्राफी, शेतकरी उत्पादक कंपनी व्यवस्थापन, श्वानपालक प्रबोधन, सौर व पवन ऊर्जा यांसारखे नवे व व्यावसायिक अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. विद्यापीठाच्या ११ विद्याशाखांमधील एकून १२५ अभ्यासकमांची यादी जाहीर झाली आहे. यामध्ये मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे २०, संगणकशास्त्र १३, आरोग्य विज्ञान ११, शिक्षणशास्त्र ७, वाणिज्य व व्यवस्थापन १४, विज्ञान १२, स्कूल ऑफ डिजीटल एज्युकेशन ३, ग्रामीण विकास व उद्योजकता २, ललित कला केंद्र १, निरंतर शिक्षण ३५ आणि व्यावसायिक शिक्षण व कौशल्य विकास ७ अभ्यासक्रमांचा समावेश आहे. दुरस्थ शिक्षण ३५ आणि व्यावसायिक शिक्षण व कौशल्य विकास ७ अभ्यासक्रमांचा समावेश आहे. वेळेनुसार शिक्षण घेण्याची सुविधा मिळणार आहे. नोकरी, व्यवसाय, गृहिणी किंवा नियमित महाविद्यालयात प्रवेश घेणे शक्य नसलेल्या विद्यार्थ्यांसाठी ही उत्तम संधी असल्याचे विद्यापीठाने सांगितले आहे. अधिक माहितीसाठी https://ycmou.digitaluniversity.ac/ या संकेतस्थळाला भेट द्यावी किंवा जवळच्या अभ्यास केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन विद्यापीठाने केले आहे.

# मागासवर्गीय कर्जदारांसाठी हमी अटीत शिथिलता

■ मुंबई

**५ वर्षांची वाढ**

**सामाजिक** न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या विविध महामंडळांमार्फत राबवण्यात येणाऱ्या कर्ज योजनांचा लाभ गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांपर्यंत पोहोचवण्यासाठी राज्य सरकारने आज मंत्रीमंडळ बैठकीत महत्त्वाचा निर्णय घेतला. या योजनांमध्ये लाभार्थ्यांकडून घेतल्या जाणाऱ्या हमीदाराच्या अटींमध्ये शिथिलता आणून शासकीय हमीचा कालावधीही पाच वर्षांसाठी वाढवला आहे. या निर्णयामुळे सामाजिक मागासवर्ग, अनुसूचित जाती-जमाती, भटकंती व विमुक्त जाती, दिव्यांग आणि इतर मागास घटकांमधील व्यक्तींना कर्ज मिळवणे अधिक सुलभ होणार आहे. यापूर्वी त्यांना हमीदार मिळवणे मोठी अडचण होती. त्यामुळे अनेक लाभार्थी योजनांपासून वंचित राहत होते. आता या अटींमध्ये सवलत मिळाल्याने अधिकाधिक पात्र नागरिकांना कर्जाची उपलब्धता निश्चित होणार आहे. सामाजिक न्याय विभाग मंत्री संजय शिरसाट याबाबत म्हणाले की, हा निर्णयामुळे एनएसएफडीसी व इतर महामंडळांकडून दिल्या जाणाऱ्या कर्ज योजनांतर्गत प्रलंबित असलेले हजारो अर्जदार आता लाभ घेऊ शकतील.

# पुणे विद्यापीठात 'व्हॉईस ऑफ देवेंद्र' स्पर्धा विद्यार्थी संघटनेचा विरोध! विद्यापीठाची माघार!

पान १ वरून

पवार म्हणाले की, विरोधानंतर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला पत्र मागे घेण्याची उपरती झाली. पण या स्पर्धेचे विद्यापीठाने आयोजन केले नाही असे म्हणायचे आणि दुसरीकडे राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत काढलेले पत्र मागे घ्यायचे, हा विद्यापीठाचा दुटप्पीपणा आहे. शिक्षणाचे मंदिर असलेल्या विद्यापीठांच्या माध्यमातून राजकीय अजेंडे राबवण्याचा विषय हा केवळ या स्पर्धेपुरता मर्यादित नाही तर असे अनेक विषय आहेत. महिन्याअखेरपर्यंत विद्यापीठातील या राजकीय अजेंड्यांच्या संदर्भातील सर्व विषयांची पोलखोल करू.

उबाठा उपनेत्या सुषमा अंधारे म्हणाल्या की, ज्ञानदानासारखे पवित्र कार्य जिथे चालते अशा विद्यापीठाला तरी किमान राजकारणापासून अलिप्त ठेवावे. मात्र, 'व्हॉईस ऑफ देवेंद्र' सारखी वक्तृत्व स्पर्धा भरवण्यासाठी स्वतः विद्यापीठाने पुढाकार घ्यावा, राष्ट्रीय सेवा योजनेच्या विभागाने त्यासाठी हालचाली कराव्यात आणि विद्यापीठाने परिपत्रक काढावे हे अत्यंत वाईट आहे. अशा पद्धतीची परिपत्रके बघितली की, विद्यापीठांची स्वायत्तता गहाण पडली आहे का, हा प्रश्न वारंवार येतो. 'व्हॉईस ऑफ देवेंद्र'साठी जर तुम्ही पत्रक काढत असाल, तर उद्या आम्ही तुम्हाला वादविवाद स्पर्धेचे पत्रक देतो. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांनी मतांची चोरी करून मुख्यमंत्रिपद मिळवले का? या विषयाचे आमच्या स्पर्धेचे पत्रक आपल्या सगळ्या महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवाल, अशी अपेक्षा आहे.

या स्पर्धेचे समन्वयक वैभव सोलनकर म्हणाले की, ही स्पर्धा पुणे विद्यापीठाने आयोजित केलेली नाही. रोहित पवार अत्यंत खोटारडा माणूस आहे. ट्विट करून ते खोटी माहिती महाराष्ट्राला देत आहेत. शरदचंद्र पवार यांच्या नावाने तुम्ही विद्या प्रतिष्ठान, शारदा प्रतिष्ठान आणि रयत शिक्षण संस्थेत स्पर्धा आयोजित करता, तेव्हा तुम्हाला हे दिसत नाही?

पुणे विद्यापीठात हा वाद चालू असतानाच नागपूरमध्ये पुढच्या महिन्यात 'व्हॉईस ऑफ देवेंद्र' वक्तृत्व स्पर्धा आयोजित केली जाणार आहे, अशी घोषणा नागपूरचे भाजपा नेते बबलू गौतम यांनी केली.

# अभिनेता जॉन अब्राहमचे भटक्या कुत्र्यांसाठी सरन्यायाधीशांना पत्र

पान ८ वरून

या कुत्र्यांचे दिल्लीच्या शहरी पर्यावरणातील महत्त्व आहे. सर्वोच्च न्यायालयाचा आदेश ॲनिमल बर्थ कंट्रोल नियम, २०२३ च्या विरोधात आहे. या नियमांनुसार भटक्या कुत्र्यांचे निर्बिजीकरण, लसीकरण करून त्यांना त्याच परिसरात परत सोडले पाहिजे. या पूर्वीच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयांनीही या मानवी दृष्टीकोनातून व्यवस्थापन पद्धतीला मान्यता दिली आहे. जेथे हा कार्यक्रम प्रामाणिकपणे लागू झाला. तेथे चांगले परिणाम दिसले आहेत. जयपूरमध्ये ७० टक्क्यांहून अधिक कुत्र्यांची नसबंदी झाली, लखनौमध्ये हा आकडा ८४ टक्के इतका आहे. यामुळे कुत्र्यांचे वर्तन सुधारते आणि रेबीजसारख्या रोगांचा धोकाही कमी होतो. दिल्लीमध्ये अंदाजे १० लाख कुत्रे आहेत. त्यांना सर्वांना एका ठिकाणी गोळा करणे किंवा स्थलांतरित करणे अव्यावहारिक आणि अमानवी आहे.

# कंत्राटदारांचे १९ ऑगस्टला राज्यभर आंदोलन

पान १ वरून

महासचिव सुनील नागराळे, राज्य अभियंता महासचिव राजेश देशमुख आणि पाणीपुरवठा संघटनेचे सदस्य किशोर जामदार व शरद पाटील यांनी सांगितले की, शासनाच्या कुचकामी धोरणामुळे कंत्राटदारांवर आर्थिक संकट ओढवले असून काहींनी आत्महत्याही केल्या आहेत.

कंत्राटदारांचा वर्ग हा राज्याच्या विकासाचा महत्त्वाचा घटक असून त्यांच्यावर अनेक कुटुंबांचा उदरनिर्वाह अवलंबून आहे, याची शासनाने जाणीव ठेवावी.

**सूचना**

तमाम जनतेस याद्वारे **सूचना** देण्यात येते की, आमचे अशील **ट्वेंटी फाईव्ह डाऊनटाऊन रिअल्टी लिमिटेड** (पूर्वीचे नाव मंगल शृष्टी गृह निर्मिती प्रायव्हेट लिमिटेड, नंतर मंगल शृष्टी गृह निर्मिती लिमिटेड असे बदलण्याच आले, त्यानंतर जॉयस हाऊसिंग प्रायव्हेट लिमिटेड असे बदलण्यात आले, नंतर जॉयस हौसिंग लिमिटेड असे बदलण्यात आले) मधून याखाली लिहिलेल्या अनुसूचीमध्ये नमूद केलेली जागा संपादित करण्याकरिता बोलणी करीत आहेत.

स्वतंत्र व्यक्ती, हिंदू अविभक्त कुटुंब (एचयूएफ), कंपनी (कंपन्या), बँक(का), वित्तीय संस्था, नॉन-बँकिंग वित्तीय संस्था, फर्म(स), व्यक्तींची संघटना किंवा स्वतंत्र व्यक्तींचे स्थापित असलेले किंवा नसलेले मंडळ, सावकार आणि/किंवा धनको समाविष्ट असलेले परंतु त्यास मर्यादित नसलेल्या कोणा व्यक्ती/वर्तीचा याखाली लिहिलेल्या अनुसूचीमध्ये नमूद केलेली जागा आणि/किंवा त्याच्या कोणत्याही भाग/ तुकड्याच्या संदर्भात वारसा, विक्री, हस्तांतरण, हिस्सा, गहाणवट, तारण, प्रभार, वाटप, भाडेपट्टी, पोट-भाडेपट्टी, धारणाधिकार, परवाना, अभिहस्तांकन, भाडेकरू, भेट, हक्कसोड, देवाणघेवाण, बोजा, कौटुंबिक व्यवस्था/तडजोड/विभागणी, मृत्युपत्र, उत्तराधिकार, देखभाल, वहिवाट, न्यास, ताबा, कुटुंब, कायद्याच्या कोणत्याही न्यायालयाचा हुकूम किंवा आदेश, कंत्राट/करारपत्रे, भागिदारी, मार्गाचा अधिकार, प्रलंबित कायदेशीर कारवाई, आरक्षण, संपादन, कंत्राट/करारपत्र, सामंजस्य करार, विक्रीचा करार, मुखत्यार पत्र, पर्याय, वाटप, प्रथम नकाराचा अधिकार, पूर्व हस्तांतरण किंवा कोणतेही दायित्व किंवा कोणतीही वचनबद्धता या मार्गे किंवा अन्यथा कशाही प्रकारे कोणताही लाभ, शीर्षक, दावे, आक्षेप, मागण्या किंवा हक्क किंवा कशाही प्रकारे हितसंबंध असल्यास, त्यांनी त्याबाबत सहाय्यक दस्तऐवजांसह लेखी स्वरुपात निम्नस्वाक्षरीकार यांना सदर सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून चौदा (१४) दिवसांच्या आत निम्न उल्लेखित पत्त्यावर लेखी कळवावे, असे न केल्यास अशा व्यक्ती/एन्टिटी(टीं)चे हक्क, शीर्षक, दावे, आक्षेप, लाभ, अधिकार, मागण्या आणि/किंवा हितसंबंध जाणूनबुजून आणि स्वेच्छेने सोडून दिले किंवा त्याग करण्यात आले.

वर उल्लेखिल्यानुसार मालमत्तेची अनुसूची

मुंबई शहराच्या नोंदणीकरण जिल्हा आणि उप-जिल्ह्यामधील केशवराव खाड्ये मार्ग, डी प्रभाग, ताडदेव विभाग येथे स्थित सी.एस. क्र. ३८३ (भाग), १/३८३, ३८९, ३९०, ३९७ आणि ४१३ (भाग) येथील "२५ डाऊनटाऊन" या इमारतीच्या २७ व्या मजल्यावरील सदनिका क्र. टी३-२७०२ व त्यासह ४ कार पार्किंग जागा.

दिनांक १३ ऑगस्ट, २०२५

सही/-
**(मे. बिलावाला ॲण्ड कं.)**
खरेदीदाराकरिता ॲडव्होकेट्स ॲण्ड सॉलिसिटर्स
करीम चेंबर्स, २ रा मजला,
४२, अंबालाल दोशी मार्ग, फोर्ट, मुंबई-४०० ०२३.

रामेश्वर मीडिया

नवाकाळ

• मुंबई | बुधवार १३ ऑगस्ट, २०२५ • पान -८

# पोलीस खात्यातील १५ हजार पदे भरणार

**मुंबई** - राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था सक्षम करण्याच्या दृष्टीने राज्य सरकारने आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत १५ हजार नवीन पोलीस कर्मचाऱ्यांच्या भरतीला मंजुरी देण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे अनेक महिन्यांपासून प्रतीक्षेत असलेली पोलीस दलातील रिक्त पदे भरली जाणार आहेत. राज्य सरकारच्या गृह विभागाकडून लवकरच या भरतीसंदर्भातील अधिकृत जाहिरात प्रसिद्ध होणार आहे. त्यानुसार अर्ज प्रक्रिया, परीक्षा आणि शारीरिक चाचणीबाबतचे वेळापत्रक लवकरच जाहीर होईल. राज्यातील बेरोजगार तरुणांसाठी हा निर्णय सुवर्णसंधी ठरणार आहे.





पंचशिलचा विघ्नहर्ता- मुंबई



घोडपदेवचा राजा- मुंबई

## अभिनेता जॉन अब्राहमचे भटक्या कुत्र्यांसाठी सरन्यायाधीशांना पत्र

■ मुंबई

**अभिनेता** जॉन अब्राहम यांनी भारताचे सरन्यायाधीश भूषण गवई यांना पत्र लिहून दिल्लीतील भटक्या कुत्र्यांना आश्रयस्थळात नेण्याच्या सर्वोच्च न्यालयाच्या आदेशाचा पुनर्विचार करण्याची विनंती केली आहे. जॉन अब्राहमने हा आदेश बेकायदेशीर, अव्यवहारी आणि अमानवीय असल्याचे म्हटले आहे. अब्राहमसह रवीना टंडन, जान्हवी कपूर, वरुण धवन, वरुण ग्रोवर, सान्या मल्होत्रा, स्वरा भास्कर, वीर दास, चिन्मयी श्रीपाद बॉलीवूड कलाकारांनीही या निर्णयाला विरोध केला आहे. अभिनेता जॉन अब्राहमने पत्रात लिहिले आहे की, हे कुत्रे भटके नसून दिल्लीतील समाजाचा भाग असलेले आहेत. अनेकांनी त्यांचा स्वीकार केला आहे, त्यांच्यावर प्रेम केले आहे. ते अनेक पिढ्यांपासून माणसांच्या शेजारी राहून, दिल्लीकरच झाले आहेत.

पान ७ वर

## राहुल गांधींच्या मागणीला मनसेचा पाठिंबा मुरव्य निवडणूक आयुक्तांची भेट घेतली

■ मुंबई

**मतदार** याद्यांतील घोळ आणि मतचोरीच्या आरोपांवरून लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगावर जोरदार हल्लाबोल केला आहे. याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या निर्देशानुसार पक्षाचे शिष्टमंडळ आज राज्याचे मुख्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे आणि सामान्य प्रशासन विभागाचे प्रधान सचिव एस चोक्कलिंगम यांची भेट घेतली.

मनसेच्या शिष्टमंडळात संदीप देशपांडे, बाळा नांदगावकर यांच्यासह अनेक नेत्यांचा समावेश होता. त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत एक वॉर्ड एक उमेदवार पद्धत लागू करण्याची, मतदार याद्यांची विशेष पुनर्पडताळणी करण्याची आणि व्हीव्हीपॅटचा वापर अनिवार्य करण्याची मागणी केली. व्हीव्हीपॅट न वापरण्याच्या निर्णयावर शंका व्यक्त करत, मतदान कुठे गेले याची पडताळणी करण्याचा अधिकार प्रत्येक मतदाराला असावे, असे मत त्यांनी मांडले. या भेटीनंतर बाळा नांदगावकर म्हणाले की, लोकांच्या मनात निवडणुकीसंदर्भात संभ्रम निर्माण झाला आहे.

## पाकिस्तानने भारतीय राजदूतांच्या घरांचा गॅसपुरवठा थांबवला

■ इस्लामाबाद

**पाकिस्तानने** इस्लामाबादमधील भारतीय राजदूतांच्या घरांना होणारा गॅसपुरवठा थांबवला आहे. स्थानिक गॅस सिलिंडर पुरवठादारांनाही भारतीय राजदूतांना सिलिंडर विकू नये, असे निर्देशही देण्यात आले आहेत. भारताच्या ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्तानने प्रत्युत्तर म्हणून हा निर्णय घेतला आहे.

पाकिस्तानने इस्लामाबाद येथील भारताचा दुतावासाचा मिनरल वॉटर आणि वर्तमानपत्रांचा पुरवठादेखील बंद केला आहे. पाकिस्तानच्या गुप्तचर संस्थेच्या आयएसआयच्या दबावामुळे सरकारने ही कारवाई केली आहे. पाकिस्तानने यापूर्वी २०१९मध्ये पुलवामा हल्ल्यानंतर भारताने केलेल्या सर्जिकल स्ट्राईकनंतर पाकिस्तानी अधिकाऱ्यांनी भारतीय राजदूताला असाच त्रास दिला होता. पाकिस्तानला प्रत्युत्तर म्हणून, भारतानेही दिल्लीतील पाकिस्तानी राजदूतांना वर्तमानपत्रे बंद केली आहेत.

## धारालीत यंत्रे अडकल्याने मृतदेह शोधण्यात अडथळे

■ उत्तरकाशी

**उत्तराखंड** येथील उत्तरकाशी जिल्ह्यात धारालीत ५ ऑगस्टला आलेल्या जलप्रलयामुळे मोठी दुर्घटना होऊन बाजारपेठा, हॉटेल, रेस्टॉरंट, अनेक घरे ढिगाऱ्याखाली गेली. या गावात आठव्या दिवशीही बचावकार्य सुरू आहे. ओल्या मातीत अडकलेली यंत्र, उंच ढिगारे आणि वाहून आलेली दलदलीसारखी स्थिती हे सर्व बचावकार्यासाठी आव्हान ठरत आहे. त्यामुळे आता यंत्राविना मृतदेह ढिगाऱ्यातून बाहेर काढले जात आहेत.

काही नातेवाईक प्रियजनांचे फोटो घेऊन ढिगाऱ्यांच्या भोवती शोध घेत फिरत आहेत. स्थानिकाने सांगितले की, आमचे वडिलोपार्जित घर गेले, रोजगारही संपला. शासनाने केदारनाथप्रमाणे पुनर्वसन करावे. त्यासाठी लंका, गोपांग आणि जगला या ठिकाणांची शिफारस केली आहे. धारालीत वर्षाला १०० कोटींचा आर्थिक व्यवहार



होत असे. आता सर्व काही नष्ट झाले आहेत. उत्तर प्रदेशातील बिजनौर येथील लेखराज यांचा १८ वर्षांचा मुलगा योगेश, वेल्डिंगच्या कामासाठी धाराली येथे आला होता. ३ ऑगस्ट रोजी त्याच्याशी शेवटचा संवाद झाल्यानंतर तो बेपत्ता आहे. मुलगा कामासाठी येथे आला होता. त्याला आता कुठे शोधायचे? लेखराज यांनी तो जिवंत असल्याची आशा सोडून दिली आहे. आता ते केवळ त्याचा मृतदेह शोधण्याच्या आशेवर गावात ठाण मांडून आहेत.

धारालीत काम करणाऱ्या नेपाळी आणि बिहारी कामगारांपैकी अनेक बेपत्ता आहेत. नेपाळहून आलेला सुरेंद्र सांगतो की, ५ ऑगस्टला सकाळी मी बाहेर गेलो होतो त्यामुळे वाचलो. पण माझे ७ मित्र ढिगाऱ्याखाली दबले. तो आता सरकारी मदत केंद्रात फोटो घेऊन त्यांचा शोध घेत आहे. सरकारने आता नेहरू इन्स्टिट्यूट ऑफ माऊंटनियरिंग (एनआयएम) या संस्थेला या दुर्घटनेचे शास्त्रीय विश्लेषण करण्याची जबाबदारी दिली आहे. प्रशिक्षक दीप शाही तीन दिवस भू-सर्वेक्षण करणार आहेत.

## मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर अपघात इन्फ्लुएन्सर अफ्सिया बानोचा मृत्यू

■ नवी मुंबई

**मुंबई - पुणे** एक्स्प्रेस वेवर रविवारी मध्यरात्री पनवेलनजिक भीषण अपघात होऊन त्यात उत्तर प्रदेशच्या लखनौमधील सुप्रसिद्ध सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर अफ्सिया बानो महंमद फरीद खानचा (२२) जागीच मृत्यू झाला.

या अपघातात अफ्सियाच्या कारच्या ड्रायव्हरसह चार जण गंभीररित्या जखमी झाले असून, त्यांच्यावर अंधेरीतील कुपर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. सोशल मीडियावर दहा लाखांहून अधिक फोलोअर असलेली अफ्सिया पंधरा दिवसांपूर्वी आपल्या मित्रांसह टोयोटा क्रुझर गाडीने मुंबईला आली होती. ते सर्व मुंबईहून लोणावळ्याला जात असताना पळस्पे महामार्ग पोलीस चौकीजवळ ड्रायव्हर नीर आलम खान (३४) याचे गाडीवरील नियंत्रण सुटले आणि गाडी रस्त्यालगतच्या सिमेंटच्या ब्लॉकवर आदळून उलटली. अफ्सिया ड्रायव्हरच्या मागच्या सीटवर बसली होती. अपघातात तिच्या डोक्याला गंभीर इजा झाली.

## भाजपा पदाधिकारी व चुलत भाऊ भिवंडीत दुहेरी हत्याकांड

**घटनेनंतर हल्लेखोर फरार**

■ भिवंडी

**भिवंडी** तालुक्यातील खार्डी गावाजवळील खारबाव चिंचोटी परिसरात काल रात्री ११ वाजताच्या सुमारास दुहेरी हत्याकांड



घडल्याने परिसरात खळबळ उडाली. या हल्ल्यात भाजपा युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष प्रफुल्ल तांगडी (४२) आणि त्याचा चुलत भाऊ तेजस तांगडी (२२) यांची हत्या झाली.

प्रफुल्ल तांगडी आपल्या दोन सहकाऱ्यांसह जेडीटी इंटरप्रायझेस येथे कार्यालयात बसले होते. याच दरम्यान काही अज्ञात हल्लेखोरांनी कार्यालयात घुसून दोघांवर धारदार शस्त्रांनी हल्ला केला. या हल्ल्यात दोघांचा जागीच मृत्यू झाला. हल्लेखोर घटनेनंतर फरार झाले. या घटनेची माहिती मिळताच पोलीस तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. परिसरात तणावपूर्ण वातावरण झाल्याने बंदोबस्त तैनात केला आहे. तांगडी कुटुंबावर शोककळा पसरली आहे. यापूर्वी सुमारे वर्षभरापूर्वी प्रफुल्ल तांगडी याच्यावर हल्ला झाला होता. या हत्येचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

## छत्रपती संभाजीनगरात सराईत गुंडाकडून मैत्रिणीवर गोळीबार

■ छत्रपती संभाजीनगर

**छत्रपती** संभाजीनगरमध्ये सैय्यद फैजल उर्फ तेजा या सराईत गुन्हेगाराने आपल्या मैत्रिणीवर गोळीबार केला. या हल्ल्यात तरुणी गंभीर जखमी झाली. या घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल करत तेजाला अटक केली. मात्र त्याने जेलमध्ये जाताना धमकी दिली की, बाहेर आलो की, आणखी चार पाच मैत्रिणींना गोळ्या घालणार आहे.

तेजा हा सराईत गुन्हेगार असून, त्याच्यावर हत्येचा प्रयत्न, बलात्कार, चोरी आणि अंमली पदार्थ तस्करी संदर्भात विविध पोलीस ठाण्यात अनेक गुन्हे दाखल आहेत. तो रात्री उशिरा शहरातील किलेअर्क परिसरात आपल्या मैत्रिणीला भेटायला गेला होता. दोघांमध्ये काही कारणावरून वाद झाला. संतापाच्या भरात त्याने पिस्तूल काढून गोळीबार केला. त्यातील एक गोळी तरुणीच्या हाताला लागली. जखमी तरुणीला तातडीने घाटी रुग्णालयात दाखल करण्यात आले. गोळीबाराचा आवाज ऐकताच नागरिक घटनास्थळी धावले, तोपर्यंत आरोपी घरातून पसार झाला होता. मात्र त्याला अटक करण्यात आली.

## भारतावरच्या टॅरिफमुळे रशियाला फटका पुतिन भेटीआधी ट्रम्प यांचा नवा दावा

■ वॉशिंग्टन

**भारतावर** ५० टक्के टॅरिफ लादल्याने रशियाच्या अर्थव्यवस्थेला मोठा फटका बसला आहे, असा दावा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी वॉशिंग्टन येथे केला. रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांच्या भेटीआधी ट्रम्प यांचे हे विधान समोर आले आहे. भारताच्या स्वातंत्र्यदिनी अलास्का शिखर परिषदेच्या निमित्ताने दोन्ही राष्ट्राध्यक्षांची ही भेट होणार आहे. युक्रेन-रशिया



युद्धावर तोडगा काढण्यासाठी या भेटीकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे.

भारतानेही या शिखर परिषदेचे स्वागत केले आहे. तीन-चार वर्षांपासून सुरू असलेल्या युक्रेन-रशिया युद्धावर शांततामय तोडगा काढण्याचा मार्ग मोकळा होईल, असा विश्वास व्यक्त केला आहे. याच पार्श्वभूमीवर ट्रम्प यांचे टॅरिफबद्दल हे विधान समोर आले आहे.

व्हाईट हाऊस येथील पत्रकार परिषदेत भारताचे नाव न घेता ट्रम्प म्हणाले, रशियाची अर्थव्यवस्था आधीच कमकुवत झाली असून टॅरिफ वाढीच्या निर्णयामुळे त्याला आणखी खीळ बसेल. रशियाचा सर्वात मोठा आणि दुसऱ्या क्रमांकाचा तेल खरेदीदार देशाला फटका बसला आहे. अमेरिकेने अनेक देशांवर कर

पान ७ वर

## दिल्ली शीखविरोधी दंगलीप्रकरणी खटल्याची नव्याने सुनावणी होणार

■ नवी दिल्ली

**माजी** पंतप्रधान दिवंगत इंदिरा गांधी यांच्या हत्येनंतर दिल्लीमध्ये उसळलेल्या शीखविरोधी दंगलीप्रकरणी एका खटल्याची नव्याने सुनावणी करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने कनिष्ठ न्यायालयाला दिले आहेत. या प्रकरणी अन्य तीन खटले साक्षीदारांचे जबाब व अन्य महत्त्वपूर्ण कागदपत्रांसह नव्याने दाखल करण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. हे खटले राज नगर पार्ट-१ मधील पालम कॉलनीत शीख समाजातील पाच जणांची हत्या आणि राजनगर पार्ट-२ मधील गुरुद्वारा जाळण्याशी संबंधित आहेत. या खटल्यांमध्ये सर्व आरोपींची कनिष्ठ न्यायालयाने १९८६ मध्ये निर्दोष मुक्तता केली. आश्चर्याची बाब म्हणजे कनिष्ठ न्यायालयाच्या निर्णयाला दिल्ली पोलीस आणि सीबीआयनेदेखील आव्हान दिले नाही. कनिष्ठ न्यायालयाचा तो निर्णय आता उच्च न्यायालयाने फेटाळून लावला असून, या अपवादात्मक खटल्यात पीडितांना न्याय मिळवून देण्यासाठी नव्याने खटला चालवणे गरजेचे आहे, असे न्यायालयाने म्हटले.

## सध्याचा निवडणूक आयोग भाजपाची विस्तारित शारवा

**संजय राऊत यांचा घणाघात**

■ मुंबई

**माजी** निवडणूक आयुक्त टी. एन. शेषन यांनी निवडणूक आयोग म्हणजे काय हे राजकारण्यांना दाखवून दिले. भल्या भल्या निगरगट्ट नेत्यांना आयोगाने सरळ केले. सध्याच्या निवडणूक आयोगाने शेषन यांच्या या गौरवशाली इतिहासाचा अभ्यास करणे आवश्यक आहे. कारण सध्याचा निवडणूक आयोग हा भाजपाची विस्तारित शाखा असल्यासारखे काम करत आहे, अशी टीका शिवसेना ठाकरे गटाचे प्रवक्ते संजय राऊत यांनी आज केली.

काल इंडिया आघाडीने



दिल्लीत काढलेला मोर्चा हा देशातील लोकशाही वाचवण्यासाठी होता. सुमारे तीनशेहून अधिक खासदार या मोर्चाला उपस्थित होते. पण घाबरलेल्या मोदी सरकारने मोर्चा अर्ध्यावर रोखला. राहुल गांधी यांनी मतांच्या चोरीचे दिलेले पुरावे हे निवडणूक आयोगाच्या वेबसाईटवरीलच आहेत. तरीही निवडणूक आयोग ते मानायला तयार नाही. भाजपा सांगेल तेच करायचे, असा सध्याच्या निवडणूक आयोगाचा खाक्या आहे. आयोग लोकशाहीचा मारेकरी आहे. त्यांनी एक लक्षात ठेवले पाहिजे की, मोदी आणि शहा हे काही अजरामर नाहीत. एक वेळ अशी येईल की, तुमच्या या कृष्णकृत्यांबद्दल जनताच तुम्हाला फासावर चढवेल, असे राऊत म्हणाले.

## नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मालेगावमध्येही १५ ऑगस्टला मांसविक्री बंद! विरोधकांची टीका

■ नागपूर

**कल्याण-डोंबिवली** महापालिकेनंतर आता नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर या महानगरपालिका हद्दीतील चिकन आणि मटण दुकाने १५ ऑगस्टला बंद राहणार आहेत. तर मालेगाव महानगरपालिकेने १५, २० आणि २७ तारखेला मांस विक्रीवर बंदी घातली आहे. नागपूर शहरातील सर्व कत्तलखानेही बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला असून, दुकाने बंद ठेवण्यासाठी मनपा लवकरच नोटीस पाठवणार आहे. या निर्णयावर उबाठा आणि राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाने आक्षेप घेत सरकारवर टीका केली आहे.

पालिका क्षेत्रातील सर्व कत्तलखाने चालकांना १४ ऑगस्टच्या मध्यरात्रीपासून १५ ऑगस्टच्या मध्यरात्रीपर्यंत कत्तलखाने आणि मांसविक्री बंद ठेवण्याच्या सूचना नोटीसद्वारे दिल्या जाणार आहेत. शासनाच्या जुन्या निर्णयाचा आधार घेत मनपाने हा आदेश जारी करण्याची तयारी केली आहे. यावर शरदचंद्र पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड म्हणाले की, सरकार मांसविक्रीवर बंदी का करत आहे? कोणी काय खावे किंवा न खावे, हे शासन का ठरवत आहे? सरकारला फक्त वाद वाढवायचा आहे. नागरिकांचे प्रश्न प्रलंबित आहेत. लोकांचे लक्ष वळवण्यासाठी सरकार असे निर्णय घेत आहे. उबाठा नेत्या सुषमा अंधारे म्हणाल्या की, आम्ही शाकाहार करायचा की मांसाहार, हे प्रशासन का सांगणार? राज्य सरकार लोकांचे प्रश्न सोडवण्यासाठी आहे की सतत धार्मिक कार्ड खेळण्यासाठी, हे समजत नाही.

## मिंता देवी १२४ नॉट आऊट! टी-शर्ट घालून विरोधकांचा निषेध

■ नवी दिल्ली

**बिहारमधील** मतदार यादीतील कथित घोटाळा आणि एसआयआरविरोधात इंडिया आघाडीच्या नेत्यांनी आजही निषेध नोंदवला. काँग्रेस खासदार प्रियंका गांधी यांच्यासह अनेक खासदार मिंता देवी यांचा फोटो असलेले टी-शर्ट घालून आंदोलनात सहभागी झाले. या टी-शर्टच्या मागील बाजूस १२४ नॉट आऊट असा मजकूर होता.




काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी मतदार चोरीच्या मुद्यावर सादर केलेल्या अहवालात १२४ वर्षीय मिंता देवी यांचा उल्लेख केला होता. नुकत्याच जाहीर झालेल्या बिहारच्या मसुदा मतदार यादीत मिंता देवी यांचे वय १२४ वर्षे दाखवण्यात आले आहे. ते जगातील सर्वात वयोवृद्ध व्यक्तीच्या वयापेक्षा नऊ वर्षांनी जास्त आहे. याबाबत काँग्रेस खासदार मणिकम टागोर म्हणाले की, यावरून निवडणूक आयोगाच्या कारभाराचे अपयश स्पष्ट होते.

## ३५ वर्षांपूर्वी हत्या प्रकरणात काश्मीरच्या फुटीर नेत्यावर छापे

■ श्रीनगर

**सुमारे** ३५ वर्षांपूर्वी जम्मू आणि काश्मीरच्या सौरा येथे काश्मिरी पंडित परिचारिका सरला भट्ट हिच्या झालेल्या निर्घृण हत्येप्रकरणी काश्मीर पोलिसांच्या विशेष पथकाने आज श्रीनगरमध्ये आठ ठिकाणी छापे टाकले. यामध्ये जम्मू-काश्मीर लिबरेशन फ्रंटचे नेते यासीन मलिक यांच्या घराचाही समावेश आहे, असे सांगण्यात आले.

सरला भट्ट ही सौरा येथील शेर-ए- काश्मीर इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस या संस्थेत परिचारिका होती. १८ एप्रिल १९९० रोजी तिचे दहशतवाद्यांनी अपहरण केले होते. दुसऱ्या दिवशी तिचा मृतदेह उमर कॉलनी, मल्लाहबाग येथे आढळला होता. तिची गोळ्या घालून हत्या करण्यात आली होती. तिच्या मृतदेहावर पोलिसांना एक चिठ्ठी सापडली होती. त्यात तिला पोलिसांची खबरी असे म्हटले होते.

जम्मू-काश्मीर लिबरेशन फ्रंटशी संबंधित दहशतवाद्यांनी ही हत्या केली, असा जम्मू-काश्मीर पोलिसांना संशय आहे.

## उमरखाडी गोकुळ काला मंडळाची चित्ररथासह 'गोविंदा मिरवणूक'

**मंडळाचे यंदाचे ७७ वे वर्ष**

■ मुंबई

**उमरखाडी** सार्वजनिक गोकुळ काला मंडळाचे यंदा ७७ वे वर्ष आहे. त्यानिमित्त परंपरेनुसार यंदाही शनिवार १६ ऑगस्ट रोजी गोपाळ कालादिवशी तीन भव्य पौराणिक देखाव्यांच्या चित्ररथासह 'गोविंदा मिरवणूक' काढली जाणार आहे.

या गोविंदा मिरवणुकीमध्ये तीन भव्य पौराणिक देखावे चित्ररथावर उभारणार असून, त्यात आकर्षक वेशभूषा केलेली मुले-मुली सहभागी होतील. सोबत बॅन्ड पथक-बँजो पार्टी- ढोल ताशांच्या तालावर रंगी -बेरंगी कपड्यातील गोविंदा नाचत गाजत दहीहंडी फोडण्याचे कौशल्य दाखवतील. गोविंदा मिरवणूक दक्षिण मुंबईतील कुंभारवाडा, गिरगांव, ठाकूरद्वार, भुलेश्वर, मुंबादेवी चिंचबंदर, डोंगरी या विभागात फिरवण्यात येणार आहे. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मंडळाचे सर्व कार्यकर्ते अहोरात्र मेहनत घेत आहेत, अशी माहिती मंडळाचे पदाधिकारी निवृत्ती फलके, प्रफुल्ल मोरे, सदानंद आचरेकर यांनी दिली. या कार्यक्रमाला गणेश वारेकर, प्रसाद भोसले, नरेंद्र कांबळी, पुरुषोत्तम पाटील, अभय चिंबुलकर, श्रीधर गोवेकर, वसंत माळी, बाबू जामसंडेकर, विद्याधर साळवी, शरद पाटील, सचिन राजवाडकर यांचे विशेष मार्गदर्शन लाभत आहे. ही गोविंदा मिरवणूक गणेश चौक, उमरखाडी, येथून सकाळी ९ वाजता निघणार आहे.